

# राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७

# अहवाल

## भाग १

श्री. द. म. सुकथनकर
अध्यक्ष

श्री. राजेंद्र सिंह
सदस्य

श्री. नवीन कुमार
सदस्य

मुंबई
१९९८

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना . . . . . . . . | १ |
| २ | प्रस्तावांचे वर्गीकरण . . . . . . . . | ३ |


## प्रभाग एक


| अ.क्र. | प्रशासकीय विभाग/ विभाग प्रमुख | प्रस्ताव क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | **कृषि व सहकार विभाग** | | | |
| | (अ) कृषि संचालनालय | १. | मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे येथील अनुरेखक संवर्गातील तत्सम पदांना केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाचे क्रमांक १३ (१)/आय सी/९१, दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ चे आदेश लागू करणेबाबत. | १३ |
| | (ब) मत्स्यव्यवसाय संचालनालय | २. | मत्स्यव्यवसाय शाळांमधील शिक्षकांना चट्टोपाध्याय समितीच्या त्रिस्तरीय वेतनश्रेणी विहित करणेबाबत. | १४ |
| | (क) कृषि विद्यापीठ | ३. | कृषी विद्यापीठातील सहायक कुलसचिव, उप कुलसचिव व कुलसचिव या पदांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणी विहित करणेबाबत. | १५ |
| | | ४. | कृषी विद्यापीठातील कृषी सहायक व कृषी पर्यवेक्षक/ कनिष्ठ संशोधन सहाय्यक व कृषी अधिकारी/वरिष्ठ संशोधन सहायक या पदांना कृषी विभागाच्या दिनांक ८ डिसेंबर १९९४ च्या आदेशांचा लाभ देण्याबाबत. | १६ |
| | | ५. | कृषि विद्यापीठातील वरिष्ठ संशोधन सहायक या पदास श्रीमती ना. दा. ठा. विद्यापीठाकडील तत्सम पदाची वेतनश्रेणी समकक्षतेच्या आधारे लागू करणेबाबत. | १७ |
| | | ६. | ग्रामीण शिक्षण संस्था वर्धा व अमरावती येथील शिक्षक पदांना उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाच्या दिनांक २५ मार्च १९९४ व शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर १९९४ च्या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेल्या वेतनश्रेणी, समकक्षता निश्चित करून विहित करणेबाबत. | १८ |
| २ | **शिक्षण व सेवायोजन विभाग** | | | |
| | (अ) शिक्षण संचालनालय | ७. | संगीत शिक्षकांना चट्टोपाध्याय समितीच्या त्रिस्तरीय वेतन-श्रेणी विहित करणेबाबत. | १९ |
| | (ब) तंत्रशिक्षण संचालनालय | ८. | तंत्रशिक्षण संचालनालयातील प्रशासकीय पदांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेतनश्रेणी लागू करणेबाबत. | २० |
| | | ९. | तंत्र निकेतनातील ग्रंथपाल या पदास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेतनश्रेणी विहित करणेबाबत. | २१ |

| अ.क्र. | प्रशासकीय विभाग/ विभाग प्रमुख | प्रस्ताव क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | (क) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय | १०. | औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील निदेशकांच्या निवडश्रेणीबाबत २० टक्के संबंधीची घातलेली अट काढून टाकणेबाबत. | २२ |
| | (ड) पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय | ११. | पुरातत्व, विभागातील बगीचा उप आवेक्षक या पदास कृषि सहायकाप्रमाणे वेतनश्रेणी विहित करणेबाबत. | २३ |
| ३ | **वित्त विभाग** | | | |
| | (अ) विक्रीकर विभाग | १२. | विक्रीकर विभागातील विविध राजपत्रित पदांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत. | २४ |
| | | १३. | विक्रीकर विभागातील निरीक्षक या पदास मंत्रालयीन सहायकाप्रमाणे रुपये १६४०-२९०० ही वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत. | २५ |
| | (ब) विक्रीकर उपहारगृह | १४. | विक्रीकर विभागातील उपहार गृहातील कर्मचाऱ्यांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत. | २६ |
| | (क) लेखा व कोषागारे संचालनालय | १५. | लेखा व कोषागारे संचालनालयातील विविध राजपत्रित पदांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत | २७ |
| | | १६. | लेखा व कोषागारे संचालनालयातील विविध अराजपत्रित पदांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत. | २८ |
| ४ | **सामान्य प्रशासन विभाग** | | | |
| | (अ) महाराष्ट्र लोकसेवा आयोग | १७. | महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील अधिकारी संवर्गातील पदांना मंत्रालयातील तत्सम पदांप्रमाणे वेतनश्रेणी विहित करणेबाबत. | २९ |
| | (ब) सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य, पुणे | १८. | सैनिक कल्याण विभागातील वसतिगृह अधीक्षक व कल्याण संघटक या पदांना अनुरुप वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत. | ३० |
| ५ | **पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभाग** | १९. | मुख्य अभियंता स्तर १ व २ या पदांना केंद्र शासनाकडील तत्सम पदाची वेतनश्रेणी लागू करणेबाबत. | ३१ |
| ६ | **सार्वजनिक बांधकाम विभाग** | २०. | सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभागातील अनुरेखक संवर्गातील तत्सम पदांना केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाचे क्रमांक १३ (१)- आय. सी./९१, दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ चे आदेश लागू करणेबाबत. | ३२ |
| | | २१. | सार्वजनिक बांधकाम विभागातील संशोधन सहायक या पदास वित्त विभागाच्या दिनांक २० नोव्हेंबर १९७९ च्या आदेशांचा लाभ अनुज्ञेय करणेबाबत. | ३३ |
| | | २२. | सार्वजनिक बांधकाम विभागातील लिपिक वर्गीय पदांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत. | ३४ |
| ७ | **वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग** | | | |
| | (अ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय | २३ | शिक्षण व सेवायोजन विभागाच्या दिनांक २९ जानेवारी १९९० च्या आदेशांचा लाभ वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागातील तत्सम पदांना लागू करणेबाबत. | ३५ |

| अ.क्र. | प्रशासकीय विभाग/ विभाग प्रमुख | प्रस्ताव क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ८ | **सार्वजनिक आरोग्य विभाग** | | | |
| | (अ) आरोग्य सेवा संचालनालय | २४. | आरोग्य सेवा संचालनालयातील वैद्यकीय अधिकारी वर्ग-१ व २ या पदास वरच्या वेतनश्रेणी लागू करणेबाबत. | ३७ |
| | | २५. | आरोग्य कार्यकर्ता या पदास रुपये १२००–१८०० ही वेतन-श्रेणी मंजूर करताना २० टक्के निवडश्रेणीबाबत घातलेली अट काढून टाकणेबाबत. | ३८ |
| ९ | **महसूल व वन विभाग** | | | |
| | (अ) महसूल विभाग | २६. | महसूल विभागातील महसूल अधिकार श्रेणीमधील विविध पदांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत. | ३९ |
| | | २७. | महसूल विभागातील सहायक अधीक्षक, भूमी अभिलेख या पदोन्नतीच्या पदास उचित वेतनश्रेणी विहित करणेबाबत. | ४० |
| | | २८. | महसूल विभागातील तलाठी पदास ग्रामसेवक पदाची रुपये १२००–१८०० ही वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत. | ४१ |
| | (ब) मुख्य वन संरक्षक | २९. | वन विभागातील अभियांत्रिकी संवर्गातील विविध पदांना सम-कक्षतेच्या आधारे पाटबंधारे विभागाच्या दिनांक १४ डिसेंबर १९९५ च्या आदेशांचा लाभ अनुज्ञेय करणेबाबत. | ४२ |
| | | ३०. | वन विभागातील मुख्य लिपिक व लेखापाल या पदास लेखा व कोषागारे संचालनालयामधील तत्सम पदांच्या वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत. | ४३ |
| १० | **ग्रामविकास विभाग** | | | |
| | (अ) जिल्हा परिषदा | ३१. | जिल्हा परिषदांमधील अनुरेखक संवर्गातील तत्सम पदांना केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाचे क्रमांक १३ (१)–आय.सी./९१, दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ चे आदेश लागू करणेबाबत. | ४४ |
| | | ३२. | जिल्हा परिषदांतील ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत) या पदांस कृषी व पदुम विभागाच्या दिनांक ८ डिसेंबर १९९४ च्या आदेशांचा लाभ अनुज्ञेय करणेबाबत. | ४५ |


## प्रभाग दोन


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | **कृषि व सहकार विभाग** | | | |
| | (अ) महात्मा फुले कृषि विद्यापीठ | १. | महात्मा फुले कृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतन योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणेबाबत. | ४९ |
| २ | **शिक्षण व सेवायोजन विभाग** | | | |
| | (अ) शिक्षण संचालनालय | २. | सराव पाठशाळेतील शिक्षकांना निवृत्तिवेतन योजना लागू करणेबाबत. | ५० |
| ३. | **सार्वजनिक आरोग्य विभाग** | | | |
| | (अ) आरोग्य सेवा संचालनालय | ३. | सार्वजनिक आरोग्य विभागातील औषधनिर्माता या पदास केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंबकल्याण विभागाच्या दिनांक २५ जानेवारी १९८८ च्या आदेशांच्या अनुषंगाने रुग्ण देखभाल भत्ता लागू करणेबाबत. | ५१ |
| ४ | **वित्त विभाग** | ४. | नियत व एकत्रिकृत वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतन दरात सुधारणा करणेबाबत. | ५२ |

## प्रकरण एक

# प्रस्तावना

वित्त विभागाच्या दिनांक ५ डिसेंबर १९९७ च्या शासन निर्णयान्वये (जोडपत्र -अ) दिनांक १ जानेवारी १९९६ पासून अंमलात यावयाच्या सर्वसाधारण वेतन सुधारणेच्या संदर्भात राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीबाबत शिफारस करण्याकरिता शासनाने " राज्य वेतन सुधारणा समिति, १९९७ " ची नियुक्ती केली. या समितीची संरचना पुढीलप्रमाणे आहे :—

| | | |
|---|---|---|
| (१) श्री. द. म. सुकथनकर, सेवानिवृत्त मुख्य सचिव | .. | अध्यक्ष |
| (२) प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय | .. | सदस्य |
| (३) प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय | .. | सदस्य |

या समितीस वित्त विभागाच्या दिनांक १६ मार्च १९९८ (जोडपत्र-ब) व दिनांक २७ मे १९९८ (जोडपत्र-क) च्या आदेशान्वये मुदतवाढी देण्यात आलेल्या आहेत.

२. या समितीकडे पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने केंद्र शासनाने आपल्या कर्मचाऱ्यांकरिता विहित केलेल्या सुधारित वेतनश्रेणी राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांना, या आयोगाच्या अहवालातील शिफारशी व त्यांवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारांत घेऊन, लागू करण्याबाबत शिफारशी करण्यासंबंधीचे विषय सोपविताना, त्याचबरोबर, दिनांक १ जानेवारी १९८६ पासून अंमलात आलेल्या सर्वसाधारण वेतन सुधारणेच्या संदर्भात काही संवर्ग पदांना सुधारित वेतनश्रेणी विहित करण्यामध्ये अन्याय झाला असल्यास त्यासंबंधीच्या प्रस्तावांचे परीक्षण करण्यासाठी नियुक्त केलेल्या, अन्याय निवारण समितीचे कामकाजदेखील सुपूर्द करण्यात आलेले आहे. वित्त विभागाच्या दिनांक १२ सप्टेंबर १९९६ (जोडपत्र-ड) च्या आदेशान्वये मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वी नियुक्त केलेल्या अन्याय निवारण समितीची संरचना पुढीलप्रमाणे होती :—

| | | |
|---|---|---|
| (१) मा. मंत्री (वित्त व नियोजन) | .. | अध्यक्ष |
| (२) मा. मुख्य सचिव | ... | सदस्य |
| (३) प्रधान सचिव (वित्त) | .. | सदस्य |
| (४) प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | .. | सदस्य |
| (५) उप सचिव, वित्त विभाग, कार्यासन सेवा-१० | .. | सदस्य-सचिव |

या समितीस वित्त विभागाच्या दिनांक ३१ जानेवारी १९९७ (जोडपत्र-इ) च्या आदेशान्वये तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती.

३. अन्याय निवारण समितीसमोर प्राप्त झालेल्या एकूण ३६ प्रस्तावांवर राज्य वेतन सुधारणा समितीच्या बैठकांमध्ये विचार करण्यात आला. या बैठकांना प्रशासकीय विभागाचे सचिव, विभाग प्रमुख व संबंधित संघटनांचे पदाधिकारीदेखील उपस्थित होते.

□ □

## प्रकरण दोन
# प्रस्तावांचे वर्गीकरण

दिनांक १ जानेवारी १९८६ पासून अंमलात आलेल्या वेतन सुधारणेच्या संदर्भात काही संवर्ग पदांकरिता विहित करण्यात आलेल्या वेतनश्रेणीमध्ये अन्याय झाल्याबाबतच्या या समितीला प्राप्त झालेल्या प्रस्तावांची ढोबळमानाने वर्गवारी पुढीलप्रमाणे करता येईल :—

(अ) यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या मूळ प्रशासकीय विभागाच्या शासन निर्णयानुसार वेतनश्रेणी सुधारण्याबाबतचा फायदा इतर प्रशासकीय विभागांच्या अखत्यारीतील तत्सम व समकक्ष पदांनादेखील लागू करणे.

(ब) समानीकरण समितीने ज्या पदांना केंद्र शासनाकडील तत्सम पदांची समकक्षता दिली आहे अशा पदांना, केंद्र शासनाने नंतर अनुज्ञेय केलेल्या सुधारित वेतनश्रेणीचा लाभ राज्य शासकीय व इतर तत्सम समकक्ष पदांना लागू करणे.

(क) ज्या प्रस्तावांच्या बाबतीत संबंधित पदांचे सेवाप्रवेश नियम व कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या तसेच इतर तदनुषंगिक बाबी यांचा विचार करता गुणवत्ता आढळून येते अशांना मूळ प्रशासकीय विभागांतील समकक्ष पदांची वेतनश्रेणी लागू करणे.

(ड) काही संवर्ग पदांच्या बाबतीत केंद्र शासनाकडील पदांशी समकक्षता नव्याने ठरवून त्यांना सुधारित वेतनश्रेणी विहित करणे.

(इ) निवृत्तिवेतन योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे, रुग्ण देखभाल भत्ता लागू करणे, एकत्रिकृत वेतनावरील अंशकालिक कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करणे इ.

२(अ). वर नमूद केलेला " अ " प्रवर्गातील प्रस्ताव यापूर्वीच शासनाने मान्य केलेला असल्यामुळे वेतन समानीकरण समितीने इतर प्रशासकीय विभागातील ज्या पदांना मूळ प्रशासकीय विभागातील पदांची समकक्षता दिली आहे अशांना पूर्वीच्या आदेशाचा लाभ अनुज्ञेय करणे क्रमप्राप्तच असल्यामुळे, यासंबंधीचे प्रस्ताव मान्य करण्याबाबत या समितीने शिफारस केली आहे. या प्रवर्गामध्ये पाटबंधारे विभागाच्या दिनांक १४ डिसेंबर १९९५ च्या आदेशाचा लाभ इतर विभागातील अभियांत्रिकी संवर्गातील संवर्ग पदांना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव प्रामुख्याने आहे. यासंबंधीचा लाभ संबंधित कर्मचाऱ्यांना मूळ प्रशासकीय विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदी बरहुकूम लागू करण्याबाबत या समितीने शिफारस केली आहे.

(ब). केंद्र शासनाकडील तत्सम पदांच्या वेतनश्रेणी इकडील तत्सम समकक्ष पदांस विहित करावयाचा धोरणात्मक निर्णय डिसेंबर, १९७७ मध्ये राज्य शासनाने घेतला. त्यानुसार दिनांक १ जानेवारी १९८६ पासून अंमलात यावयाच्या वेतन सुधारणेच्या संदर्भात त्या वेळेस शासनाने नियुक्त केलेल्या वेतन समानीकरण समितीने इकडील पदांना केंद्र शासनाकडील तत्सम पदांची समकक्षता देऊन केंद्र शासनाकडील पदांच्या वेतनश्रेणी विहित करण्याबाबतची शिफारस केली होती. अशा समकक्ष पदांना मागाहून केंद्र शासनाने वरच्या वेतनश्रेणी मंजूर केल्यास वर नमूद केलेल्या राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडील पुनःसुधारित वेतनश्रेणी-देखील इकडील तत्सम समकक्ष पदांना लागू करणे आवश्यक ठरत असल्याने त्या लागू करण्याबाबत या समितीने शिफारस केलेली आहे. या प्रवर्गात राज्यातील अनुरेखक संवर्ग पदे प्रामुख्याने मोडतात. केंद्र शासनाकडील पुनःसुधारित वेतनश्रेणीचा लाभ या प्रवर्गामधील पदांना नव्यानेच मंजूर करण्यात येत असल्यामुळे अशा इतर प्रकरणात शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अशा प्रकरणी दिनांक १ जानेवारी १९८६ ते ३१ मार्च १९९४ पर्यंतची थकबाकी संबंधितांना प्रदान न करता व त्यानंतरची रक्कम रोखीने प्रदान करण्याबाबत/संबंधित कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करण्याबाबत या समितीने शिफारस केली आहे.

(क). काही पदांच्या बाबतीत अन्याय झालेल्या प्रस्तावांच्या संदर्भात सकृतदर्शनी अशा प्रकरणांमध्ये त्रुटी दृष्टीगोचर होत असल्यामुळे, या समितीने जाणीवपूर्वक केलेल्या सखोल अभ्यासाअंती अशा पदांची समकक्षता त्या पदांच्या मूळ प्रशासकीय विभागातील तत्सम पदांशी सिद्ध होत असल्याचे निदर्शनास आल्यावरून तशी समकक्षता अशा पदांना देऊन त्याप्रमाणे वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्याबाबत समितीने शिफारस केलेली आहे. कृषि विद्यापीठातील वरिष्ठ संशोधन सहायक हे पद या प्रवर्गात प्रामुख्याने मोडते. शासनाचा अशा प्रकरणात थकबाकी न देण्याबाबतचा निर्णय विचारात घेऊन, दिनांक १ जानेवारी १९८६ ते ३१ मार्च १९९४ पर्यंतची थकबाकी संबंधितांना प्रदान न करण्याची व पुढील कालावधीतील थकबाकी रोखीने प्रदान करण्याबाबत/संबंधित कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करण्याबाबत समितीने शिफारस केली आहे.

(ड). राज्य शासनाकडील काही विभागाखालील विशिष्ट संवर्ग पदांच्या अधिकारश्रेणीमधील पदांची समकक्षता तेथील कामकाजाच्या स्वरूपाच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडील विशिष्ट विभागाखालील संवर्ग पदांशी करणे प्रथम दर्शनी ग्राह्य दिसत असतानाही दिनांक १ जानेवारी १९८६ पासून अंमलात आलेल्या वेतन सुधारणेच्या संदर्भात याप्रमाणे समकक्षता निश्चित करण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या वेतन समानीकरण समितीने विचारांती तशी समकक्षता दिलेली नव्हती. पदांची समकक्षता ठरविताना त्यांची असुधारीत वेतनश्रेणी, सेवाप्रवेश नियम, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या व ज्या-त्या पदाचे अधिकारश्रेणीमधील विशिष्ट स्थान इ. बाबी विचारात घेऊन तारतम्याने ठरविण्यात आलेली असल्यामुळे, केंद्र शासनाकडील वरच्या वेतनश्रेणीतील वरिष्ठ अर्हता संलग्न तथाकथित समकक्ष पदांच्या वेतनश्रेणी त्यामुळेच इकडील पदांना मंजूर करण्याबाबत या समितीने शिफारस केलेली नाही. या प्रवर्गात लेखा व कोषागारातील व विक्रीकर विभागातील पदे प्रामुख्याने येतात. वरील कारणांमुळे या विभागातील पदांना केंद्र शासनाकडील वरच्या वेतनश्रेणीमधील पदाची समकक्षता देऊन तेथील पदांना मंजूर करण्यात आलेल्या वरच्या सुधारित वेतनश्रेणी मंजूर करता येण्यासारख्या नाहीत अशी समितीने शिफारस केली आहे.

(इ). वेतनश्रेणीमधील अन्यायाखेरीज इतर बाबींसंदर्भातील प्रस्ताव समितीच्या विचारार्थ ठेवण्यात आले होते. त्यावरील समितीच्या शिफारशी या अहवालाच्या प्रभाग-२ मध्ये समितीने दिल्या आहेत.

३. समितीकडे सोपविण्यात आलेल्या पूर्वीच्या '' अन्याय निवारण समितीकडे '' प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे परीक्षण करण्याच्या कामकाजामध्ये राज्य वेतन सुधारणा समितीचे सदस्य म्हणून तत्कालीन प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग श्री. गोपालचंद्र त्रिपाठी यांचा सहभाग दिनांक १२ मार्च १९९८ पर्यंत राहिला होता.

४. समितीच्या या कामकाजात समितीला वित्त विभागाचे उप सचिव, श्री. श. वि. लागवणकर यांच्या एकूण मार्गदर्शनाखाली वेतन पुनर्रचना कक्षातील इतर अधिकारी व कर्मचारी वृंदाने जी बहुमोल मदत केली व कामाचा झपाट्याने उरक केला त्याचा विशेष उल्लेख समिती या संदर्भात करू इच्छिते.

**(द. म. सुकथनकर)**
अध्यक्ष, राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७

**राजेंद्र सिंह**
प्रधान सचिव (व्यय)
वित्त विभाग
सदस्य; राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७

**नवीनकुमार**
प्रधान सचिव (सेवा)
सामान्य प्रशासन विभाग
सदस्य, राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७

मुंबई , ३ जून १९९८

## जोडपत्र–अ

दिनांक १ जानेवारी १९९६ पासून अंमलात यावयाच्या वेतन सुधारणेच्या संदर्भात, '' राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ '' च्या नियुक्तीसंबंधीच्या शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२९६/प्र.क्र. ३९/सेवा-१०, दिनांक ५ डिसेंबर १९९७ चा उतारा.

केंद्र शासनाने, पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने आदेश निर्गमित करून केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी १९९६ पासून सुधारित वेतनश्रेणी विहित केल्या आहेत. याबाबत राज्य शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने या सुधारित वेतनश्रेणी शासकीय कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांना देखील परिक्षणांती लागू करावयाच्या असल्याने पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींचा सखोल अभ्यास करण्यासाठी निवृत्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असा आदेश देत आहे की, या कामासाठी पुढीलप्रमाणे, '' राज्य वेतन सुधारणा समिती १९९७ '' नेमण्यात यावी. या समितीची रचना पुढीलप्रमाणे असेलः––

| | | |
|---|---|---|
| (१) | श्री. द. म. सुकथनकर.<br>महाराष्ट्र शासनाचे सेवानिवृत्त मुख्य सचिव. | अध्यक्ष |
| (२) | प्रधान सचिव (व्यय).<br>वित्त विभाग, महाराष्ट्र शासन. | सदस्य |
| (३) | प्रधान सचिव (सेवा).<br>सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन. | सदस्य |

२. '' राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ '' च्या विचारार्थ ठेवलेले विषय या शासन निर्णयाच्या जोडपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे असतील. समिती आपला अहवाल नियुक्तीच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या आत परंतु शक्य तितक्या लवकर शासनाला सादर करील.

३. समितीच्या अध्यक्षांची नेमणूक अंशकालिक राहील व त्यांच्या पारिश्रमिक व इतर भत्त्यांबाबतचे आदेश यानंतर स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

४. वित्त विभागामधील उप सचिवांच्या नियंत्रणाखालील वेतन पुनर्रचना कक्षाकडून समितीला सर्व प्रकारचे सहकार्य दिले जाईल.

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२९६/प्र.क्र. ३९/सेवा-१०, दिनांक ५ डिसेंबर १९९७ चे सहपत्र––

### सहपत्र

राज्य वेतन सुधारणा समितीच्या विचारार्थ विषय :––

(१) पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन खालील नमूद केलेल्या पदांना सुधारित वेतनश्रेणीची शिफारस करणे :––

(अ) राज्य शासकीय पदे (अखिल भारतीय सेवेतील पदांव्यतिरिक्त),

(ब) जिल्हा परिषदांकडील पदे.

(क) अनुदानप्राप्त शाळांतील शिक्षकांची पदे,

(ड) मंत्रालयातील पदांशी तत्सम नसलेली राज्य विधानमंडळ सचिवालयातील पदे,

(ई) उच्च न्यायालयातील राजपत्रित व अराजपत्रित पदे,

(फ) राज्यातील कृषितर विद्यापीठे तसेच या विद्यापीठांना संलग्न असलेल्या अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेतर पदे,

(ग) राज्यातील कृषी विद्यापीठे व तत्संलग्न अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेतर पदे, आणि

(ठ) इतर अनुदानप्राप्त संस्थांमधील पदे,

(२) राज्य शासकीय व इतर संवर्ग पदांच्या वेतनश्रेणी दरम्यान पुनःसुधारित करण्यात आल्यामुळे केंद्र शासनाकडील समकक्ष पदांच्या तुलनीयतेचे पुनःपरिक्षण करून सुधारित वेतनश्रेणीची शिफारस करणे.

(३) पदांच्या सुधारित वेतनश्रेणी सुचविताना ज्या पदांना विद्यमान वेतनश्रेणीत विशेष वेतन/उच्च प्रारंभिक वेतनवाढी/व्यावसायिक पात्रतेसंबंधात वेतनवाढी, इ. मंजूर करण्यात आल्या आहेत ते विचारात घेणे.

(४) केंद्र शासनाच्या सुधारित वेतनश्रेणी राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांना विहित करण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या विद्यमान वेतनश्रेणीचे पुनःसंघटन करणे.

(५) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२९६/२८/९६/सेवा-१०, दिनांक १२ सप्टेंबर १९९६ च्या आदेशान्वये गठीत केलेल्या अन्याय निवारण समितीच्या विचारार्थ प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.

(६) वेतन सुधारणा समिती आपली कार्यपद्धती स्वतः निश्चित करेल व नियुक्तीपासून तीन महिन्यांच्या आत आपला अहवाल शासनास सादर करील.

□ □

# जोडपत्र–ब

दिनांक १ जानेवारी १९९६ पासून अंमलात यावयाच्या वेतन सुधारणेच्या संदर्भात '' राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ '' स मुदतवाढीसंबंधीच्या शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२९६/प्र.क्र. ३९/सेवा-१०, दिनांक १६ मार्च १९९८ चा उतारा––

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२९६/प्र.क्र. ३९/सेवा-१०, दिनांक ५ डिसेंबर १९९७ अन्वये, राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांना, पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींचा सखोल अभ्यास करून परिक्षणांती सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याकरिता, श्री. द. म. सुकथनकर, माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन ह्यांच्या अध्यक्षतेखाली, त्रिसदस्य, '' राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ '' नियुक्त करण्यात आलेली आहे. ही समिती आपला अहवाल नियुक्तीपासून तीन महिन्यांच्या आत शासनास सादर करणार होती.

२. कर्मचारी महासंघाच्या विनंतीनुसार यासंबंधात शासनास निवेदने सादर करण्याची मुदत नंतर १५ फेब्रुवारी १९९८ अशी वाढवून देण्यात आली होती. त्यामुळे राज्यातील विविध शासकीय कर्मचारी व इतर संघटनांकडून व प्रशासकीय विभाग व विभाग प्रमुखांकडून प्राप्त झालेली निवेदने तपासून व सर्व संबंधितांशी विचार-विनीमय करून तीन महिन्यांच्या कालावधीत अहवाल सादर करणे समितीस शक्य झालेले नसल्याने, राज्य वेतन सुधारणा समितीस, मुदतवाढ देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असा आदेश देत आहे की, राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ ला दिनांक ५ मार्च १९९८ पासून पुढे तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात येत आहे. ही समिती आपला अहवाल दिनांक ५ जून १९९८ किंवा शक्य तितक्या लवकर शासनास सादर करील.

□ □

# जोडपत्र--क

दिनांक १ जानेवारी १९९६ पासून अंमलात यावयाच्या वेतन सुधारणेच्या संदर्भात '' राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ '' च्या मुदतवाढीसंबंधीच्या शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२९६/प्र.क्र. ३९/सेवा-१०, दिनांक २७ मे १९९८ चा उतारा--

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२९६/प्र.क्र. ३९/सेवा-१०, दिनांक ५ डिसेंबर १९९७ अन्वये, राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांना, पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींचा सखोल अभ्यास करून, परिक्षणांती सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याकरिता, श्री. द. म. सुकथनकर, माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन ह्यांच्या अध्यक्षतेखाली, त्रिसदस्य, '' राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ '' नियुक्त करण्यात आलेली आहे. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२९६/प्र.क्र. ३९/सेवा-१०, दिनांक १६ मार्च १९९८ च्या आदेशान्वये या समितीस दिनांक ५ जून १९९८ पर्यंतं मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

२. कर्मचारी महासंघाच्या विनंतीनुसार यासंबंधात शासनास निवेदने सादर करण्याची मुदत नंतर १५ फेब्रुवारी १९९८ अशी वाढवून देण्यात आली होती. राज्यातील विविध शासकीय कर्मचारी व इतर संघटनांकडून व प्रशासकीय विभाग व विभाग प्रमुखांकडून प्राप्त झालेली निवेदने तपासून व सर्व संबंधितांशी बैठका आयोजित करून यासंबंधीचा अंतिम अहवाल वाढीव मुदतीत शासनास सादर करणे समितीस शक्य नसल्याने, राज्य वेतन सुधारणा समितीस, मुदतवाढ देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असा आदेश देत आहे की, '' राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ '' ला दिनांक ५ जून १९९८ पासून दिनांक ३१ जुलै १९९८ पर्यंत पुढे मुदतवाढ देण्यात येत आहे. ही समिती मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या पूर्वीच्या '' अन्याय निवारण समितीचा '' अहवाल भाग-एक म्हणून दिनांक ५ जून १९९८ पूर्वी व वेतन सुधारणेसंबंधीचा अंतिम अहवाल दिनांक ३१ जुलै १९९८ किंवा त्यापूर्वी **शक्य तितक्या लवकर** शासनास सादर करील.

□ □

## जोडपत्र–ड

राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या १९८६ च्या वेतन सुधारणेमधील अन्याय निवारणार्थ अन्याय निवारण समितीची नियुक्तीसंबंधीच्या शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर. १२९६/२८/९६/सेवा-१०, दिनांक १२ सप्टेंबर १९९६ चा उतारा––

राज्य शासनाच्या समतुल्य प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला होता. त्यानुसार राज्य शासनाकडील पदांची केंद्र शासनाकडील पदांशी तुलनीयता ठरविण्यासाठी आणि त्यांना योग्य त्या केंद्रीय सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासाठी शासनाने समानीकरण समितीची नियुक्ती केली होती. समानीकरण समितीच्या सुधारित केलेल्या शिफारशींच्या आधारे शासनाकडील आणि जिल्हा परिषदांकडील विविध प्रवर्गातील पदांना तसेच कृषि व कृषितर विद्यापीठे आणि त्यांना संलग्न असलेली महाविद्यालये आणि इतर अनुदानित संस्थांमधील शिक्षकेतर पदांना दिनांक १ जानेवारी १९८६ पासून सुधारित वेतनश्रेणी जाहीर करण्यात आल्या होत्या. या सुधारित वेतनश्रेणीमध्ये त्रूटी राहण्याची शक्यता विचारात घेऊन शासनाने त्रूटी समितीची नियुक्ती केली होती. या समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे विविध संवर्ग पदांच्या सुधारित वेतनश्रेणींमधील त्रूटी दूर करण्यासंबंधीचे आदेश वित्त विभागाच्या दिनांक २९ जून १९९४ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

२. राज्य शासनाने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी प्रथमच तत्सम केंद्रीय सुधारित वेतनश्रेणी लागू केल्या आहेत. अशा सुधारित वेतनश्रेणी विहित करताना वेतन समानीकरण समितीच्या स्थापनेपासून ते वेतनत्रूटी समितीच्या शिफारशींच्या आधारे त्यासंबंधीचे आदेश निर्गमित करण्यासंबंधीच्या प्रक्रियेत काही संवर्ग पदांना सुधारित वेतनश्रेणी विहित करताना अन्याय झाला असण्याची शक्यता आहे. म्हणून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, असा अन्याय झाला असल्यास त्यासंबंधीच्या प्रस्तावांचे परीक्षण करण्यासाठी अन्याय निवारण समिती नेमण्यात यावी. या समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील :––

| | | |
|---|---|---|
| (१) | मा. मंत्री (वित्त व नियोजन) | अध्यक्ष |
| (२) | मुख्य सचिव | सदस्य |
| (३) | प्रधान सचिव (वित्त) | सदस्य |
| (४) | प्रधान सचिव (सेवा), सा. प्र. वि. | सदस्य |
| (५) | उप सचिव, वित्त विभाग, कार्यासन सेवा-१० | सदस्य-सचिव. |

मा. मुख्य मंत्र्यांनी विनिर्दिष्टपणे एखाद्या संवर्ग पदाच्या वेतन सुधारणेबाबत झालेल्या अन्यायाचे निवारण करण्यासंबंधात निदेश दिलेल्या प्रस्तावांचे देखील उपरोक्त समिती परीक्षण करील व असा अन्याय झालेल्या प्रकरणांबाबत ती मंत्रिमंडळापुढे मंजुरीसाठी ठेवण्यात यावीत अशी शिफारस करील.

३. एखाद्या विशिष्ट संवर्ग पदास सुधारित वेतनश्रेणी विहित करताना अन्याय झाला असल्याबाबतची प्रशासकीय विभागाची खात्री पटल्यास अशी प्रकरणे व वर नमूद केलेली मा. मुख्य मंत्र्यांनी विनिर्दिष्टपणे निर्देशित केलेली प्रकरणे त्या विभागाने वित्त विभागास पुरेशा समर्थनासह व आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रतींसह पाच प्रतीत उपरोक्त समितीसमोर ठेवण्यासाठी विभागाच्या सचिवांच्या मान्यतेने पाठवावीत.

□ □

## जोडपत्र–इ

राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या १९८६ च्या वेतन सुधारणेमधील अन्याय निवारणार्थ अन्याय निवारण समितीच्या नियुक्तीसंबंधीच्या शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर. १२९६/प्र. क्र. ३९/९६/सेवा-१०, दिनांक ३१ जानेवारी १९९७ चा उतारा––

राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या १९८६ च्या वेतन सुधारणेमधील अन्याय निवारणार्थ, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२९६/२८/९६/सेवा-१०, दिनांक १२ सप्टेंबर १९९६ अन्वये मा. मंत्री, वित्त व नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली अन्याय निवारण समितीची नियुक्ती करण्यात आली आहे.

शासन याबाबत आता असे आदेश देत आहे की, उपरोक्त समितीस प्रस्ताव सादर करण्याची मुदत दिनांक ३१ मार्च १९९७ पर्यंत निर्धारित करण्यात येत आहे. सर्व प्रशासकीय विभागांना त्यामुळे विनंती करण्यात येते की, वेतन सुधारणेमधील अन्याय निवारण करण्याबाबतचे प्रस्ताव विभागांनी सदर समितीच्या वरील कालावधीत वित्त विभागाकडे पाठविण्याची व्यवस्था करावी. दिनांक १ एप्रिल १९९७ नंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर विचार केला जाणार नाही, याची सर्व प्रशासकीय विभागांनी नोंद घ्यावी.

□ □

# राज्य वेतन सुधारणा समिती
# १९९७

## अहवाल

**भाग-१**

# प्रभाग एक

# प्रस्ताव क्रमांक--एक

| | |
|---|---|
| **प्रशासकीय विभाग** | : कृषी व सहकार विभाग |
| **विभाग प्रमुख** | : कृषी संचालनालय |
| **प्रस्ताव** | : मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे येथील अनुरेखक संवर्गातील तत्सम पदांना केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाचे क्रमांक १३ (१)/आयसी/९१, दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ चे आदेश लागू करणेबाबत. |
| **समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** | : १९७७ साली घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक १ जानेवारी १९८६ पासून लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीच्या संदर्भात नियुक्त केलेल्या वेतन समानीकरण समितीने केंद्र शासनाकडे तत्सम पदे आढळून आल्यामुळे तेथे राज्य शासनाकडील पदांना तेथील पदांची समकक्षता व सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत शिफारस केली. या शिफारशींच्या अनुषंगाने राज्यातील अनुरेखक/सहायक आरेखक व आरेखक या पदांना अनुक्रमे रु. ९७५--१५४०, रु. १२००--२०४० व रु. १४००--२३०० या वेतनश्रेणी मंजूर केल्या आहेत. केंद्र शासनाने त्यांचे दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ च्या आदेशान्वये केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाबाहेरील आरेखक संवर्गातील पदांना त्यांच्या सेवाप्रवेश नियमांचा विचार न करता ठराविक कालावधीनंतर वरच्या वेतनश्रेणी मंजूर केल्या आहेत. राज्य शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाचा विचार करता व वेतन समानीकरण समितीने विचाराधीन पदांना केंद्र शासनाकडील पदांची समकक्षता दिल्याची बाब लक्षात घेता केंद्र शासनाच्या दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ च्या आदेशाचा लाभ राज्य शासनाकडील अनुरेखक या पदास अनुज्ञेय करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे. |

२. पूर्वलक्षी प्रभावाने श्रेणीवाढ करण्याबाबत शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील अनुरेखक संवर्गातील पदांना केंद्र शासनाच्या दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ च्या आदेशाचा लाभ दिनांक १ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने काल्पनिकरीत्या मंजूर करण्यात यावा. दिनांक १ जानेवारी १९८६ ते ३१ मार्च १९९४ पर्यंतची कोणत्याही प्रकारची थकबाकी संबंधितांना प्रदान करण्यात येऊ नये. दिनांक १ जानेवारी १९९४ ते ३१ डिसेंबर १९९६ पर्यंतची थकबाकी संबंधितांना प्रत्यक्ष रोखीने प्रदान न करता ती त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यात यावी व फक्त दिनांक १ जानेवारी १९९७ नंतरची थकबाकी रोखीने प्रदान करण्यात यावी.

३. दिनांक ७ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे सचिव उपस्थित नव्हते. मात्र संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक—–दोन

| | |
|---|---|
| **प्रशासकीय विभाग** | : कृषी व सहकार विभाग |
| **विभाग प्रमुख** | : संचालक, मत्स्य व्यवसाय संचालनालय |
| **प्रस्ताव** | : मत्स्यव्यवसाय शाळांमधील शिक्षकांना चट्टोपाध्याय समितीच्या त्रिस्तरीय वेतनश्रेणी विहित करण्याबाबत. |

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : मत्स्यव्यवसाय आयुक्तालयाच्या अधिपत्याखाली मत्स्यव्यवसाय शाळेमधील प्रशिक्षित पदवीधर, एस.एस.सी.,डी., एड./पी.टी.सी., पी.एस.सी./पी.टी.सी. आणि चित्रकला शिक्षक ही ४ पदे शिक्षकीय पदे असल्यामुळे याबाबत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने या ४ पदांना चट्टोपाध्याय आयोगाच्या शिफारशींवर आधारित, अनुक्रमे रु. १६४०—–२९०० आणि रु. २०००—–३५००, रु. १४००—–२६०० आणि रु. १६४०—–२९००, रु. १२००—–१८०० आणि रु. १३५०—–२२०० व रु. १४००—–२६०० आणि रु. १६४०—–२९०० या वेतनश्रेणी अनुक्रमे वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणी म्हणून, सुधारित वेतनश्रेणीच्या मान्य आकृतीबंधांतर्गत मंजूर करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे. संबंधित शिक्षकांना, यासंबंधीचा लाभ शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२८९/१३७/सेवा-१०, दिनांक १ फेब्रुवारी १९९० मधील तरतुदींच्या अधीन अनुज्ञेय राहील.

२. मत्स्यव्यवसाय निर्देशक हे पद शिक्षकीय पद नसल्याचे विभागानेच बैठकीत स्पष्ट केल्यामुळे या पदास त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही.

३. नौका निर्देशक हे पद शिक्षकीय पद आहे किंवा कसे हे ठरविण्यासाठी अशी पदे कार्यरत असलेल्या इतर विभागांचे अभिप्राय मागवून यावर सर्वंकष निर्णय घेणे संयुक्तिक होईल.

४. दिनांक ५ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे सचिव व संघटनेचें पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक––तीन

**प्रशासकीय विभाग** : कृषी व सहकार विभाग

**विभाग प्रमुख** : कृषी विद्यापीठे

**प्रस्ताव** : कृषी विद्यापीठातील सहायक कुलसचिव, उप कुलसचिव व कुलसचिव या पदांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणी विहित करण्याबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : कृषी विद्यापीठातील कुलसचिव, उप कुलसचिव व सहायक कुलसचिव या पदांवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना पार पाडावी लागणारी जबाबदारी व त्यांच्यावरील कामाचा भार हा तत्सम पदे धारण करणाऱ्या अकृषी विद्यापीठातील अधिकाऱ्यांची सम-समान आहे असे म्हणणे योग्य होईल असे वाटत नाही. कृषी विद्यापीठांना संलग्न महाविद्यालये नाहीत किंवा त्यांची संख्या नगण्य आहे. मुख्यत्वे या कारणामुळे या विद्यापीठातील उपरोक्त पदांवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कर्तव्ये व कामाचा व्याप आणि भार तसेच जबाबदारीची कठिणता (**onerousness**) तुलनेने कमी आहे असेच म्हणावे लागेल. किंबहुना याच कारणामुळे आजतागायत उपरोक्त पदांवर कृषी व अकृषी विद्यापीठात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणी वेगवेगळ्या राहिलेल्या आहेत. कुलसचिवांची पदे महसूल व वन विभागातील अप्पर जिल्हाधिकारी किंवा उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने भरली जातात व हे पदधारक आपल्या मूळ (पूर्वीच्या) पदाची वेतनश्रेणी वैयक्तिक वेतनश्रेणी म्हणून अंगिकारतात असे खुद्द कृषी विभागामार्फतच स्पष्ट करण्यात आले आहे. ही एकूण कारणे व पार्श्वभूमी लक्षात घेता हा प्रसताव नाकारण्यात यावा अशी शिफारस आहे.

२. दिनांक ३ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक––चार

| | |
|---|---|
| **प्रशासकीय विभाग** | : कृषी व सहकार विभाग |
| **विभाग प्रमुख** | : कृषी विद्यापीठे |
| **प्रस्ताव** | : कृषी विद्यापीठातील कृषी सहायक व कृषी पर्यवेक्षक/कनिष्ठ संशोधन सहायक व कृषी अधिकारी/वरिष्ठ संशोधन सहायक या पदांना कृषी विभागाच्या दिनांक ८ डिसेंबर १९९४ च्या आदेशांचा लाभ देण्याबाबत. |
| **समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** | : मूळ प्रशासकीय विभागातील पदास देण्यात आलेली वेतनश्रेणी त्या पदास समतुल्य असलेल्या इतर प्रशासकीय विभागांकडील तत्सम पदांना मंजूर करण्याबाबतचे शासनाचे प्रचलित धोरण आहे. कृषी विद्यापीठे, कृषी व पदुम या प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखाली येत असल्याने व कृषी अधिकारी श्रेणीतील कृषी आयुक्तालयामधील पदांना कृषी विद्यापीठातील पदे, (त्यांचे सेवाप्रवेश नियम, कर्तव्ये आणि जबाबदारीचा विचार करता) समतुल्य असल्यामुळे आणि वर नमूद केलेले शासनाचे प्रचलित धोरण विचारात घेता, कृषी व पदुम विभागाचे दिनांक ८ डिसेंबर १९९४ चे आदेश कृषी विद्यापीठातील उपरोकत तत्सम पदांना लागू करण्यास हरकत नसावी. |

२. दिनांक ३ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रस्ताव क्रमांक--पाच

| | |
|---|---|
| **प्रशासकीय विभाग** | : कृषी व सहकार विभाग |
| **विभाग प्रमुख** | : कृषी विद्यापीठे |
| **प्रस्ताव** | : कृषी विद्यापीठातील वरिष्ठ संशोधन सहायक या पदास श्रीमती ना. दा. ठा. विद्यापीठाकडील तत्सम पदाची वेतनश्रेणी समकक्षतेच्या आधारे लागू करण्याबाबत. |

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : वेतन समानीकरण समितीने वरिष्ठ संशोधन सहाय्यक या पदाची तुलना जिल्हा कृषी अधिकारी या पदाशी करून या पदास रु. २०००--३५०० ही सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत शिफारस केली होती व ही शिफारस स्वीकृत होऊन त्याप्रमाणे या पदास रु. २०००--३५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. कृषी विभागाने याबाबत असे निदर्शनास आणून दिले आहे की, वरिष्ठ संशोधन सहायक या पदाचे सेवाप्रवेश नियम आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेता हे पद जिल्हा कृषी अधिकारी या पदाशी समतुल्य नसून वरच्या दर्जाचे आहे. शिवाय, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठामधील वरिष्ठ संशोधन सहायक या रु. ६८०--१२५० या असुधारित वेतनश्रेणीतील वरिष्ठ संशोधन सहायक या पदास रु. २२००--३७०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. संदर्भाधीन पदांची द्वितीय श्रेणीतील कृषी शास्त्रीय पदव्युत्तर पदवी ही अर्हता व जिल्हा कृषी अधिकारी या पदाशी असलेली भिन्नता विचारात घेता या पदास रु. २२००--३७०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यास हरकत नसावी.

२. पूर्वलक्षी प्रभावाने श्रेणीवाढ करण्याबाबत शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने वरील पदास रु. २२००--३७०० ही वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने काल्पनिकरित्या मंजूर करण्यात यावी. दिनांक १ जानेवारी १९८६ ते ३१ मार्च १९९४ पर्यंतची कोणत्याही प्रकारची थकबाकी संबंधितांना प्रदान करण्यात येऊ नये. दिनांक १ एप्रिल १९९४ ते ३१ डिसेंबर १९९६ पर्यंतची थकबाकी संबंधितांना प्रत्यक्ष रोखीने प्रदान न करता ती त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यात यावी व फक्त दिनांक १ जानेवारी १९९७ नंतरची थकबाकी रोखीने प्रदान करण्यात यावी.

३. दिनांक ३ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक––सहा

**प्रशासकीय विभाग** : कृषी व सहकार विभाग

**विभाग प्रमुख** : पंजाबराव कृषी विद्यापीठे

**प्रस्ताव** : ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा व अमरावती येथील शिक्षक पदांना उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाच्या दिनांक २५ मार्च १९९४ व शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर १९९४ च्या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेल्या वेतनश्रेणी समकक्षता निश्चित करून विहित करण्याबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : कृषी विद्यापीठाने याबाबत असे स्पष्ट केले आहे की, १९७६ पूर्वी उपरोक्त ग्रामीण शिक्षण संस्थांमधील शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाची वेतनश्रेणी अनुज्ञेय होती. त्यानंतर त्या पदांस अनुक्रमे रु. ६००––१९५० व रु. ५००––९०० व दिनांक १ जानेवारी १९८६ पासून रु. २०००––३५०० व रु. १४००––२६०० + विशेष वेतन रु. १२५ मंजूर करण्यात आले. कृषी विद्यापीठाने या पदांच्या अर्हता, या संस्थांमध्ये शिकविला जाणारा अभ्यासक्रम इ. बाबी विचारात घेता या पदांची तुलना + २ स्तरावरील प्राचार्य व व्यावसायिक शिक्षकांशी करणे योग्य असल्याचे स्पष्ट केले आहे. ही स्पष्ट झालेली तुलना व समकक्षता विचारात घेता उपरोक्त ग्रामीण शिक्षण संस्थांमधील प्राचार्य व अधिव्याख्यात्यांना अनुक्रमे रु. २२००––३७०० + रु. १०० विशेष वेतन व १२ वर्षांनंतर वरिष्ठ वेतनश्रेणी रु. २५००––४००० + रु. १०० विशेष वेतन, शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्रमांक एसएसएन २६९३/११५/माशि-२, दिनांक १४ सप्टेंबर १९९५ मधील निर्णयाप्रमाणे आणि रु. २०००––३५०० व रु. २५००––४००० (वरिष्ठ श्रेणी १२ वर्षांनंतर), उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पीटीएस २२९२/६५६३९/(२३६५)/व्यशि-४, दिनांक २५ मार्च १९९४ च्या आदेशाप्रमाणे, मंजूर करण्यास हरकत नसावी. याचाच अर्थ प्राचार्य या पदास दिनांक १ जानेवारी १९८६ पासून रु. २२००––३७०० व अधिव्याख्याता या पदास दिनांक १ जानेवारी १९८६ पासून रु. २०००––३५०० ही वेतनश्रेणी उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने अनुज्ञेय राहील.

२. पूर्वलक्षी प्रभावाने श्रेणीवाढ करण्याबाबत शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने प्राचार्य पदास रु. २२००––३७०० व अधिव्याख्याता या पदास रु. २०००––३५०० ही वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने काल्पनिकरीत्या मंजूर करण्यात यावी. दिनांक १ जानेवारी १९८६ ते ३१ मार्च १९९४ पर्यंतची कोणत्याही प्रकारची थकबाकी संबंधितांना प्रदान करण्यात येऊ नये. दिनांक १ एप्रिल १९९४ ते ३१ डिसेंबर १९९६ पर्यंतची थकबाकी संबंधितांना प्रत्यक्ष रोखीने प्रदान न करता ती त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यात यावी व फक्त दिनांक १ जानेवारी १९९७ नंतरची थकबाकी रोखीने प्रदान करण्यात यावी.

३. दिनांक ३ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रस्ताव क्रमांक––सात

| | |
|---|---|
| **प्रशासकीय विभाग** | : शिक्षण व सेवायोजन विभाग |
| **विभाग प्रमुख** | : संचालक, शिक्षण संचालनालय |
| **प्रस्ताव** | : संगीत शिक्षकांना चट्टोपाध्याय समितीच्या त्रिस्तरीय वेतनश्रेणी विहित करण्याबाबत |
| **समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** | : संगीत शिक्षक हा प्रवर्ग देखील शिक्षकीय पद म्हणून गणला जात असल्यामुळे व या पदास केंद्र शासनाने देखील त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर केलेल्या असल्यामुळे एक तत्त्व म्हणून राज्य शासनाकडील संगीत शिक्षकांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे. केंद्र शासनाकडील संगीत शिक्षकांची पदे वरच्या वेतनश्रेणीत असल्यामुळे तेथील त्रिस्तरीय वेतनश्रेणी त्या अनुषंगाने वरच्या टप्प्यातील आहेत. राज्य शासनाकडील संगीत शिक्षक सध्या रु. १२००––२०४० व रु. १३५०––२२०० या मूळ वेतनश्रेणीत असल्यामुळे त्यांना रु. १४००––२६०० व रु. १६४०––२९०० या सामाईक वेतनश्रेणी अनुक्रमे वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणी म्हणून, मंजूर करण्यात याव्यात. संबंधीत संगीत शिक्षकांना, यासंबंधीचा लाभ शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक चवेआ १०८९/१११/मा.शि. २, दिनांक २ सप्टेंबर १९८९ मधील तरतुदींच्या अधीन राहून अनुज्ञेय राहील. |
| | २. तबलावादक हे शिक्षकीय पद नसल्यामुळे या पदास त्रिसतरीय वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत शिफारस करण्यात येत नाही. |
| | ३. दिनांक ५ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाच्या सचिव उपस्थित होत्या. |

## प्रस्ताव क्रमांक--आठ

**प्रशासकीय विभाग** : शिक्षण व सेवायोजन विभाग

**विभाग प्रमुख** : संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय

**प्रस्ताव** : तंत्रशिक्षण संचालनालयातील प्रशासकीय पदांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेतनश्रेणी लागू करणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : तंत्रशिक्षण संचालनालयामधील विविध प्रशासकीय पदांवर त्यांच्या सेवाप्रवेश नियमांच्या अनुषंगाने शिक्षकीय पदावरून बदलीने वा पदोन्नतीने नेमणूक करण्यात येते. तेथील शिक्षकीय पदांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने पुरस्कृत केलेल्या वरच्या वेतनश्रेणी लागू करण्यात आल्यामुळे व प्रशासकीय पदाच्या वेतनश्रेणी या निम्मस्तर असल्यामुळे उपरोक्त सेवाप्रवेश नियमांची अंमलबजावणी दुरापास्त झाली आहे. या संचालनालयातील विविध प्रशासकीय पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी शिक्षकीय पदांसाठी विहित केलेल्या उच्च अशा शैक्षणिक अर्हतेची आवश्यकता नसल्याचे चर्चेत दिसून आले. प्रशासकीय पदे धारण करणाऱ्यांना मुख्यतः व्यवस्थापकीय आणि प्रशासनिक स्वरुपाचीच कर्तव्ये पार पाडावी लागतात. त्यामुळे या पदांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने पुरस्कृत केलेल्या शिक्षकीय पदांसाठीच्या वेतनश्रेणी मंजूर करता येण्यासारख्या नाहीत अशी शिफारस करण्यात येत आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाने तिकडील प्रशासकीय पदे व शिक्षकीय पदे या दोन प्रकारच्या पदांचे वेगवेगळे संवर्ग करावेत व ती भरण्याकरिता वेगवेगळे मार्ग-तथा-सेवाप्रवेश नियम विहित करावेत अशीही शिफारस करण्यात येते. अध्यक्ष तंत्र परीक्षा मंडळ, यासारख्या पदांकरिता, ज्यांची दैनंदिन कर्तव्ये पार पाडण्यासाठी उच्च शैक्षणिक अर्हतेची आवश्यकता आहे, त्यांचा अपवाद करून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने पुरस्कृत केलेली त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमास अनुलक्षून योग्य अशी वेतनश्रेणी मंजूर करण्यास या समितीची हरकत राहणार नाही.

२. दिनांक १२ फेब्रुवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे प्रधान सचिव, संचालक तंत्रशिक्षण संचालनालय व इतर अधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक--नऊ

**प्रशासकीय विभाग** : शिक्षण व सेवायोजन विभाग

**विभाग प्रमुख** : संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय

**प्रस्ताव** : तंत्र निकेतनातील ग्रंथपाल या पदास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेतनश्रेणी विहित करणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामधील ग्रंथपालांना तेथील शिक्षकीय पदापैकी '' अधिव्याख्याता '' यापदाची रु. २२००--४००० ही मूळ वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे व रु. ३०००--५००० व रु. ३७००--५७०० या वेतनश्रेणी अनुक्रमे वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत. शासकीय तंत्र निकेतनामधील शिक्षकीय पदांपैकी '' अधिव्याख्याता '' या पदास रु. २२००--३७०० ही अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशींवर आधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली असून रु. ३०००--४५०० व रु. ३७००--५३०० या वेतनश्रेणी अनुक्रमे वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी म्हणून मंजूर केलेल्या आहेत. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्र निकेतन सध्या एकाच संचालनालयाखाली कार्यरत आहेत. दोन्हीकडील ग्रंथपालांची ज्येष्ठता सूची सामाईक होती. तसेच दोन्हीकडील '' ग्रंथपाल '' या पदाचे सेवाप्रवेश नियम व कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या देखील सारख्याच होत्या. हे सर्व पहाता आणि उपरोक्त तंत्रशिक्षण संस्थांतील '' ग्रंथपाल '' हे पद शिक्षकीय पद असल्याचे मान्य झाले असल्यामुळे, तंत्र निकेतनामधील ग्रंथपाल या पदास रु. २२००--३७०० आणि रु. ३०००--४५०० ही वरिष्ठ श्रेणी व रु. ३७००--५३०० ही निवड श्रेणी, त्यासंबंधीच्या अटी व शर्तीच्या मधीन राहून, मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद किंवा केंद्र शासनाने, तंत्र निकेतनामधील '' ग्रंथपाल '' या पदास या परिषदेच्या शिफारशींवर आधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कळविले नसल्यामुळे, तंत्र निकेतनामधील या पदास अभियांत्रिकी महाविद्यालयामधील '' ग्रंथपाल '' या पदास ज्या दिवसापासून या परिषद-पुरस्कृत वेतनश्रेणी लागू करण्यात आलेल्या आहेत नेमक्या त्यांच दिवसापासून तशा वेतनश्रेणी लागू करता येण्यासारख्या नाहीत. पूर्वलक्षी प्रभावाने श्रेणीवाढ करण्याबाबत शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने तंत्र निकेतनातील ग्रंथपाल या पदास उपरोक्त वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने काल्पनिकरित्या मंजूर करण्यात यावी. दिनांक १ जानेवारी १९८६ ते ३१ मार्च १९९४ पर्यंतची कोणत्याही प्रकारची थकबाकी संबंधितांना प्रदान करण्यात येऊ नये. दिनांक १ एप्रिल १९९४ ते ३१ डिसेंबर १९९६ पर्यंतची थकबाकी संबंधितांना प्रत्यक्ष रोखीने प्रदान न करता ती त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यात यावी. फक्त दिनांक १ जानेवारी १९९७ नंतरची थकबाकी रोखीने प्रदान करण्यात यावी.

३ शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामधील ग्रंथपाल व तंत्र निकेतनामधील ग्रंथपाल यांना प्रत्येकी तेथील अधिव्याख्याता या पदाप्रमाणे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने पुरस्कृत केलेल्या त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्यात येत असल्यामुळे व या दोन शासकीय तंत्रशिक्षण संस्थांतील ग्रंथपालांची ज्येष्ठता सूची सामाईक असल्यामुळे, अभियांत्रिकी महाविद्यालयामधील उच्चस्तर त्रिस्तरीय वेतनश्रेणीचा लाभ या सामाईक ज्येष्ठता सूचीमधील ज्येष्ठ व पात्र ग्रंथपालांना मिळणे रास्त होईल. त्यामुळे ज्येष्ठता, पात्रता आणि इच्छुकता हे निकष विचारात घेऊन व त्यासंबंधीचा विकल्प संबंधितांकडून मागवून ज्येष्ठ व पात्र कर्मचाऱ्यांना अभियात्रिकी महाविद्यालयामध्ये जाण्याबाबतचा विकल्प देण्यास मुभा असावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

४. दिनांक ७ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे प्रधान सचिव तसेच संघटनेचे पदाधिकारी व दिनांक १२ फेब्रुवारी १९९८ रोजी झालेल्या बैठकीस प्रशासकीय विभागाचे प्रधान सचिव उपस्थित होते.

# प्रस्ताव क्रमांक––दहा

| | |
|---|---|
| **प्रशासकीय विभाग** | : शिक्षण व सेवायोजन विभाग |
| **विभाग प्रमुख** | : संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय |
| **प्रस्ताव** | : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील शासकीय/अशासकीय अनुदानित तंत्र व माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील निदेशकांना द्विस्तरीय/त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत |
| **समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** | : उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाच्या दिनांक १५ मे १९९५ च्या आदेशान्वये शासकीय/अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील निदेशकांना/गट निदेशकांना त्रिस्तरीय/द्विस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. याबाबत वेतननिश्चितीमध्ये येणाऱ्या अडचणी निवारण्यासाठी शालेय शिक्षण विभागाच्या यासंबंधीच्या इतर आदेशामधील सवलतींचा लाभ देण्याबाबतचा प्रस्ताव संमत करताना शिक्षकांना लागू करण्यात आलेल्या त्रिस्तरीय वेतनश्रेणीमध्ये एकवाक्यता राखण्याच्या दृष्टीने निवडश्रेणीची पदें एकूण पदसंख्येच्या २० टक्के असावीत असे ठरविण्यात आले होते. इतरत्रेही निवडश्रेणीची पदें एकूण पदसंख्येच्या २० टक्के असल्यामुळे, निदेशकांनाही लागू करण्यात आलेल्या त्रिस्तरीय वेतनश्रेणीमधील निवडश्रेणी पदे देखील एकूण पदसंख्येच्या २० टक्के असणे आवश्यक आहे. |

२. राज्यात निदेशकाचे/गट निदेशकाचे पद पूर्वी अशिक्षकीय पद म्हणूनच समजण्यात येत होते, कारण या पदाच्या धारकांना शिक्षक आमदारांच्या निवडणूकीमध्ये मतदानाचा हक्क असलेल्या शिक्षक मतदारांच्या यादीत समावेश होत नाही व शिक्षकांप्रमाणे त्यांना शालेय सत्र संपल्यानंतरची उन्हाळी सुटी (Summer Vacation) देखील अनुज्ञेय नाही. परंतु तरीही या पदाला शिक्षकीय पदाना लागू करण्यात आलेल्या त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाने एका विशिष्ट तारखेस जाणीवपूर्वक घेतला असल्यामुळे, त्रिस्तरीय वेतनश्रेणीची योजना या पदास पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येण्यासारखी नाही.

३. दिनांक ५ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे प्रधान सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक––अकरा

**प्रशासकीय विभाग** : शिक्षण व सेवायोजन विभाग

**विभाग प्रमुख** : संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये, मुंबई

**प्रस्ताव** : पुरातत्व विभागातील बगीचा उप आवेक्षक या पदास कृषी सहायकाप्रमाणे वेतनश्रेणी विहित करणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : पुरातत्व व वस्तुसंग्रालये संचालनालयातील बगीचा उप आवेक्षकाचे केवळ १ पद सध्या अस्तित्वात आहे. या पदाची सेवाप्रवेश अर्हता शेतकी विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा वा तत्सम परीक्षा उत्तीर्ण अशी आहे. तसेच २ वर्षाचा शेतकी शाळेचा अभ्यासक्रम किंवा कृषी पदवधिर असे सुधारित सेवाप्रवेश नियम अंमलात यावयाचे आहेत. या संचालनालयातील उप आवेक्षक पदाचे धारक कृषी पदविका (२ वर्षाचा कृषी अभ्यासक्रम) ही अर्हता धारण करीत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील रु. २६०––४९५ या असुधारित वेतनश्रेणीतील बगीचा उप आवेक्षक या पदास शैक्षणिक अर्हतेच्या आधारे रु. १२००––१८०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. प्राप्त परिस्थितीत, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयातील बगीचा उप आवेक्षक या पदास रु. १२००––१८०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत समिती शिफारस करीत आहे.

२. पूर्वलक्षी प्रभावाने श्रेणीवाढ करण्याबाबत शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने बगीचा उप आवेक्षक या पदास रु. १२००––१८०० ही वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने काल्पनिकरित्या मंजूर करण्यात यावी. दिनांक १ जानेवारी १९८६ ते ३१ मार्च १९९४ पर्यंतची कोणत्याही प्रकारची थकबाकी संबंधिताना प्रदान करण्यात येऊ नये. दिनांक १ एप्रिल १९९४ ते ३१ डिसेंबर १९९६ पर्यंतची थकबाकी संबंधिताना प्रत्यक्ष रोखीने प्रदान न करता ती त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करणयात यावी व फक्त दिनांक १ जानेवारी १९९७ नंतरची थकबाकी रोखीने प्रदान करण्यात यावी.

३. दिनांक ७ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे सचिव तसेच संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक––बारा

**प्रशासकीय विभाग** : वित्त विभाग

**विभाग प्रमुख** : आयुक्त, विक्रीकर विभाग

**प्रस्ताव** : विक्रीकर विभागातील विविध राजपत्रित पदांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : राज्यातील इतर प्रशासकीय विभागाच्या अखत्यारीतील पदें त्यांचे सेवाप्रवेश नियम व कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यांचा विचार करता सर्वस्वी भिन्न असल्याने, अशा भिन्न पदाशी विक्रीकर विभागातील पदांची केलेली तूलना अप्रस्तुत ठरते. इतर विभागातील राजपत्रित पदांना दिलेली वरची वेतनश्रेणी व दर्जा विक्रीकर विभागातील तथाकथित समकक्ष पदांना देता येण्यासारखा नाही.

२. विक्रीकर विभागातील पदांची केंद्र शासनाच्या आयकर खात्यातील पदांशी केलेली तुलना देखिल अवास्तव वाटते. दोन्हीमधील कर निर्धारणा व कर गोळा करण्याच्या पद्धतीत लक्षणीय फरक व तफावत आहे. खेरीज, केंद्र शासनाच्या पदांशी येथील पदांची तुलना करण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या वेतन समानीकरण समितीने देखिल विक्रीकर विभागातील पदांची तुलना केंद्र शासनाच्या आयकर विभागातील पदांशी केलेली नाही.

३. विक्रीकर अधिकारी वर्ग–१ या पदास रु. २२००––३७०० ही वेतनश्रेणी या पदाची रु. ६८०––१२५० ही पूर्वीची असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन दिलेली आहे. इतरत्र, रु. २२००––४००० ही सुधारित वेतनश्रेणी रु. ६८०––१५०० या वरच्या असुधारित वेतनश्रेणीतील पदांना दिलेली आहे. शिवाय, काही सुरळक ठिकाणी रु. २२००––३७०० या पदास रु. २२००––४००० या वेतनश्रेणीतील पद पदोन्नतीचे पद आहे. या दोन पदामधील तफावत कायम ठेवण्याच्या दृष्टीने उच्चाधिकार सचिव समितीने रु. ६८०––१२५० व रु. ६८०––१५०० या दोन पूर्वीच्या असुधारित वेतनश्रेणीसाठी रु. २२००––३७०० व रु. २२००––४००० या दोन सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत सुचविलेले आहे. या परिस्थितीत, रु. ६८०––१२५० या असुधारित वेतनश्रेणीतील पदांना रु. २२००––४००० ही वरची वेतनश्रेणी देण्याबाबत शिफारस नाही.

४. दिनांक ६ जानेवारी १९९८ रोजी वरील बैठकीस प्रशासकीय विभागाने उप सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रस्ताव क्रमांक––तेरा

**प्रशासकीय विभाग** : वित्त विभाग

**विभाग प्रमुख** : आयुक्त, विक्रीकर विभाग

**प्रस्ताव** : विक्रीकर विभागातील निरिक्षक या पदास मंत्रालयीन सहाय्यकाप्रमाणे रु. १६४०––२९०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : सर्वसाधारणतः दर १० वर्षाने होणाऱ्या सार्वत्रिक वेतन सुधारणेच्यावेळी विविध पदांच्या पूर्वीच्या वेतनश्रेणीमधील सापेक्षता काही ठिकाणी अबाधित रहात नाही. १९७७ साली शासनाने असा निर्णय घेतला होता की, '' यापुढे राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी सुधारण्यासाठी राज्य शासनाकडून स्वतंत्र आयोग नेमण्यात येणार नाही. जेव्हा जेव्हा केंद्र सरकार वेतन आयोग नियुक्त करेल, तेव्हा तेव्हा वेतनश्रेणी विषयीच्या त्या आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र सरकारचे निर्णय राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. '' दिनांक १ जानेवारी १९८६ पासून शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासंबंधात शिफारस करण्याबाबत नियुक्त केलेल्या वेतन समानीकरण समितीने मंत्रालयातील '' सहायक '' या पदास केंद्र शासनाच्या केंद्रीय सचिवालयातील सहाय्यकांची समकक्षता दिल्यामुळे येथील '' सहायक '' या पदास तेथील '' सहायक '' या पदाची रु. १४००––२६०० ही सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत शिफारस केली होती. त्यानंतर, केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाने केंद्र शासनाकडील '' सहायक '' या पदास रु. १६४०––२९०० ही वरची वेतनश्रेणी देण्याबाबतचे निदेश दिल्याने, केंद्र तथा राज्य शासनाकडील '' सहायक '' या पदास परिणाम–स्वरूप रु. १६४०––२९०० ही वेतनश्रेणी त्यानंतर मंजूर करण्यात आली आहे. या परिस्थितीत, केवळ एकच सेवाप्रवेश पद्धती दोन पदांच्या बाबतीत अवलंबिण्यात येत असल्यामुळे, संबंधित पदधारकांच्या पदस्थापनेनंतर त्यांना निभाव्या लागणाऱ्या कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यांतील भिन्नता दुर्लक्षित करून अशा पदांना एकच वेतनश्रेणी विहित करणे हे, विशेषकरून राज्य शासनाच्या वरील धोरणात्मक निर्णय विचारात घेता, उचित होणार नाही. या परिस्थितीत मंत्रालयातील सहायकांची रु. १६४०––२९००, ही वेतनश्रेणी विक्रीकर निरिक्षक या पदास मंजूर करता येण्यासारखी नाही अशी समिती शिफारस करीत आहे.

२. ज्येष्ठ विक्रीकर निरिक्षक व विक्रीकर निरिक्षक या पदांचे संमिल्लीकरण करण्यासंबंधीची बाब या समितीच्या कार्यकक्षेत येत नसल्यामुळे त्यावर या समितीचे अभिप्राय नाहीत.

३. दिनांक ६ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे उप सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक--चौदा

**प्रशासकीय विभाग** : वित्त विभाग

**विभाग प्रमुख** : आयुक्त, विक्रीकर विभाग

**प्रस्ताव** : विक्रीकर विभागातील उपहारगृहातील कर्मचाऱ्यांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : राज्य शासनाच्या मंत्रालय, विधान भवन, कोकण भवन, नवी मुंबई इत्यादी ठिकाणी कार्यरत असलेल्या उपहारगृहांच्या व्याप्तीमध्ये स्थल-निहाय, तेथील स्थानिक स्थिती विचारात घेता, फरक असल्याचे दिसते. या उपहारगृहांमधील पदांच्या असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन वेतन समानीकरण समितीने सुधारीत वेतनश्रेणी विहित करण्याबाबत शिफारस केली होती. हे लक्षात घेता, विक्रीकर विभागातील उपहारगृहामधील पदांना त्यांच्या असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतमश्रेणी योग्य वाटतात. या सर्व उपहारगृहांचा आढावा घेऊन त्यांचे एकूण आर्थिक व्यवहार, कर्मचारीवृंद, कामाचा भार इत्यादींची तौलानिक पडताळणी-तथा-मूल्यमापन करणे वा पदांची श्रेणीवाढ करणे या समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

२. दिनांक ६ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे उप सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक––पंधरा

**प्रशासकीय विभाग** : वित्त विभाग

**विभाग प्रमुख** : संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय

**प्रस्ताव** : लेखा व कोषागारे संचालनालयातील विविध राजपत्रित पदांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर करणे.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : विभाग प्रमुखांच्या सुधारित वेतनश्रेणी निर्धारित करताना वेतन समानीकरण समितीने त्यांच्या असुधारित वेतनश्रेणी व आपआपसातील सापेक्षता व प्रशासकीय विभागाच्या सचिवांच्या वेतनश्रेणीशी असलेली त्यांची सापेक्षता अबाधित राहील याची काळजी घेतल्याचे दिसते. या परिस्थितीत, केवळ संचालक, लेखा व कोषागारे या विभाग प्रमुखाची सुधारित वेतनश्रेणी उंचावता येण्यासारखी नाही. वेतन समानीकरण समितीस लेखा व कोषागारे संचालनालयामधील कोणत्याही पदास समकक्ष असलेले पद केंद्र शासनाकडे आढळल्याचे दिसत नाही. या परिस्थितीत, या संचालनालयातील राजपत्रित पदांची केंद्र शासनाच्या महालेखापाल कार्यालयातील पदाशी केलेली तुलना योग्य वाटत नाही. पदांची श्रेणीवाढ करण्याबाबतचा प्रश्न या समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

२. दिनांक ६ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाच्या सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक––सोळा

| | |
|---|---|
| **प्रशासकीय विभाग** | : वित्त विभाग |
| **विभाग प्रमुख** | : संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय |
| **प्रस्ताव** | : लेखा व कोषागारे संचालनालयातील विविध अराजपत्रित पदांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर करणे. |
| **समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** | : लेखा व कोषागारे संचालनालयातील वर्ग-३ च्या अराजपत्रित पदांना त्याच्या असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन वेतन समानीकरण समितीने सुधारित वेतनश्रेणीबाबत शिफारस केली होती. इतरत्र तथाकथित समकक्ष पदांना या समितीच्या अहवालाच्या परिच्छेदामध्ये चर्चिल्याप्रमाणे वेगवेगळ्या कारणांसाठी वरच्या सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या असल्यामुळे, इतर विभागातील भिन्न सेवाप्रवेश नियम व कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या असलेल्या पदांशी केलेली तुलना या ठिकाणी अप्रस्तुत वाटते. पदांच्या श्रेणीवाढीबाबतचा प्रश्न या समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.<br>२. दिनांक ६ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाच्या सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. |

## प्रस्ताव क्रमांक––सतरा

| | | |
|---|---|---|
| **प्रशासकीय विभाग** | : | सामान्य प्रशासन विभाग |
| **विभाग प्रमुख** | : | सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग |
| **प्रस्ताव** | : | महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील अधिकारी संवर्गातील पदांना मंत्रालयातील तत्सम पदांप्रमाणे वेतनश्रेणी विहित करण्याबाबत. |
| **समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** | : | वेतन समानीकरण समितीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील राजपत्रित पदांना त्यांच्या असुधारित वेतनश्रेणी विंचारात घेऊन सुधारीत वेतनश्रेणींची शिफारस केली होती. मंत्रालयातील तथाकथित नामसदृशयामुळे समकक्ष दिवस असलेली पदे पूर्वीपासूनच वरच्या वेतनश्रेणीत असल्यामुळे त्यांना वरच्या सुधारित वेतनश्रेणी मंजूर केल्या आहेत. केंद्र शासनाकडील केंद्रीय लोकसेवा आयोगातील राजपत्रित पदांच्या वेतनश्रेणी देखील महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील राजपत्रित पदांच्या वेतनश्रेणीपेक्षा पूर्वी पासूनच वरच्या होत्या. या स्थितीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामधील पदांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर करता येण्यासारख्या नाहीत. या आयोगामधील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या आकृतीबंधात बदल करून नविन आकृतीबंध निर्माण करण्याबाबतची बाब या समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.<br><br>२. दिनांक ६ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. |

# प्रस्ताव क्रमांक––अठरा

**प्रशासकीय विभाग** : सामान्य प्रशासन विभाग

**विभाग प्रमुख** : संचालक, सैनिक कल्याण विभाग

**प्रस्ताव** : सैनिक कल्याण विभागातील वसतिगृह अधीक्षक व कल्याण संघटक या पदांना अनुरूप वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : सैनिक कल्याण विभागातील कार्यकारी पदांवर निवृत्त झालेल्या सैनिकांची नेमणूक करण्यात येते. निवृत्तीसमयी ते रु. १५००––२२५० व रु. १७५०––२६०० या वेतनश्रेणीत वेतन घेत असल्याने नियुक्तीनंतर रु. ९५०––१५०० या वेतनश्रेणीत त्याचे वेतन रु. १५०० च्या जवळपास निश्चित होऊन त्याच्या वेतनात कुंठीतता निर्माण होते. वसतिगृह अधीक्षक व कल्याण संघटक ही विचाराधीन पदे, या पदांचे सेवाप्रवेश नियम विचारात घेता, रु. ९५०––१५०० या वेतनश्रेणीतील सर्वसाधारणपणे आढळून येणाऱ्या इतर पदांशी तुलनीय नसल्याचे स्पष्ट होते. या परिस्थितीत, निवृत्त सैनिकांना पुनर्नियुक्तीनंतर देण्यात येणाऱ्या सेवेचा योग्य मोबदला मिळण्याच्या हेतूने वसतीगृह अधीक्षक व कल्याण संघटक या दोन पदांची वेतनश्रेणी रु. १२००––२०४० अशी उंचावण्याबाबत शिफारस करण्यात येते.

२. पूर्वलक्षी प्रभावाने श्रेणीवाढ करण्याबाबत शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने वसतिगृह अधीक्षक व कल्याण संघटक या पदांना रु. १२००––२०४० ही वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने काल्पनिकरित्या मंजूर करण्यात यावी. दिनांक १ जानेवारी १९८६ ते ३१ मार्च १९९४ पर्यन्तची कोणत्याही प्रकारची थकबाकी संबंधितांना प्रदान करण्यात येऊ नये. दिनांक १ एप्रिल १९९४ ते ३१ डिसेंबर १९९६ पर्यन्तची थकबाकी संबंधितांना प्रत्यक्ष रोखीने प्रदान न करता ती त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यात यावी व फक्त दिनांक १ जानेवारी १९९७ नंतरची थकबाकी रोखीने प्रदान करण्यात यावी.

३. दिनांक ६ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे प्रधान सचिव उपस्थित होते.

# प्रस्ताव क्रमांक--एकोणीस

**प्रशासकीय विभाग** : पाटबंधारे विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग

**विभाग प्रमुख** : मुख्य अभियंता

**प्रस्ताव** : मुख्य अभियंता स्तर १ व २ या पदांना केंद्र शासनाकडील तत्सम पदाची वेतनश्रेणी लागू करण्याबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : शासनाने वेतन समानीकरण समितीच्या अहवालातील शिफारशींची छाननी करण्याकरीता नियुक्त केलेल्या सचिवांच्या उच्चाधिकार समितीने विभाग प्रमुखांची वेतनश्रेणी सचिवाच्या वेतनश्रेणीहून कमी असावी अशी शिफारस केली होती व या शिफारशींच्याच अनुषंगाने मुख्य अभियंता श्रेणी-१ या पदास रु. ५१००--६३०० व मुख्य अभियंता श्रेणी-२ या पदास रु. ४५००--५७०० या वेतनश्रेणी मंजूर केल्या गेल्याचे दिसते. अलिकडेच पाटबंधारे विभागाच्या दिनांक १४ डिसेंबर १९९५ च्या आदेशान्वये या पदांना रु. ५४००--६५०० ही वरची वेतनश्रेणी वेतननिश्चितीसाठी दिनांक १ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर केली आहे व किंबहुना त्यामुळे बऱ्याच गुंतागुंती उद्‌भवल्या आहेत. त्या पुढील रु. ५९००--६७०० ही वेतनश्रेणी प्रशासकीय विभागांच्या सचिवांची आहे. सचिव समितीने प्रशासकीय विभागाच्या अखत्यारीतील विभाग प्रमुखांची प्रशासकीय विभागाच्या सचिवांशी असलेली सापेक्षता अबाधित राहण्याच्या दृष्टीने दिलेले अभिप्राय व अलिकडेच या पदांना मजूर करण्यात आलेली वरची वेतनश्रेणी विचारात घेता या पदांना सचिवांची समकक्ष वेतनश्रेणी विहित करणे योग्य होणार नाही.

२. दिनांक ६ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे सचिव•व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक––वीस

| | |
|---|---|
| **प्रशासकीय विभाग** | : सार्वजनिक बांधकाम विभाग |
| **विभाग प्रमुख** | : मुख्य अभियंता |
| **प्रस्ताव** | : सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभागातील अनुरेखक संवर्गातील तत्सम पदांना केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाचे क्रमांक १३ (१) आय सी/९१, दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ चे आदेश लागू करणेबाबत. |
| **समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** | : १९७७ साली घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक १ जानेवारी १९८६ पासून लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीच्या संदर्भात नियुक्त केलेल्या वेतन समानीकरण समितीने राज्य शासनाकडील ज्या पदांना केंद्र शासनाकडे तत्सम व समकक्ष पदे आढळून आली अशा (राज्य शासनाकडील ) पदांना केंद्र शासनाकडील तत्सम व समकक्ष पदांची सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत शिफारस केली. या शिफारशींच्या अनुषंगाने राज्यातील अनुरेखक/सहायक आरेखक व आरेखक या पदांना अनुक्रमे रु. ९७५––१५४०, रु. १२००––२०४० व रु. १४००––२३०० या वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेल्या आहेत. मागाहून केंद्र शासनाने त्यांचे दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ च्या आदेशान्वये केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाबाहेरील आरेखक संवर्गातील पदांना त्याच्या सेवाप्रवेश नियमांचा विचार न करता ठराविक कालावधीनंतर वरच्या वेतनश्रेणी मंजूर केल्या आहेत. राज्य शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाचा विचार करता व वेतन समानीकरण समितीने विचाराधीन पदांना केंद्र शासनाकडील पदांची समकक्षता दिली ही देखील बाब लक्षात घेता, केंद्र शासनाच्या दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ च्या आदेशाचा लाभ राज्य शासनाकडील आरेखक संवर्गातील विविध पदांना अनुज्ञेय करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.<br><br>२. पूर्वलक्षी प्रभावाने श्रेणीवाढ करण्याबाबत शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील आरेखक संवर्गातील पदांना केंद्र शासनाच्या दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ च्या आदेशाचा लाभ दिनांक १ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने काल्पनिकरित्या मंजूर करण्यात यावा. दिनांक १ जानेवारी १९८६ ते ३१ मार्च १९९४ पर्यन्तची कोणत्याही प्रकारची थकबाकी संबंधिताना प्रदान करण्यात येऊ नये. दिनांक १ जानेवारी १९९४ ते ३१ डिसेंबर १९९६ पर्यन्तची थकबाकी संबंधितांना प्रत्यक्ष रोखीने प्रदान न करता ती त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यात यावी व फक्त दिनांक १ जानेवारी १९९७ नंतरची थकबाकी रोखीने प्रदान करण्यात यावी.<br><br>२. दिनांक ६ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे उप सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. |

# प्रस्ताव क्रमांक––एकवीस

**प्रशासकीय विभाग** : सार्वजनिक बांधकाम विभाग

**विभाग प्रमुख** : सार्वजनिक बांधकाम विभाग (सर्व मंडळे)

**प्रस्ताव** : सार्वजनिक बांधकाम विभागातील संशोधन सहायक या पदास वित्त विभागाच्या दिनांक २० नोव्हेंबर १९७९ च्या आदेशांचा लाभ अनुज्ञेय करणेबाबत

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : वित्त विभागाच्या दिनांक २० नोव्हेंबर १९७९ च्या शासन निर्णयानुसार पाटबंधारे विभागामधील संशोधन सहायक या पदास रु. ३३५––६८० या वेतनश्रेणीऐवजी रु. ३६५–७६० ही पुनःसुधारित वेतनश्रेणी दिनांक १ एप्रिल १९७६ पासून लागू करण्यात आलेली आहे व त्या अनुषंगाने या पदास दिनांक १ जानेवारी १९८६ पासून रु. १४००––२३०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील संशोधन सहायक या पदाचे सेवाप्रवेश नियम व कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या या पाटबंधारे विभागातील संशोधन सहायक या पदाच्या सारख्याच असून ज्यावेळेस पाटबंधारे विभागातील संशोधन सहायक या पदाची श्रेणीवाढ करण्यात आली त्याच वेळेस सार्वजनिक बांधकाम विभागातील संशोधन सहायक या पदाचीही श्रेणीवाढ करावयास हवी होती. प्राप्त परिस्थितीत, सार्वजनिक बांधकाम विभागामधील संशोधन सहायक या पदास रु. ३६५––७६० ही वेतनश्रेणी दिनांक १ एप्रिल १९७६ पासून व रु. १४००––२३०० ही वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९८६ पासून मंजूर करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

२. पूर्वलक्षी प्रभावाने श्रेणीवाढ करण्याबाबत शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने उपरोक्त सार्वजनिक बांधकाम विभागातील संशोधन सहायक या पदास रु. ३६५––७६० ही वेतनश्रेणी दिनांक १ एप्रिल १९७६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने काल्पनिकरित्या मंजूर करण्यात यावी. दिनांक १ एप्रिल १९७६ ते ३१ डिसेंबर १९८५ पर्यन्तची कोणत्याही प्रकारची थकबाकी संबंधिताना प्रदान करण्यात येऊ नये. दिनांक १ जानेवारी १९८६ ते ३१ मार्च १९९४ पर्यतची संबंधितांची थकबाकी प्रत्यक्ष रोखीने प्रदान न करता ती संबंधित पदधारकांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यात यावी व फक्त दिनांक १ एप्रिल १९९४ ते ३१ डिसेंबर १९९५ पर्यन्तची थकबाकी रोखीने प्रदान करण्यात यावी.

२. दिनांक १२ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे सचिव उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक--बावीस

**प्रशासकीय विभाग** : सार्वजनिक बांधकाम विभाग

**विभाग प्रमुख** : सार्वजनिक बांधकाम विभाग (सर्व मंडळे).

**प्रस्ताव** : सार्वजनिक बांधकाम विभागातील लिपिकवर्गीय पदांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : सार्वजनिक बांधकाम विभागाने विचाराधीन लिपिक संवर्गातील पदांची इतर विभागातील लिपिकेतर पदांशी केलेली तुलना अनाठाई असल्याचे दिसून आले. विचाराधीन पदें ही सर्वसाधारण स्वरूपाची पदे असून अशीच पदे इतर प्रशासकीय विभागांमध्येही कार्यरत आहेत. या पदांस विहित करण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेणी या योग्य असल्यामुळे फक्त सार्वजनिक बांधकाम विभागातील लिपिकवर्गीय पदांना अपवाद करून त्यांनाच वरच्या वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९८६ पासून त्यामुळे विहित करता येण्यासारख्या नाहीत. समिती सार्वजनिक बांधकाम विभागाचा हा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

२. दिनांक २५ मार्च १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे उप सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रस्ताव क्रमांक––तेवीस

**प्रशासकीय विभाग** : वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग

**विभाग प्रमुख** : संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई

**प्रस्ताव** : शिक्षण व सेवायोजन विभागाच्या दिनांक २९ जानेवारी १९९० च्या आदेशांचा लाभ वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागातील तत्सम पदांना लागू करणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : शिक्षण व सेवायोजन विभागाच्या क्रमांक एनजीसी १२८९/(१५२९)/युनी-४, दिनांक २९ जानेवारी १९९० च्या शासन निर्णयान्वये अकृषी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अशासकीय महाविद्यालयामधील प्रयोग परिचर/ग्रंथालय परिचर/क्षेत्र समाहाकर या पदांना रु. २००–२८०/रु. २०५–३५५ या वेतनश्रेणीऐवजी रु. २५०–४३५ ही वरची वेतनश्रेणी दिनांक १ एप्रिल १९७६ पासून काही अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात आली आहे. शिक्षण व सेवायोजन विभागाच्या सम क्रमांकाच्या व सम दिनांकाच्या शासन अधिसूचनेअन्वये या अटींमध्ये सुधारणा करण्यात आलेली असून या सुधारित अटी पुढीलप्रमाणे आहेत :––

(अ) जे कर्मचारी दिनांक ३१ डिसेंबर १९८५ रोजी सेवेत होते, किंवा

(ब) ज्या कर्मचाऱ्यांनी दिनांक २९ जानेवारी १९९० रोजी वयाची ३० वर्षे पूर्ण केली आहेत, किंवा

(क) जे कर्मचारी एस. एस. सी. अनुत्तीर्ण (प्रयोगशाळा परिचरांच्या बाबतीत भौतिक आणि रसायन शास्त्र हे विषय घेऊन) आहेत.

२. या प्रकरणातील शिक्षण व सेवायोजन विभागाच्या मूळ नस्तीचे अवलोकन करावयास समितीला मिळाले नसल्यामुळे त्या विभागाच्या उपरोक्त शासन निर्णयाची पार्श्वभूमी समितीस अवगत होऊ शकली नाही. प्राप्त परिस्थितीत व यासंबंधीच्या प्रचलित नियमांमधील तरतुदींचा विचार करून, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाच्या संदर्भाधीन प्रस्तावाबाबत समिती अशी शिफारस करीत आहे कीं :––

(अ) जे प्रयोगशाळा परिचर दिनांक ३१ डिसेंबर १९८५ रोजी सेवेत होते, किंवा

(ब) ज्या प्रयोगशाळा परिचरांनी दिनांक २९ जानेवारी १९९० रोजी वयाची ३० वर्षे पूर्ण केली होती, किंवा

(क) जे प्रयोगशाळा परिचर एस. एस. सी. अनुत्तीर्ण (भौतिक आणि रसायन शास्त्र हे विषय घेऊन) आहेत,

अशा प्रयोगशाळा परिचरांना दिनांक १ जानेवारी १९८६ पासून रु. ९५०–१४०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. उपरोक्त तीन पर्यायी अटींपैकी एकही पर्यायी अट जे प्रयोगशाळा परिचर पूर्ण करू शकत नाहीत त्यांना रु. ७५०–९४० ही वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९८६ पासून लागू राहील.

३. पूर्वलक्षी प्रभावाने श्रेणीवाढ करण्याबाबत शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागातील प्रयोगशाळा परिचरांना उपरोक्त रु. ९५०–१४०० ही वेतनश्रेणी (ते वरील (अ) **किंवा** (ब) **किंवा** (क) येथे नमूद केलेली अट पूर्ण करीत असल्यास) दिनांक १ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने काल्पनिकरित्या मंजूर करण्यात यावी. दिनांक १ जानेवारी १९८६

ते ३१ मार्च १९९४ पर्यंतची कोणत्याही प्रकारची थकबाकी संबंधितांना प्रदान करण्यात येऊ नये. दिनांक १ एप्रिल १९९४ ते ३१ डिसेंबर १९९६ पर्यंतची थकबाकी संबंधितांना प्रत्यक्ष रोखीने प्रदान न करता ती त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यात यावी व फक्त दिनांक १ जानेवारी १९९७ नंतरची थकबाकी रोखीने प्रदान करण्यात यावी.

४. शिक्षण व सेवायोजन विभागाच्या वर परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या दिनांक २९ जानेवारी १९९० च्या आदेशांचा लाभ (अर्थात त्या आदेशांतील अटी लागू करून) इतर प्रशासकीय विभागांखालील प्रयोगशाळा परिचर/ग्रंथालय परिचर/क्षेत्र समाहारक यांनाही दिनांक १ जानेवारी १९८६ पासून देण्यात यावा. मात्र थकबाकी संबंधात त्यांनाही वरील परिच्छेद ३ मधील तरतुदी लागू करण्यात याव्यात.

५. दिनांक १ एप्रिल १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस विभाग प्रमुख उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक––चोवीस

**प्रशासकीय विभाग** : सार्वजनिक आरोग्य विभाग

**विभाग प्रमुख** : संचालक, आरोग्य सेवा संचालनालय

**प्रस्ताव** : आरोग्य संचालनालयातील वैद्यकीय अधिकारी वर्ग-१ व २ या पदास वरच्या वेतनश्रेणी लागू करणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : राज्य शासनाकडील पदांची तुलनियता केंद्र शासनाकडील तत्सम पदांबरोबर करून त्याप्रमाणे तेथील पदांची वेतनश्रेणी येथील पदांना विहित करण्याबाबतच्या राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयास अनुलक्षून, रु. ६००–११५० या असुधारित वेतनश्रेणीतील '' वैद्यकीय अधिकारी '' या पदास रु. २०००–३५०० ही सममूल्य वेतनश्रेणी न देता रु. २२००–४००० ही वरची वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे. याबाबत उप अभियंता किंवा तहसिलदार या पदांशी केलेली तुलना, ती पदे त्यांचे सेवाप्रवेश नियम व कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यांचा विचार करता, भिन्न असल्यामुळे अवास्तव वाटते. त्यामुळे विचाराधीन प्रस्ताव मंजूर न करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

२. दिनांक १२ फेब्रुवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक--पंचवीस

**प्रशासकीय विभाग** : सार्वजनिक आरोग्य विभाग

**विभाग प्रमुख** : संचालक, आरोग्य सेवा संचालनालय

**प्रस्ताव** : आरोग्य कार्यकर्ता या पदास रु. १२००–१८०० ही वेतनश्रेणी मंजूर करताना २० टक्के निवडश्रेणीबाबत घातलेली अट काढून टाकणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : रु. २९०–५४० या असुधारित वेतनश्रेणीतील " आरोग्य कार्यकर्ता" या पदास वेतन समानीरण समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद २.११ प्रमाणे रु. ९७५–१६६० या वेतनश्रेणीची शिफारस केली होती. त्यानंतर नियुक्त करण्यात आलेल्या वेतनत्रुटी समितीने या पदाची प्रस्तावित शैक्षणिक अर्हता व विशेषतः १८ महिन्यांचा प्रशिक्षण अभ्यासक्रम ही अतिरिक्त अर्हता विचारात घेऊन रु. १२००–१८०० ही वरची वेतनश्रेणी या पदास द्यावी अशी शिफारस केली होती. सार्वजनिक आरोग्य विभाग व जिल्हा परिषदेतील आरोग्य कार्यकर्त्यांची शैक्षणिक अर्हता अनुक्रमे दिनांक १२ सप्टेंबर १९८५ व ३० डिसेंबर १९८५ च्या त्या विभागाच्या आदेशानुसार वेतन सुधारणेच्या तारखेपूर्वी, सुधारण्यात आल्याची बाब व वेतन समानीकरण समितीच्या परिच्छेद ३.९ प्रमाणे अभ्यासक्रमाबाबतच्या अतिरिक्त अर्हतेची सेवेत लागण्यापूर्वीची आवश्यकता विचारात घेऊन, केवळ २० टक्के पदांनाच रु. १२००–१८०० ही निवडश्रेणी वित्त विभागाच्या दिनांक २९ जून १९९४ च्या आदेशान्वये मंजूर केलेली आहे. या निर्णयाशी समिती सहमत आहे. असे असले तरी, दरम्यानच्या १० वर्षाच्या कालावधीत संबंधितांनी आवश्यक अर्हता प्राप्त केल्याची किंवा वयाची ४५ वर्षे पूर्ण केली असल्याची शक्यता विचारात घेता, दिनांक १ जानेवारी १९९६ पासून मंजूर करावयाची सुधारीत वेतनश्रेणी " आरोग्य कार्यकर्ता " या पदासाठी रु. १२००–१८०० ही वेतनश्रेणी विचारात घेऊन सुधारण्यात यावी व ती सरसकट १०० टक्के पदांना अनुज्ञेय करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

२. दिनांक ७ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक——सव्वीस

**प्रशासकीय विभाग** : महसूल व वन विभाग.

**विभाग प्रमुख** : विभागीय आयुक्त

**प्रस्ताव** : महसूल विभागातील महसूल अधिकार श्रेणीमधील विविध पदांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : पाटबंधारे विभागाच्या दिनांक १४ डिसेंबर १९९५ च्या आदेशान्वये अभियांत्रिकी संवर्गातील विविध पदांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर केल्या आहेत. या आदेशाचा हवाला देऊन महसूल संवर्गातील पदांना देखील वरच्या वेतनश्रेणी मंजूर करण्यात याव्यात अशी मागणी होती. प्रत्यक्षात अभियांत्रिकी संवर्गातील पदे, त्या पदांच्या असुधारित वेतनश्रेणी, सेवाप्रवेश नियम आणि त्या अनुषंगाने त्यांना सोपविण्यात आलेल्या विनिर्दिष्ट जबाबदाऱ्या यांचा विचार केल्यास, ती महसूल संवर्गातील पदांपेक्षा पूर्णतः भिन्न असल्याने व त्यामुळेच या दोन्ही संवर्गातील पदांची तुलनात्मक समकक्षता सिद्ध होत नसल्यामुळे, महसूल संवर्गातील अधिकारी वर्गातील विविध पदांना वरच्या वेतनश्रेणी मंजूर करता येण्यासारख्या नाहीत. पदांची श्रेणीवाढ करण्यासंबंधीचा प्रश्न या समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

२. दिनांक ७ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे प्रधान सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रस्ताव क्रमांक--सत्तावीस

**प्रशासकीय विभाग** : महसूल व वन विभाग

**विभाग प्रमुख** : विभागीय आयुक्त

**प्रस्ताव** : महसूल विभागातील सहाय्यक अधीक्षक, भूमि अभिलेख या पदोन्नतीच्या पदास उचित वेतनश्रेणी विहित करणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : महसूल व वन विभागाच्या दिनांक १५ ऑक्टोबर १९९४ च्या आदेशान्वये रु. २९०–५४० या असुधारित वेतनश्रेणीतील राजस्व निरीक्षक व महसूल निरिक्षक या पदांना रु. १२००–१८०० ऐवजी रु. १४००–२३०० ही वरची वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली असून या दोन पदाच्या संमिल्लीकरणानंतर नवीन पदाचे नाव '' मंडल अधिकारी '' असे करण्यात आले आहे. सहाय्यक अधीक्षक, भूमी अभिलेख हे पद राजस्व निरीक्षक व महसूल निरीक्षक या पदास पदोन्नतीचे पद असल्यामुळे साहजिकच या पदासही त्याहून वरची वेतनश्रेणी त्या तारखेपासून (दिनांक १५ ऑक्टोबर १९९४ पासून) मंजूर करणे आवश्यक आहे. प्राप्त परिस्थितीत, सहायक अधीक्षक, भूमी अभिलेख या पदास रु. १४००–२६०० ही वरची वेतनश्रेणी महसूल व वन विभागाच्या दिनांक १५ ऑक्टोबर १९९४ च्या आदेशामधील तरतूदींच्या अधीन राहून मंजूर करण्याबाबत ही समिती शिफारस करीत आहे.

२. दिनांक ७ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे प्रधान सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक––अठ्ठावीस

**प्रशासकीय विभाग** : महसूल व वन विभाग

**विभाग प्रमुख** : विभागीय आयुक्त

**प्रस्ताव** : महसूल विभागातील तलाठी पदास ग्रामसेवक पदाची रु. १२००–१८०० ही वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : तलाठी या पदाची तुलना ग्रामसेवक व कृषी सहाय्यक या पदाशी केलेली आहे. तलाठी हे पद पूर्वी रु. २६०–४९५ या वेतनश्रेणीत तर ग्रामसेवक व कृषी सहायक ही पदें पूर्वी रु. २९०–५४० या वरच्या वेतनश्रेणीत होती. तलाठी या पदास केवळ एस. एस. सी. उत्तीर्ण एवढीच शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे तर ग्रामसेवक व कृषी सहायक या पदांना एस. एस. सी. + २ वर्षाचा शेतकी अभ्यासक्रम ही अर्हता आवश्यक आहे. थोडक्यात, पूर्वीची असुधारित वेतनश्रेणी, सेवाप्रवेश नियम व कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यांचा विचार करता ग्रामसेवक व कृषी सहायक ही पदे तलाठी या पदाशी समकक्ष नसल्याचे स्पष्ट होत असल्यामुळे, ग्रामसेवक व कृषी सहायक या पदाची रु. १२००–१८०० ही वरची सुधारित (१९८६) वेतनश्रेणी तलाठी या पदास मंजूर करता येण्यासारखी नाही. पदांची श्रेणीवाढ करण्याची बाब या समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

२. दिनांक ७ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे प्रधान सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रस्ताव क्रमांक--एकोणतीस

**प्रशासकीय विभाग** : महसूल व वन विभाग

**विभाग प्रमुख** : मुख्य वन संरक्षक

**प्रस्ताव** : वन विभागातील अभियांत्रिकी संवर्गातील विविध पदांना समकक्षतेच्या आधारे पाटबंधारे विभागाच्या दिनांक १४ डिसेंबर १९९५ च्या आदेशांचा लाभ अनुज्ञेय करणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : महसूल व वन विभागाच्या दिनांक २४ ऑक्टोबर १९९४ च्या आदेशान्वये वन विभागातील कनिष्ठ अभियंत्यांना राजपत्रित दर्जा देण्याबाबतचे आदेश न्यायालयीन निवाड्याच्या परिणाम-स्वरूप निर्गमित करण्यात आलेले आहेत. वन विभागातील अभियांत्रिकी संवर्गातील विविध पदांना पाटबंधारे विभागाच्या अभियांत्रिकी संवर्गातील विविध पदांची समकक्षता त्यामुळे प्राप्त झाली असल्यामुळे पाटबंधारे विभागाच्या दिनांक १४ डिसेंबर १९९५ च्या आदेशाचा लाभ या समकक्ष पदांना देण्याबाबतची शिफारस करण्यात येत आहे. त्यास अनुलक्षून, वन अभियंता, उप वन अभियंता, शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२ व कनिष्ठ अभियंता यांना अनुक्रमे रु. ३०००–४५००, २०००–३५००, २०००–३२०० आणि १४००–२३०० ऐवजी रु. ३२००–४६२५, २२००–४०००, २०००–३५०० आणि १६४०–२९०० या वेतनश्रेणी पाटबंधारे विभागाच्या दिनांक १४ डिसेंबर १९९५ च्या आदेशामधील तरतूदींच्या अधीन राहून लागू करण्यास हरकत नसावी.

२. पाटबंधारे विभागाचे दिनांक १४ डिसेंबर १९९५ चे उपरोक्त आदेश शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांखालील तसेच जिल्हा परिषदांमधील अभियांत्रिकी संवर्गातील ज्या पदांना वेतन समानीकरण समितीने पाटबंधारे विभागामधील अभियांत्रिकी संवर्गातील पदांची समकक्षता दिलेली आहे अशा सर्व पदांना देखील लागू करण्याबाबत समिती शिफारस करीत आहे.

३. वन विभागातील कर्मशाळा अधीक्षक हे पद महाराष्ट्र राज्य सेवा वर्ग-२ मधील पद असल्यामुळे, म्हणजेच हे पद महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा या प्रवर्गात मोडत नसल्यामुळे, दिनांक १४ डिसेंबर १९९५ च्या आदेशाचा लाभ या पदास देता येण्यासारखा नाही.

४. दिनांक १२ फेब्रुवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे प्रधान सचिव उपस्थित होते.

# प्रस्ताव क्रमांक--तीस

**प्रशासकीय विभाग** : महसूल व वन विभाग

**विभाग प्रमुख** : मुख्य वन संरक्षक

**प्रस्ताव** : वन विभागातील मुख्य लिपिक व लेखापाल या पदास लेखा व कोषागारे संचालनालयामधील तत्सम पदांच्या वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : वन विभागातील '' लेखापाल '' हे पद धारण करणाऱ्यास लेखा व कोषागारे विभागातील तत्सम पदधारकांसारखी कामे करावी लागतात. वन विभागातील या पदांवरील नियुक्तीसाठी उत्तीर्ण होणे आवश्यक असलेल्या विभागीय परीक्षेच्या अभ्यासक्रमात शासकीय पत्रव्यवहार मराठी व इंग्रजीमधून करणे, अभिलेखे ठेवणे, संक्षिप्त मसुदा लेखन या व्यतिरिक्त '' लेखे व कार्यपद्धती '' (Accounts and Procedure), मुंबई वन नियम पुस्तिका खंड एक, दोन व तीन आणि विविध वनसंबंधित अधिनियम व नियम यांचा समावेश आहे. शिवाय लेखाकर्मातील ३ महिन्यांचे वेगळे प्रशिक्षण त्यानंतर आहे. महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८–खंड-१ मधील नियम क्रमांक ४६४ ते ४६६ मध्ये विहित केलेली कर्तव्ये देखील हे पद धारण करणाऱ्यांस पार पाडावी लागतात. वन विभाग वाणिज्य स्वरूपाचा विभाग असल्याने, विविध संबंधित लेखे या कर्मचाऱ्यांना ठेवावे लागतात. महत्त्वाचे म्हणजे, इतर विभागामध्ये जी लेखाविषयक कामे लेखा व कोषागारातील लेखापाल या पदधारकांकडून अपेक्षित आहेत ती सर्व कामे वन विभागातील लेखापाल करीत असल्यामुळे वन विभागातील लेखापाल हे पद लिपिकेतर पद समजून वरिष्ठ लिपिकाच्या वेतनश्रेणीपेक्षा वरची वेतनश्रेणी त्या पदासाठी मंजूर करणे आवश्यक आहे. मात्र या पदावरील नियुक्तीकरीता लेखा व कोषागारे कार्यालयातील समकक्ष पदांप्रमाणे महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्ग पदाच्या परीक्षा उत्तीर्ण होण्याची आवश्यकता नसल्यामुळे व वन विभागातील '' लेखापाल '' या पदास लेखा व कोषागारातील उपलेखापाल या पदाची रु. १४००–२६०० ही वरची वेतनश्रेणी देणे देखिल संयुक्तिक ठरत नसल्यामुळे, येथे रु. १४००–२३०० या वेतनश्रेणीची शिफारस समिती करीत आहे. वन विभागातील '' लेखापाल '' या पदास रु. १४००–२३०० ही थोडी वरची वेतनश्रेणी मंजूर करण्यात येत असल्यामुळे, या पदावरून पदोन्नतीची पद असलेल्या '' प्रमुख लिपिक '' या पदास रु. १४००–२६०० ऐवजी रु. १६००–२६६० ही वेतनश्रेणी प्रस्तावित करण्यात येत आहे.

२. पूर्वलक्षी प्रभावाने श्रेणीवाढ करण्याबाबत शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने वन विभागातील '' लेखापाल '' व '' मुख्य लिपिक '' या पदांना अनुक्रमे रु. १४००–२३०० व रु. १६००–२६६० या वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने काल्पनिकरित्या मंजूर करण्यात याव्यात. दिनांक १ जानेवारी १९८६ ते ३१ मार्च १९९४ पर्यंतची कोणत्याही प्रकारची थकबाकी संबंधितांना प्रदान करण्यात येऊ नये. दिनांक १ एप्रिल १९९४ ते ३१ डिसेंबर १९९६ पर्यंतची थकबाकी संबंधितांना प्रत्यक्ष रोखीने प्रदान न करता ती त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यात यावी व फक्त दिनांक १ जानेवारी १९९७ नंतरची थकबाकी रोखीने प्रदान करण्यात यावी.

३. दिनांक २५ मार्च १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस विभाग प्रमुख व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रस्ताव क्रमांक---एकतीस

**प्रशासकीय विभाग** : ग्राम विकास विभाग

**विभाग प्रमुख** : जिल्हा परिषद

**प्रस्ताव** : जिल्हा परिषदांमधील अनुरेखक संवर्गातील तत्सम पदांना केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाचे क्रमांक १३(१)-आय सी/९१, दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ चे आदेश लागू करणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : १९७७ साली घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक १ जानेवारी १९८६ पासून लागू करण्यात आलेल्या सुधारीत वेतनश्रेणीच्या संदर्भात नियुक्त केलेल्या वेतन समानीकरण समितीने राज्य शासनाकडील ज्या पदांना केंद्र शासनाकडे तत्सम व समकक्ष पदे आढळून आली अशा (राज्य शासनाकडील) पदांना केंद्र शासनाकडील तत्सम व समकक्ष पदांची सुधारीत वेतनश्रेणी विहित करण्याबाबत शिफारस केली. या शिफारशींच्या अनुषंगाने राज्यातील अनुरेखक/सहायक आरेखक व आरेखक या पदांना अनुक्रमे रु. ९७५–१५४०, रु. १२००–२०४० व रु. १४००–२३०० या वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेल्या आहेत. मागाहून केंद्र शासनाने त्यांचे दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ च्या आदेशान्वये केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाबाहेरील आरेखक संवर्गातील पदांना त्यांच्या सेवाप्रवेश नियमांचा विचार न करता ठराविक कालावधीनंतर वरच्या वेतनश्रेणी मंजूर केल्या आहेत. राज्य शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाचा विचार करता व वेतन समानीकरण समितीने विचाराधिन पदांना केंद्र शासनाकडील पदांची समकक्षता दिली ही देखिल बाब लक्षात घेता, केंद्र शासनाच्या दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ च्या आदेशाचा लाभ राज्य शासनाकडील व जिल्हा परिषदांतील आरेखक संवर्गातील विविध पदांना अनुज्ञेय करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२. पूर्वलक्षी प्रभावाने श्रेणीवाढ करण्याबाबत शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातीलअंनुरेखक संवर्गातील पदांना केंद्र शासनाच्या दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ च्या आदेशाचा लाभ दिनांक १ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने काल्पनिकरित्या मंजूर करण्यात यावा. दिनांक १ जानेवारी १९८६ ते ३१ मार्च १९९४ पर्यन्तची कोणत्याही प्रकारची थकबाकी संबंधितांना प्रदान करण्यात येऊ नये. दिनांक १ जानेवारी १९९४ ते ३१ डिसेंबर १९९६ पर्यन्तची थकबाकी संबंधितांना प्रत्यक्ष रोखीने प्रदान न करता ती त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यात यावी व दिनांक १ जानेवारी १९९७ नंतरची थकबाकी फक्त रोखीने प्रदान करण्यात यावी.

३. दिनाक ७ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे सचिव उपस्थित नव्हते. मात्र संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रस्ताव क्रमांक--बत्तीस

**प्रशासकीय विभाग** : ग्रामविकास विभाग

**विभाग प्रमुख** : जिल्हा परिषद

**प्रस्ताव** : जिल्हा परिषदांतील ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत) या पदांना कृषी व पदुम विभागाच्या दिनांक ८ डिसेबर १९९४ च्या आदेशांचा लाभ अनुज्ञेय करणेबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : कृषी व पदुम विभागाच्या दिनांक ८ डिसेंबर १९९४ च्या आदेशान्वये कृषी सहाय्यक या पदास ७ वर्षाच्या सेवेनंतर रु. १३५०--२२०० ही वेतनश्रेणी तर कृषी पर्यवेक्षक व कृषी अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ) या पदांना अनुक्रमे रु. १६००--२६६० व रु. २०००--३२०० या वेतनश्रेणी मंजूर केल्या आहेत. वेतन समानीकरण समितीने जिल्हा परिषदांतील कृषी पर्यवेक्षक/विस्तार अधिकारी (कृषी) आणि कृषी अधिकारी या पदांना अनुक्रमे कृषी विभागातील कृषी पर्यवेक्षक व कृषी अधिकारी या पदांशी समकक्षता दिलेली असल्यामुळे या पदांना कृषी व पदुम विभागाच्या दिनांक ८ डिसेबर १९९४ च्या आदेशाचा लाभ यापूर्वीच देण्यात आलेला आहे. असे असले तरी कृषी सहायक या पदास जिल्हा परिषदेमध्ये समकक्ष पद वेतन समानीकरण समितीस आढळून न आल्यामुळे जिल्हा परिषदांमध्ये या पदाच्या समकक्षतेच्या आधारे वरील आदेशाचा लाभ देण्यात आला नाही. '' ग्रामसेवक '' हे पद सेवाप्रवेश अर्हतेबाबत जरी कृषी सहायकाशी साम्य दर्शवित असले तरी कर्तव्ये आणि जबाबदारीचा विचार करता, ग्रामसेवक या पदावरील व्यक्तीस प्रशासन, नियोजन, कुटुंबकल्याण कार्यक्रम, विविध कल्याणकारी योजना या संबंधातील, म्हणजेच बहुउद्देशी, कामे करावी लागत असल्यामुळे कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांचा विचार करता हे पद कृषी सहायक या पदाशी समकक्ष असल्याचे आढळून आले नाही. खेरीज, ग्रामसेवक या पदास वरील दिनांक ८ डिसेंबर १९९४ च्या आदेशांचा लाभ अनुज्ञेय केल्यास ग्रामसेवक या पदास पदोन्नतीचे पद असलेल्या त्या पदाच्या अधिकारश्रेणीतील ग्रामविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत) या पदांना देखील वरील आदेशांचा लाभ द्यावा लागेल व त्या परिस्थितीत वरील आदेशाच्या लाभाची व्याप्ती वाढून इतरत्रही तसा लाभ द्यावा लागेल. त्यामुळे ग्रामसेवक या पदास वरील दिनांक ८ डिसेंबर १९९४ च्या आदेशाचा लाभ देता येण्यासारखा नाही.

२. चर्चेत जिल्हा परिषदेमध्ये कृषी सहायकांची वेगळी ज्येष्ठता सूची ठेवल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. ही स्थिती विचारात घेता काटेकोरपणे निर्णय घ्यावयाचा झाल्यास, जिल्हा परिषदेमध्ये कृषिविषयक कामे करणाऱ्या व ज्यांची स्वतंत्र ज्येष्ठता सूची ठेवण्यात आलेली आहे अशाच फक्त कृषी सहायकांना वरील दिनांक ८ डिसेंबर १९९४ च्या आदेशांचा लाभ देता येईल. तसे करावयाचे झाल्यास कृषी सहायक व ग्रामसेवक या दोन पदांच्या अधिकारश्रेणी व पदोन्नतीची साखळी मात्र जिल्हा परिषदेमध्ये प्रत्येकी स्वतंत्रपणे, वेगळीच, ठेवावी लागेल.

३. दिनांक ७ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे सह सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# राज्य वेतन सुधारणा समिती
# १९९७

# अहवाल

### भाग-१

# प्रभाग दोन

## प्रस्ताव क्रमांक--एक

**प्रशासकीय विभाग** : कृषी व सहकार विभाग

**विभाग प्रमुख** : कृषी विद्यापीठे

**प्रस्ताव** : महात्मा फुले कृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ वगळता राज्यातील उर्वरित ३ कृषी विद्यापीठामधील कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना त्या विद्यापीठांच्या स्थापनेपासूनच लागू करण्यात आली आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना ही योजना दिनांक २५ जुलै १९८३ पासून, म्हणजे अशी योजना त्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यासंबंधीचे आदेश निर्गमित केल्याच्या तारखेपासून, लागू करण्यात आली आहे. संदर्भाधीन प्रस्ताव स्वीकृत केल्यास जास्तीत जास्त १४ कर्मचाऱ्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. प्राप्त परिस्थितीत सर्व विद्यापीठांमध्ये निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत एकवाक्यता राहण्याच्यादृष्टीने वरील प्रस्ताव स्वीकृत करण्यास हरकत नसावी. ही योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करताना संबंधित कर्मचाऱ्यांना ही योजना स्वीकृत करण्याबाबत विकल्प देण्यात यावा. त्यांनी विकल्प देऊन योजना स्वीकारल्यास त्यांना त्यांनी अंशदायी भविष्य निर्वाह निधीची रक्कम पूर्वीच घेतलेली असल्यास त्यापैकी व्यवस्थापनातर्फे (विद्यापीठातर्फे) देण्यात आलेल्या हिस्स्याची रक्कम मात्र त्यांना शासनाकडे (ही रक्कम घेतलेल्या दिवसापासून शासनाकडे तिचा भरणा केला जाईपर्यन्त वेळोवेळीच्या प्रचलित व्याज दरानुसार परिगणित केलेल्या त्यावरील व्याजाच्या रकमेसह) भरणा करावी लागेल. या अटीच्या आणि निवृत्तीवेतन योजनेच्या संदर्भात विहित करण्यात आलेल्या इतर सर्वसाधारण अटी व शर्तीच्या अधीन राहून निवृत्तीवेतन योजना महात्मा फुले कृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना त्या विद्यापीठाच्या स्थापनेपासून लागू करण्यास हरकत नसावी.

२. दिनांक ३ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाचे सचिव व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रस्ताव क्रमांक--दोन

**प्रशासकीय विभाग** : शिक्षण व सेवायोजन विभाग

**विभाग प्रमुख** : संचालक, शिक्षण संचालनालय

**प्रस्ताव** : सराव पाठशाळेतील शिक्षकांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : वेगवेगळ्या संवर्गातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेळोवेळी तदर्थ निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आलेल्या होत्या. न्यायालयीन निवाड्याच्या परिणाम-स्वरूप संबंधितांना नियमित निँवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनाची योजना त्यानंतर लागू करण्यात आली आहे. अशासकीय अध्यापक विद्यालयांना जोडलेल्या ज्या २४ अनुदानीत सराव पाठशाळा अस्तित्वात आहेत त्या मूलतः प्राथमिक शाळाच आहेत. त्यामुळे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने या संवर्गातील शिक्षकीय पदांना देखील नियमित निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन योजना (संबंधित सर्वसाधारण अटी व शर्तीच्या अधीन राहून) लागू करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे. दिनांक १५ ऑगस्ट १९४७ ते ३१ मार्च १९७९ या दरम्यान सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांची केवळ १२ पदे विचारात घेता यावरील खर्च लक्षणीय राहणार नाही.

२. दिनांक ५ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागाच्या सचिव उपस्थित होत्या.

# प्रस्ताव क्रमांक––तीन

**प्रशासकीय विभाग** : सार्वजनिक आरोग्य विभाग

**विभाग प्रमुख** : संचालक, आरोग्य सेवा संचालनालय

**प्रस्ताव** : सार्वजनिक आरोग्य विभागातील औषधनिर्माता या पदास केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंबकल्याण विभागाच्या दिनांक २५ जानेवारी १९८८ च्या आदेशांच्या अनुषंगाने रुग्ण देखभाल भत्ता लागू करणे.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : केंद्र शासनाने आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या आदेश क्रमांक झेड २८०१५/६०/८७-एच, दिनांक २५ जानेवारी १९८८ च्या आदेशान्वये इस्पितळामधील निम-वैद्यकीय कर्मचाऱ्यांना रु. ८० एवढा मासिक रुग्ण देखभाल भत्ता मंजूर केलेला आहे. राज्यातील विविध इस्पितळामधील औषधनिर्माता/मिश्रक या पदधारकास आपली कर्तव्ये बजावीत असताना निरनिराळ्या रोगांनी पिडीत रुग्णांशी त्यांचा संबंध येत असल्याने, '' जोखीम '' हा घटक अंतर्भूत असलेला रुग्ण देखभाल भत्ता त्यांना योग्य सुधारित दराने मंजूर करण्याबाबत ही समिती शिफारस करीत आहे. हा भत्ता संबंधितांना दिनांक १ जानेवारी १९८८ पासून मंजूर करण्यात यावा व या भत्त्याची अनुज्ञेयता इस्पितळामधील बाह्य रुग्णांना औषधे देण्याबाबतची कर्तव्ये बजावणाऱ्या औषधनिर्माता/मिश्रकांपुरतीच मर्यादित ठेवण्यात यावी. गोडाऊनमधील औषधे हाताळण्यासंबंधीची कामे करणाऱ्या मिश्रकांना हा भत्ता अनुज्ञेय होणार नाही.

२. दिनांक २५ मार्च १९९८ रोजी झालेल्या वरील बैठकीस प्रशासकीय विभागांचे उप सचिव व संघटनेंचे पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रस्ताव क्रमांक––चार

**प्रस्ताव** : नियत/एकत्रिकृत वेतनावर असलेल्या अंशकालिक पदांच्या वेतनदरात सुधारणा करण्याबाबत.

**समितीचा निष्कर्ष तथा शिफारस** : जे कर्मचारी अंशकालिक पदावर काम करतात आणि नियत/एकत्रिकृत वेतन घेतात, अशा कर्मचाऱ्यांच्या वेतनदरात वित्त विभागाच्या दिनांक ५ एप्रिल १९९० च्या शासन निर्णयानुसार त्यांना मिळत असलेल्या वित्तलब्धीत सुधारणा करून दिनांक १ जानेवारी १९८६ पासून किमान वित्तलब्धी रु. १४० दरमहा करण्यात आलेली आहे.

२. नियत/एकत्रिकृत वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनदरात एरव्ही राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनात केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन सुधारणा केल्यानंतरच सुधारणा करण्यात येते. त्या अनुषंगाने, अंशकालिक पदांवर नियत/एकत्रिकृत वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत यापूर्वी दिनांक १ एप्रिल १९७६ व १ जानेवारी १९८६ पासून नियत/एकत्रिकृत वेतनाच्या दरात वाढ करताना घेण्यात आलेले निकष, म्हणजेच त्या त्या दिनांकास मिळणाऱ्या नियत/एकत्रिकृत दरमहा वेतनाच्या दरात अनुक्रमे रु. ३० व रु. ५० तसेच रु. ६० व रु. १०० अशी वाढ करण्यात आलेली आहे. असे असले तरी हा विषय विनिर्दिष्टपणे या समितीकडे सोपविला असल्याने याबाबतची पूर्वपीठिका विचारात घेऊन समिती अशी शिफारस करीत आहे कीं, एकत्रिकृत वेतन घेणाऱ्या अंशकालिक कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी १९८६ पासून मिळत असलेल्या वित्तलब्धीवर ८० टक्के एवढी समान वाढ दिनांक १ जानेवारी १९९८ पासून मंजूर करण्यात यावी. प्रस्तुत ८० टक्के अतिरिक्त वाढ विचारात घेऊन संबंधितांच्या एकूण वित्तलब्धीची रक्कम दरमहा रु. ६०० एवढ्या मर्यादेत राहील अशीही अट याबाबत समिती सुचवित आहे.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# महाराष्ट्र राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७

**अहवाल-भाग-१**

प्रस्ताव क्रमांक ३३

विषय :- महाराष्ट्र राज्य कर्मचारी समन्वय महासंघ तथा महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन यांच्या मागण्यांबाबत

उपरोक्त कर्मचारी महासंघाच्या जिल्हा परिषदांमधील कांही संवर्ग पदांना दिनांक १ जानेवारी १९८६ पासून सुधारित वेतनश्रेणी विहित करताना झालेल्या ''अन्यायाच्या'' संदर्भातील प्रस्ताव पूर्वीच्या अन्याय निवारण समितीसमोर कांही तांत्रिक अडचणीमुळे विचारार्थ ठेवता न आल्यामुळे त्यासंबंधीच्या परिक्षणाचा समावेश राज्य वेतन सुधारणा समितीच्या अहवाल भाग-१ मध्ये होऊ शकला नाही. म्हणून या महासंघाच्या मागण्या विचारात घेऊन आणि मा.मंत्री (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या उप समितीच्या त्या संबंधातील शिफारशी अभ्यासून त्यांवर राज्य वेतन सुधारणा समितीने आपल्या शिफारशी द्याव्यात असा निर्णय मंत्रीमंडळाने घेतला असल्यामुळे, या प्रयोजनासाठी पुनरुज्जीवित करण्यात आलेल्या राज्य वेतन सुधारणा समितीच्या सर्वंकष विचारांती याबाबतच्या शिफारशी खालील परिच्छेदात उद्धृत केल्या आहेत.

२. उपरोक्त मागण्यांचा विचार करण्यासाठी मा.मंत्री (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या उप समितीचा औपचारिक अंतिम अहवाल सादर झाल्याचे दिसून येत नाही. परंतु त्या उप समितीच्या दिनांक १८ ऑगस्ट १९९८ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तावरून त्या उप समितीने ज्या शिफारशी करावयाचे ठरविले होते त्यांचे आम्ही अवलोकन केले. या कार्यवृत्तावरून खालील परिच्छेद २ मध्ये निर्देश केलेल्या १० पदां व्यतिरिक्त विस्तार अधिकारी (शिक्षण, श्रेणी-२) या पदाच्या वेतनश्रेणीबाबत देखिल उपरोक्त उप समितीच्या बैठकीमध्ये चर्चा झाल्याचे दिसून येते.

३. दिनांक १० सप्टेंबर १९९८ रोजी प्रस्तुत मागण्याबाबत श्री.म.वा.ओंकार, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कर्मचारी समन्वय महासंघ तथा महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन आणि सचिव, ग्राम विकास विभाग यांच्यासोबत झालेल्या बैठकीमध्ये विचाराधीन बाबींसंबंधी सविस्तर व प्रदीर्घ चर्चा करण्यात आली. महासंघाच्या मागण्या-वजा-प्रस्तावामध्ये जिल्हा परिषदांमधील खालील पदांना दिनांक १ जानेवारी १९८६ पासून विहित करण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यामध्ये अन्याय झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

| अ.क्र. | पदनाम | असुधारित वेतनश्रेणी | १ जानेवारी १९८६ पासूनची सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | शिपाई | रू.२००-२८० | रू.७५०-९४० |
| २. | नाईक/हवालदार | रू.२०५-३५५ | रू.७७५-११५० |
| ३. | लिपिक (कनिष्ठ सहाय्यक) | रू.२६०-४९५ | रू.९५०-१५०० |
| ४. | वरिष्ठ लिपिक (वरिष्ठ सहाय्यक) | रू.३३५-६८० | रू.१२००-२०४० |
| ५. | मुख्य लिपिक (कार्यालयीन अधिक्षक) | रू.३९५-८०० | रू.१४००-२६०० |
| ६. | अधिक्षक (कक्ष अधिकारी) | रू.५००-९०० | रू.१६४०-२९०० |
| ७. | मुख्य लेखापाल | रू.५००-९०० | रू.१६४०-२९०० |
| ८. | उप लेखापाल | रू.३९५-८०० | रू.१४००-२६००. |
| ९. | वरिष्ठ सहाय्यक लेखापाल | रू.३३५-६८० | रू.१२००-२०४० |
| १०. | वाहनचालक | रू.२६०-४९५ | रू.९५०-१५०० |

४. प्रस्तुत प्रकरणी या समितीला सुरूवातीसच असे स्पष्ट करावेसें वाटते कीं, जिल्हा परिषदांमध्यें शिपाई/परिचर, नाईक/हवालदार, वाहनचालक तसेंच लिपिकवर्गीय आणि लेखावर्गीय अशीं उपरोल्लेखित जीं पदें आहेत व ज्या पदांच्या वेतनश्रेणींच्या संदर्भात श्री.ओंकार यांनी त्यांच्या संघटनेमार्फत प्रस्तुत मागण्या मांडलेल्या आहेत तीं सर्व पदें खरें पाहता सर्वसामान्य स्वरूपाची अशींच आहेत. असे म्हणण्याचे कारण हें कीं तींच वा तत्सम पदें राज्य क्षेत्र (स्टेट सेक्टर) मध्ये देखिल जवळजवळ सर्वच शासकीय विभागांच्या क्षेत्रीय/दुय्यम कार्यालयांमध्ये अस्तित्वात आहेत.

**शिपाई, नाईक/हवालदार व वाहन चालक**

५. वर म्हटल्याप्रमाणे, उपरोक्त पदें सर्वसामान्य स्वरूपाचीं असून तीं राज्य क्षेत्रामधील सर्व क्षेत्रीय व दुय्यम कार्यालयामध्ये देखिल अस्तित्वात आहेत. राज्य क्षेत्रामधील या कार्यालयातील तत्सम पदांना ज्या सुधारित वेतनश्रेणी दिनांक १-१-८६ पासून मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्याच वेतनश्रेणी जिल्हा परिषदांमधील उपरोक्त पदांनाही मंजूर केलेल्या आहेत. राज्य शासनाकडील उपरोक्त पदांसाठी दिनांक १ जानेवारी १९८६ पूर्वी अंमलात असलेल्या (असुधारित) वेतनश्रेणी केंद्र शासनाकडील तत्सम पदांसाठी त्यावेळी अस्तित्वात असलेल्या (असुधारित) वेतनश्रेणींपेक्षा थोडया वरच्या होत्या हें खरे आहे. महासंघाने सुचविल्याप्रमाणे राज्य शासनाकडील उपरोक्त पदांसाठी त्या पदांच्या असुधारित वेतनश्रेणींकरीतां केंद्र शासनाकडील समरूप वेतनश्रेणी मंजूर केल्या असत्या तर केंद्र शासनाकडील व राज्य शासनाकडील शिपाई, हवालदार, वाहनचालक अशा सर्वसामान्य स्वरूपाच्या पदांना दोन वेगवेगळया वेतनश्रेणी प्रत्यक्षांत मंजूर झाल्या असत्या आणि अशा परिस्थितीत केंद्र शासनाकडील समकक्ष पदाच्यां वेतनश्रेणी राज्य शासनाकडील तत्सम पदांना विहित करण्याबाबत राज्य शासनाने घेतलेल्या मुलभूत अशा सर्वसाधारण धोरणात्मक निर्णयालाच बाधा पोहोचली असती. चौथ्या वेतन सुधारणेच्या वेळी सुधारित वेतनश्रेणी मध्ये

वेतननिश्चिती करण्यासंबंधीचे नियम विहित करताना कोणाचेही आर्थिक नुकसान होणार नाही याची विशेष काळजी घेण्यात आली होती, असेच परिक्षणांती दिसून येते. या संबधी विस्ताराने असे स्पष्ट करतां येईल की, १९८६ पूर्वीच्या असुधारित वेतनश्रेणीमध्ये कमाल वेतनाच्या टप्प्यावर दिनांक १ जानेवारी १९८६ रोजी वेतन घेणा-या कर्मचा-यांच्या त्या रोजीच्या एकूण वित्तलब्धी(इमोल्यूमेंटस्) संरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या काल्पनिक वेतनवाढी अशा कर्मचा-यांना सुधारित वेतनश्रेणीमध्ये मंजूर करून त्यानंतरच त्यांची सुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतननिश्चिती करण्यात आली होती. त्यामुळे कोणत्याही कर्मचा-यास प्रत्यक्षात तो घेत असलेल्या वित्तलब्धीपेक्षा कमी रक्कम सुधारित वेतनश्रेणीत मिळालेली नव्हती. तसेच वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचा-यांना वेतननिश्चिती नंतर ३ वार्षिक वेतनवाढी व त्यानंतर ३ द्विवार्षिक कुंठित वेतनवाढी देखिल आश्वासित करण्यात आल्या होत्या. अशा रीतीने, आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व एकूण वित्तलब्धी संरक्षित राहण्यासाठी वार्षिक वेतनवाढी अनुज्ञेय करण्याबाबत नियमात खास तरतूद करून शासनाने आवश्यक ती काळजी घेतली होती. ही वस्तुस्थिती लक्षात घेतां, सर्वसाधारण मागणी म्हणून केंद्र शासनाच्या वेतनश्रेणींशी समकक्षतेची एका बाजूने मागणी करावयाची व दुस-या बाजूने या सर्वसाधारण मागणीला बगल देऊन केंद्र शासनाकडील तत्सम पदांच्या वेतनश्रेणीपेक्षां वेगळी (म्हणजचे उच्च) वेतनश्रेणीची मागणी देखील काहीं थोडया पदांसाठी (त्या पदांच्या राज्य शासनाकडील पूर्वीच्या वेतनश्रेणी थोडयाशा वरच्या होत्या या सबबीवर ) सतत मांडत रहावयाची, ही विसंगती वा परस्पर विरोधी भूमिकाच श्री.ओंकार यांच्या महासंघाने घेतलेल्या पवित्र्याद्वारें दिसून येते. म्हणून, उपरोक्त एकूण पार्श्वभूमिचा विचार करता, संबंधित कर्मचा-यांचे नुकसान झालेले आहे वा होत आहे हा या महासंघाने मांडलेला मुद्दा समितीस ग्राहय वाटत नाही.

<u>**लिपिकवर्गीय पदें**</u>

६. ''कनिष्ठ सहाय्यक', ''वरिष्ठ सहाय्यक'', 'कार्यालयीन अधिक्षक'', आणि ''कक्ष अधिकारी'' हीं पदनामे असलेल्या जिल्हा परिषदांकडील पदांचा जरी वरील परिच्छेद ३ मधील तक्त्यात निर्देश केला असला तरी नेमकी तीं पदनामे असलेली पदे **राज्य क्षेत्रामधील क्षेत्रीय वा दुय्यम कार्यालयात** अस्तित्वात नाहीत या एकच कारणास्तव उपरोक्त पदनामे असलेल्या जिल्हा परिषदांमधील पदांसाठी भिन्न व उच्च अशी वेतनश्रेणी मंजूर करण्याची मागणी मान्य करणे योग्य होईल असे समितीस वाटत नाही. वेतनश्रेणी ठरविताना एखाद्या पदाचे पदनाम कोणते आहे यापेक्षा त्या पदाकरीता सेवाभरतीसाठी अर्हता विषयक नियम व निवड पध्दती आणि संबंधित पदाची कर्तव्यें आणि जबाबदा-या व कामकाजाचे स्वरूप काय आहे व तें पद सर्वसामान्यपणे कोणत्या प्रकारच्या अधिकारश्रेणीतील आहे याबाबींचाच सर्वंकष विचार करणे आवश्यक ठरते. म्हणूनच ''कक्ष अधिकारी'' या जिल्हा परिषदांतील पदाची तुलना शासकीय विभागांच्या क्षेत्रीय/दुय्यम कार्यालयांतील तत्सम पदाशी न करता केवळ पदनामातील साम्यतेच्या आधारावर मंत्रालयातील ''कक्ष अधिकारी'' या पदाशी करणे किंवा तद्वतच ''वरिष्ठ सहाय्यक'' या जिल्हा परिषदांतील पदाची तुलना मंत्रालयातील ''सहाय्यकाच्या'' पदाशीं करणे, हे संयुक्तिक नाही. किंबहुना, ''लिपिक'' ''सहाय्यक'', ''कक्ष अधिकारी'' व ''अवर सचिव'' हीं केवळ मंत्रालयात अस्तित्वात असलेली अधिकारश्रेणी शासनाच्या कोणत्याही प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय/दुय्यम कार्यालयात अस्तित्वात नाही. सर्वसाधारणपणे (संदर्भासाठी जोडलेले विवरणपत्र पहावे) शासनाच्या विविध क्षेत्रीय/दुय्यम कार्यालयातील तत्सम लिपिकवर्गीय पदांची अधिकारश्रेणी पाहिल्यास असें दिसून येईल कीं, या अधिकारश्रेणीमध्ये चढत्या क्रमाने चार पाय-या आहेत व या चार पाय-यावरील पदांच्या पदनामात काही प्रमाणात भिन्नता आढळून येत असली तरी त्या पदांसाठी मंजूर करण्यात

आलेल्या वेतनश्रेणी अनुक्रमे (लिपिक) रू.९५०-१५००, (वरिष्ठ लिपिक)रू.१२००-२०४० (मुख्य लिपिक/सहाय्यक अधिक्षक) रू.१४००-२६०० व (अधिक्षक) रू.१६४०-२९०० अशा आहेत. (फक्त महसूल विभागांतर्गत कार्यालये व त्यांचा कित्ता गिरवणारी अल्प बचत संचालनालयातील दुय्यम कार्यालये असे दोनच अपवाद याला दिसून येतात. हे अपवाद असण्याच्या कारणांचा उहापोह यानंतर पुढे केलेला आहे. ) नेमकी अशाच प्रकारची अधिकारश्रेणी असलेली सर्वसाधारण कामकाजासाठीची लिपिकवर्गीय पदें जिल्हा परिषदांमध्येही अस्तित्वात आहेत. जिल्हा परिषदांची कार्यालये ही देखिल क्षेत्रीय कार्यालयेच असून मंत्रालयाशी त्यांची तुलना करणे अप्रस्तुत आहे याबद्दल दुमत नसावे. प्रत्यक्षात जिल्हा परिषदांमधील कार्यालयीन वा लिपिकवर्गीय अधिकारश्रेणीतील पदांना राज्य क्षेत्रामधील क्षेत्रीय/दुय्यम कार्यालयातील अधिकारश्रेणीमधील तत्सम पदांची समकक्षता पूर्वीपासूनच देण्यात आलेली असून त्यानुसार त्यांना राज्य क्षेत्रामधील तत्सम पदांच्यांच वेतनश्रेणी लागू करण्यात आलेल्या आहेत. या तुलनात्मक अभ्यासावरून हें स्पष्ट होईल की, केवळ पदनामात भिन्नता आहे या एकच कारणास्तव जिल्हा परषिदांमधील कार्यालयीन वा लिपिकवर्गीय अधिकारश्रेणीतील पदांना राज्य क्षेत्रामधील तत्सम वा तुलनीय पदांच्या वेतनश्रेणीपेक्षा भिन्न वा वरच्या वेतनश्रेणी मंजूर करण्याची मागणी मान्य करणे योग्य होणार नाही.

७. वर म्हटल्याप्रमाणे, केवळ महसूल विभाग व त्याच धर्तीवरील अल्पबचत संचालनालयांतर्गत कार्यालये यांचा विचार केल्यास महसूल विभागाच्या अंतर्गत कार्यालयांतील ''अव्वल कारकून'' या पदास रू.१२००-२०४० या इतरत्र असलेल्या ''वरिष्ठ लिपिक'' या पदापेक्षा वेगळी, म्हणजे रु.१४००-२३०० ही वरची वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्याचे दिसून येते. ही वेतनश्रेणी कां मंजूर करण्यात आली याचे स्पष्टीकरण वेतन समानीकरण समितीच्या ( नाईक समितीच्या) अहवालातील परिच्छेद ३.७ मध्ये दिले आहे. त्या अहवालात म्हटल्याप्रमाणे, ''अव्वल कारकून'' या पदासाठी वा तत्सम मंडळ

अधिकारी आदी इतर पदनामे असलेल्या पदासाठी) रु.१४००-२३०० ही थोडी उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्याचे कारण असे की, **या विविध पदनामे असलेल्या समकक्ष पदांच्या एकत्रित संवर्गातील पदांना** कार्यकारी जबाबदारी पार पाडावी लागते. या एकत्रित संवर्गातील सर्व वा बहुसंख्य पदांना अशा प्रकारची जबाबदारी पार पाडावी लागते किंवा कसे हे वेळेच्या अभावी या समितीला अभ्यासता आलेले नाही. परंतु या संबंधात नाईक समितीने पूर्ण विचारांती केलेली विशिष्ट शिफारस लक्षात घेता या बाबत वेगळा दृष्टीकोन घेण्याचे या समितीला कारण दिसत नाही. हे नमूद करताना या समितीला पुढे असेही म्हणावेसे वाटते की, केवळ या एकच अपवादावर आधार ठेवून आणि राज्य क्षेत्रातील इतर सर्व, बहुसंख्य, क्षेत्रीय/दुय्यम कार्यालयांतील पूर्वापार व सध्यांही अस्तित्वात असलेली कार्यालयीन तथा लिपिकवर्गीय अधिकारश्रेणी संबंधीची व तदनुषंगिक वेतनश्रेणींची वस्तुस्थिती पूर्णपणे नजरेआड करून, जिल्हा परिषदांतील कार्यालयांमधील कार्यालयीन तथा लिपिकवर्गीय पदांसाठी उच्च वेतनश्रेणी मंजूर करणे संयुक्तिक होणार नाही. किंबहुना, राज्य क्षेत्रातील क्षेत्रीय/दुय्यम कार्यालयांमधील तत्सम अधिकारश्रेणीतील पदधारकांकडूनही याच धर्तीवर वरची वेतनश्रेणी मंजूर करण्याची मागणी या समितीपुढे करण्यात आलेली असतां ती पूर्ण विचारांती आम्ही (आमचा अहवाल भाग-२ सादर करताना) मान्य केलेली नाही, याचा या संदर्भात उल्लेख करणे आम्हास आवश्यक वाटते.

८. कार्यालयीन वा लिपिक अधिकारश्रेणीतील पदांसाठी सुधारित वेतनश्रेणी मंजूर करताना त्यांच्यावर अन्याय झाला आहे या मुद्याच्या पुष्ट्यर्थ डॉक्टर्स, इंजिनियर्स, स्टेनोग्राफर्स, तसेच पशु वैद्यकीय विभाग, शेती विभाग, वन विभाग, स्वास्थ्य विभाग, यांचे अंतर्गत तांत्रिक जबाबदाऱ्या असलेल्या क्षेत्रीय पदांसाठी मात्र तुलनेने वरच्या वेतनश्रेणी, पूर्वी झालेल्या सर्वसाधारण वेतन सुधारणेच्या अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या आहेत असा मुद्दा

समितीपुढे मांडण्यात आला. अशा प्रकारची तुलना या दोन प्रकारच्या पदांसाठीची अर्हता, त्यांच्या कामकाजाचे स्वरूप आणि कर्तव्ये व जबाबदा-या यांमधील उघड व सुस्पष्ट भिन्नता याबाबीं लक्षात घेतां समर्थनीय नाही असे आम्हास वाटते. किंबहुना या मुद्यावर सविस्तर विवेचन करण्याची समितीस आवश्यकता वाटत नाही.

**लेखावर्गीय पदें**

९. हेड अकौंटंट, डेप्युटी अकौंटंट, सिनियर आसिस्टंट अकौंटंट या जिल्हा परिषदांतील लेखावर्गीय पदांची तुलना पूर्वी महासंघाने अनुक्रमे ''वन क्षेत्रपाल'', ''सहाय्यक पोलिस निरीक्षक'','' कनिष्ठ अभियंता ''आणि ''अव्वल कारकून'' या पदांशी केली होती. प्रत्यक्षात तुलना केलेल्या या पदांचे सेवाप्रवेश नियम, कर्तव्ये तथा कामकाज आणि जबाबदा-या या अगदीच भिन्न असल्यामुळे ही तुलना अप्रस्तुत वाटते. त्यामुळे त्या पदांच्या वेतनश्रेणीं लेखावर्गीय उपरोक्त पदांस लागू करतां येण्यासारख्या नाहीत. आता महासंघाने जिल्हा परिषदांमध्ये लेखा विषयक कामकाज पाहणाऱ्या वर नमूद केलेल्या पदांची तुलना लेखा व कोषागारे संचालनालयातील पदांबरोबर करून वरच्या वेतनश्रेणीची मागणी केलेली आहे. लेखा व कोषागारे संचालनालयामध्ये ''प्रमुख लेखापाल'', ''उप लेखापाल ''आणि ''टिप्पणी सहाय्यक'' / ''वरिष्ठ लिपिक ''/ ''उच्चस्तर लिपिक'' ही तत्सम पदें देखिल अनुक्रमे रू.१६४०-२९००, रू.१४००-२६०० व रू.१२००-२०४० या वेतनश्रेणीतच असल्यामुळे लेखा व कोषागारे संचालनालयातील पदांशी तुलना केल्यामुळे वरच्या वेतनश्रेणी प्रस्तुत प्रकरणी अनुज्ञेय होत नाहीत.

१०. विस्तार अधिकारी (शिक्षण श्रेणी-२) या पदाच्या वेतनश्रेणीबाबत उपरोक्त महासंघाने आमच्याशी झालेल्या चर्चेत उल्लेख केला नाही. तसेच मा.मंत्री (ग्राम विकास) यांच्या

अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या उप समितीच्या दिनांक १८ ऑगस्ट १९९८ रोजीं झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतही ''याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येत आहे'' असें म्हटले आहे. त्यामुळे या मुद्याबाबत आमचे कोणतेही अभिप्राय नाहीत.

११. परिणामतः, उपरोक्त महासंघाने उल्लेखिलेल्या पदांकरीता सुधारित वेतनश्रेणी मंजूर करताना अन्याय झाल्यामुळे त्यांचेसाठी उच्च सुधारित वेतनश्रेणी मान्य करण्यात याव्यात ही त्यांनी केलेली मागणी स्वीकारार्ह नाहीं असें अखेरीस संक्षेपाने ही समिती नमूद करूं इच्छिते.

द.म.सुकथनकर
२९-९-१९९८

(द.म.सुकथनकर)
अध्यक्ष
राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७

राजेन्द्र सिंह
(राजेंद्र सिंह) २९/९/९८
सदस्य
राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७

न. कुमार
(नविन कुमार) २९.९.९८
सदस्य
राज्य वेतन सुधारणा समिती,१९९७.

# विवरणपत्र

लिपिकवर्गीय संवर्ग पदांमधील विविध प्रशासकीय विभागाखालील पदांची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र<br>१ | विभाग प्रमुखाचे नांव<br>२ | अ.क्र<br>३ | पदनाम<br>४ | वेतनश्रेणी<br>५ |
|---|---|---|---|---|
| १ | कृषि संचालनालय | १ | अधिक्षक | १६४०-२९०० |
| | | २ | सहाय्यक अधिक्षक | १४००-२६०० |
| | | ३ | वरिष्ठ लिपिक | १२००-२०४० |
| | | ४ | लिपिक | ९५०-१५०० |
| २ | दुग्ध व्यवसाय विभाग | १ | अधिक्षक | १६४०-२९०० |
| | | २ | प्रमुख लिपिक | १४००-२६०० |
| | | ३ | वरिष्ठ लिपिक | १२००-२०४० |
| | | ४ | लिपिक | ९५०-१५०० |
| ३ | शिक्षण संचालनालय | १ | अधिक्षक | १६४०-२९०० |
| | | २ | मुख्य लिपिक | १४००-२६०० |
| | | ३ | वरिष्ठ लिपिक | १२००-२०४० |
| | | ४ | लिपिक | ९५०-१५०० |
| ४ | लेखा व कोषागारे संचालनालय | १ | अधिक्षक | १६४०-२९०० |
| | | २ | सहाय्यक अधिक्षक | १४००-२६०० |
| | | ३ | निवडश्रेणी लिपिक | १४००-२६०० |
| | | ४ | वरिष्ठ लिपिक | १२००-२०४० |
| | | ५ | लिपिक | ९५०-१५०० |
| ५ | अल्पबचत संचालनालय | १ | सहाय्यक | १४००-२६०० |
| | | २ | अव्वल कारकून | १४००-२३०० |
| | | ३ | लिपिक | ९५०-१५०० |
| ६ | संचालक, नागरी पुरवठा (गोदाम व वाहतुक) | १ | अधिक्षक | १६४०-२९०० |
| | | २ | मुख्य लिपिक | १४००-२६०० |
| | | ३ | वरिष्ठ लिपिक | १२००-२०४० |
| | | ४ | कनिष्ठ लिपिक | ९५०-१५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | पोलिस महानिरीक्षक | १ | कार्यालय अधिक्षक | १६४०-२९०० |
| | | २ | प्रमुख लिपिक | १४००-२६०० |
| | | ३ | वरिष्ठश्रेणी लिपिक | १२००-२०४० |
| | | ४ | मुख्य लिपिक | ९७५-१६६० |
| | | ५ | लिपिक- नि—टंकलेखक | ९५०-१५०० |
| ८ | परिवहन आयुक्त | १ | कार्यालय अधिक्षक | १६४०-२९०० |
| | | २ | प्रमुख लिपिक | १६४०-२९०० |
| | | ३ | वरिष्ठ लिपिक | १२००-२०४० |
| | | ४ | कनिष्ठ लिपिक | ९५०-१५०० |
| ९ | पाटबंधारे विभाग (सर्व प्रादेशिक मंडले) | १ | अधिक्षक | १६४०-२९०० |
| | | २ | मंडल प्रमुख लिपिक | १६४०-२९०० |
| | | ३ | प्रथम लिपिक | १४००-२६०० |
| | | ४ | वरिष्ठ लिपिक | १२००-२०४० |
| | | ५ | कनिष्ठ लिपिक | ९५०-१५०० |
| १० | सार्वजनिक बांधकाम विभाग (सर्व मंडले) | १ | अधिक्षक | १६४०-२९०० |
| | | २ | प्रथम लिपिक | १४००-२६०० |
| | | ३ | वरिष्ठ लिपिक | १२००-२०४० |
| | | ४ | कनिष्ठ लिपिक | ९५०-१५०० |
| ११ | मुख्य अभियंता (विद्युत) | १ | अधिक्षक | १६४०-२९०० |
| | | २ | प्रमुख लिपिक | १४००-२६०० |
| | | ३ | प्रथम लिपिक | १४००-२६०० |
| | | ४ | वरिष्ठ लिपिक | १२००-२०४० |
| | | ५ | कारकून | ९५०-१५०० |
| १२ | वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय | १ | कार्यालय अधिक्षक | १६४०-२९०० |
| | | २ | प्रमुख्य लिपिक | १४००-२६०० |
| | | ३ | वरिष्ठ सहाय्यक | १४००-२६०० |
| | | ४ | वरिष्ठ लिपिक | १२००-२०४० |
| | | ५ | द्वितीय लिपिक | १२००-२०४० |
| | | ६ | कनिष्ठ लिपिक | ९५०-१५०० |



# राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७

# अहवाल

## भाग २


श्री. द. म. सुकथनकर

अध्यक्ष

श्री. राजेंद्र सिंह

सदस्य

श्री. नवीन कुमार

सदस्य



मुंबई

१९९८

# राज्य वेतन सुधारणा समिति

# १९९७

# अहवाल

## भाग-२


श्री.द.म.सुकथनकर
अध्यक्ष
सेवानिवृत्त मुख्य सचिव
महाराष्ट्र शासन

श्री.राजेंद्र सिंह
सदस्य
प्रधान सचिव (व्यय)
वित्त विभाग
महाराष्ट्र शासन

श्री.नवीन कुमार
सदस्य
प्रधान सचिव (सेवा)
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन



मुंबई
३१ जुलै १९९८

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १ | प्रस्तावना | ०१ |
| २ | कर्मचारी संघटनांची प्रतिपादने | ०९ |
| ३ | पुनःपरिक्षण | २१ |
| ४ | दृष्टिकोन | ४२ |
| ५ | विशेष वेतन | ७३ |
| ६ | स्पष्टीकरणात्मक टीपा | ८० |
| ७ | ऋणनिर्देश | १३४ |
| ८ | जोडपत्रे | १३६ |

## प्रकरण-१

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्याची दिनांक १ मे, १९६० रोजी स्थापना झाल्यानंतर राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यासंबंधात शिफारशीं करण्यासाठीं राज्य शासनाने १९६५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री.जी.बी.बडकस यांच्या अध्यक्षतेखाली पहिला वेतन आयोग नियुक्त केला होता. त्यानंतर १९७५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री.आर.आर.भोळे यांच्या अध्यक्षतेखाली दुस-या वेतन आयोगाची नियुक्ती करण्यात आली होती. भोळे वेतन आयोगाच्या शिफारशींवर निर्णय घेताना राज्य शासनाने असाही निर्णय घेतला कीं '' राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी सुधारण्याकरीता स्वतंत्र वेतन आयोग नियुक्त न करता, केंद्र शासन जेव्हां जेव्हां केंद्रीय कर्मचा-यांकरीता वेतन आयोग नियुक्त करील त्या वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे वेतनश्रेणी विषयक निर्णय राज्य शासकीय कर्मचा-यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतननिश्चितीचे सूत्र देखील केंद्र शासनाप्रमाणे असेल.''

१.२ राज्य शासनाच्या वरील धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने चवथ्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाच्या निर्णयानुसार तेथील कर्मचा-यांना विहित करण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेणी राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांना लागू करण्यासंबंधात राज्य शासनाने डिसेंबर १९८६ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री.एन.बी.नाईक यांच्या अध्यक्षतेखाली '' वेतन समानीकरण समिती'' ची नियुक्ती केली होती. सदर समितीच्या शिफारशींवर राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी १९८६ पासून सुधारित वेतनश्रेणीं अनुज्ञेय करण्यात आल्या होत्या. वेतन समानीकरण समितीच्या शिफारशींवर आधारित सुधारित वेतनश्रेणी विहित केल्यानंतर त्यामध्ये काहीं विसंगती राहून गेल्या असण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य शासनाने श्री.एस.रामकृष्ण, अपर मुख्य सचिव,यांच्या अध्यक्षतेखाली त्यानंतर

'' वेतन त्रूटी समितीची '' नियुक्ती केली होती. सदर समितीच्या शिफारशींवर राज्य शासनाने निर्णय घेतल्यानंतरही राज्य शासनाने काहीं संवर्ग पदाच्या वेतनश्रेणी पुनःसुधारित केल्या, (उदा. कृषि, पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम, महसूल व वने, गृह इत्यादी विभागातील पदें). त्यामुळे इतर विविध प्रशासकीय विभागातील वेगवेगळया संवर्गातील पदधारकांकडून त्यांच्या वेतनश्रेणीबाबत त्यांच्यावर अन्याय झाला असून त्या पुन्हा सुधारण्याबाबत निवेदने शासनाकडे प्राप्त होत होती. सदर प्रकरणांवर तुटकपणे निर्णय घेण्याऐवजी एकत्रितपणे निर्णय घेण्याकरीता मा.मंत्री, (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२-९-१९९६ च्या आदेशान्वये '' अन्याय निवारण समिती'' ची नियुक्ती करण्यात आली होती. सदर समितीच्या अध्यक्ष/सदस्य यांचे कार्यबाहुल्यामुळे समिती या कामकाजास आवश्यक वेळ देऊ शकली नाही. दरम्यानच्या काळात पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाने आपला अहवाल केंद्र शासनास सादर केला. या आयोगाच्या अहवालातील शिफारशींमध्ये केंद्र शासनाने काहीं बदल करून दिनांक ३० सप्टेंबर १९९७ च्या अधिसूचने अन्वये गट 'अ', 'ब', 'क' व 'ड' मधील केंद्रीय कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी १९९६ पासून सुधारित वेतनश्रेणी विहित केल्या आहेत.

१.३ राज्य शासनाचा वरील पहिल्या परिच्छेदांत उल्लेख केलेला धोरणात्मक निर्णय लक्षात घेऊन राज्य शासनाने शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर १२९६/प्र.क्र.३९/सेवा-१०, दिनांक ५-१२-१९९७ **(जोडपत्र एक)** अन्वये खालीलप्रमाणे '' राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ '' नियुक्त केली.

१. श्री.द.म.सुकथनकर, सेवानिवृत्त मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन -अध्यक्ष
२. प्रधान सचिव, (व्यय), वित्त विभाग,मंत्रालय - सदस्य
३. प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय - सदस्य

प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, श्री.जी.सी.त्रिपाठी, यांनी दिनांक १२ मार्च १९९८ रोजी त्यांची बदली होईपर्यंत या समितीचे सदस्य म्हणून काम पाहिले व त्यानंतर त्या पदावर नियुक्त झालेले श्री.राजेंद्र सिंह हे समितीचे सदस्य

झाले. श्री.नविन कुमार, प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांनी सुरूवातीपासून अखेर पर्यंत समितीचे सदस्य म्हणून काम पाहिले.

१.४ समितीकडे पुढील विषय विचारार्थ सुपूर्द करण्यात आले होते :-

(१) पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन खाली नमूद केलेल्या पदांना सुधारित वेतनश्रेणींची शिफारस करणेः-

(अ) राज्य शासकीय पदे (अखिल भारतीय सेवांतील पदांव्यतिरिक्त),

(ब) जिल्हा परिषदांकडील पदें,

(क) अनुदानप्राप्त शाळांतील शिक्षकांची पदें,

(ड) मंत्रालयातील पदांशी तत्सम नसलेली राज्य विधान मंडळ सचिवालयातील पदें,

(इ) उच्च न्यायालयातील राजपत्रित व अराजपत्रित पदें,

(फ) राज्यातील कृषीतर विद्यापीठे, तसेच या विद्यापीठांना संलग्न असलेल्या अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेतर पदें,

(ग) राज्यातील कृषि विद्यापीठे व तत्संलग्न अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेतर पदें आणि

(ठ) इतर अनुदानप्राप्त संस्थामधील पदें.

(२) राज्य शासकीय व इतर संवर्ग पदांच्या वेतनश्रेणी दरम्यान पुनःसुधारित करण्यात आल्यामुळे केंद्र शासनाकडील समकक्ष पदांच्या तुलनीयतेचे पुनःपरिक्षण करुन सुधारित वेतनश्रेणींची शिफारस करणे.

(३) पदांच्या सुधारित वेतनश्रेणी सुचवितांना ज्या पदांना विद्यमान वेतनश्रेणीत विशेष वेतने/उच्च प्रारंभिक वेतनवाढी/व्यावसायिक पात्रतेसंबंधात वेतनवाढी, इत्यादी मंजूर करण्यात आल्या आहेत ते विचारात घेणे.

(४) केंद्र शासनाच्या सुधारित वेतनश्रेणी राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांसाठी विहित करण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या विद्यमान वेतनश्रेणींचे पुनःसंघटन करणे.

(५) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२९६/प्र.क्र.२८/९६/सेवा १०, दिनांक १२-९-१९९६ च्या आदेशान्वये गठित केलेल्या अन्याय निवारण समितीच्या विचारार्थ प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.

वेतन सुधारणा समितीला आपली कार्यपध्दती स्वतः निश्चित करून नियुक्ती पासून तीन महिन्यांच्या आंत आपला अहवाल शासनास सादर करण्यास सांगण्यात आले होते.

१.५ वित्त विभागाचे उप सचिव, श्री.श.वि.लागवणकर यांच्या नियंत्रणाखाली वित्त विभागात निर्माण करण्यात आलेल्या वेतन सुधारणा कक्षास आमच्या समितीला लागणारे आवश्यक ते प्रशासकीय सहाय्य देण्याबद्दल सांगण्यात आले होते.

१.६ समितीला विचारार्थ सोपविण्यात आलेल्या विषयांपैकी विषय क्रमांक (५) संबंधी निर्णय घेऊन त्याबाबत समितीचा अहवाल 'भाग-१' म्हणून शासनास प्रथम सादर करण्याचे समितीने ठरविले. याचें कारण असें कीं, त्यासंबंधी शासनाचे अंतिम निर्णय प्रथम प्राप्त करून घेऊन त्यावर आधारभूत अशाच नव्या सुधारित वेतनश्रेणींची संबंधित पदांसाठी शिफारस करणे हे आवश्यक व क्रमप्राप्त होते.

१.७ समितीसमोरील इतर विषयांच्या अनुषंगाने दिनांक ३१ डिसेंबर १९९७ रोजी राज्यातील मराठी व इंग्रजी प्रमुख १२ वृत्तपत्रांत एक जाहीर सूचना **(जोडपत्र-दोन)** प्रसिध्द करून राज्य शासन, जिल्हा परिषदा, कृषीतर विद्यापीठें, शैक्षणिक व अनुदान प्राप्त इतर संस्था यामधील शासकीय व इतर कर्मचारी यांच्या संघटनांना दिनांक १५ जानेवारी १९९८ पर्यंत आपली निवेदने सादर करण्याची विनंती समितीतर्फे करण्यात आली होती. त्याचप्रमाणे कर्मचा-यांच्या मान्यताप्राप्त व इतर सर्व संघटनांना समितीला विचारार्थ सोपविलेले विषय, राज्यातील विद्यमान वेतनश्रेणी, दिनांक १ जानेवारी १९९६ रोजी अनुज्ञेय महागाई भत्ता आणि पहिली व दुसरी अंतरिम वाढ या सर्व बाबी एकत्रित करून येणारी एकूण वित्तलब्धी यासंबंधीची विवरणपत्रें व केंद्र शासनाच्या सुधरित वेतनश्रेणी संबंधातील दिनांक ३०

सप्टेंबर, १९९७ च्या आदेश-वजा-अधिसूचनेची प्रत इत्यादी तपशील पत्राद्वारे पाठवून त्या अनुषंगाने या संघटनांकडून विविध पदांसाठी कोणत्या सुधारित वेतनश्रेणी विहित करण्यात याव्यात यासंबंधी त्यांच्या सूचना दिनांक २० जानेवारी १९९८ पूर्वी पाठविण्याची विनंती करण्यात आली. वृत्तपत्रात वर म्हटल्याप्रमाणे जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यानंतर काहीं वैयक्तिक कर्मचारी संघटना तसेच कर्मचारी संघटनांच्या महासंघांकडून करण्यात आलेल्या विनंतीनुसार समितीला निवेदने सादर करण्याची मुदत, दिनांक १४ जानेवारी, १९९८ रोजीच्या जाहीर सूचनेद्वारें, कर्मचारी संघटनांसाठी दिनांक ३१ जानेवारी १९९८ पर्यंत आणि महासंघांसाठी दिनांक १५ फेब्रुवारी १९९८ पर्यंत वाढवून देण्यात आली.

१.८ प्रशासकीय विभागांचे प्रमुख व त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांनाही दिनांक १ जानेवारी १९९८ रोजी अर्ध शासकीय पत्र पाठवून त्यांच्या अधिपत्याखालील पदांना मिळणा-या विशेष वेतनांसंबंधीचे अभिप्राय समितीस दिनांक २० जानेवारी १९९८ पर्यंत सादर करण्याची विनंती करण्यात आली होती.

१.९ समितीची नियुक्ती डिसेंबर १९९७ च्या सुरुवातीस झाल्यानंतर लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसंबंधातील महत्वाच्या कामात सुमारे दोन महिनेपर्यंत राज्यातील बहुसंख्य शासकीय कर्मचारी व अधिकारी व्यग्र होते. तसेच, शासकीय कर्मचा-यांच्या संघटना व या संघटनांचे महासंघ यांचेकडून समितीला सोपविण्यात आलेल्या विषयांबद्दल त्यांच्या सूचना व अभिप्राय कळविणारीं निवेदने समितीला सादर करण्याची अंतिम तारीख, वर म्हटल्याप्रमाणे, दिनांक १५ फेब्रुवारी १९९८ पर्यंत वाढवून देणे आवश्यक ठरले. या निवेदनांद्वारे प्राप्त झालेल्या सूचना व प्रस्तावांच्या संदर्भात, अशी निवेदने सादर केलेल्या संघटना व महासंघांच्या प्रतिनिधींना समितीसमोर उपस्थित राहून आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे हें देखील आवश्यक होते. ही सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाचा अहवाल, त्या अहवालातील शिफारशी व त्यांची पार्श्वभूमी आणि कारणमिमांसा, पूर्वीच्या भोळे आयोग आणि वेतन समानीकरण समिती यांनी सादर केलेल्या शिफारशी व त्यांमागील दृष्टिकोन आणि कारणमिमांसा, राज्यातील शासकीय व

इतर अधिकारी आणि कर्मचारी यांच्या विविध पदांच्या विद्यमान वेतनश्रेण्या व त्यांच्यातील परस्पर संबंध आणि सापेक्षता, या पदांसाठी विहित केलेली अर्हता, पदांची कर्तव्यें व जबाबदा-या आणि त्या संदर्भात केंद्र शासनाकडील तत्सम/समकक्ष पदें आणि त्यांच्या अद्ययावत सुधारित वेतनश्रेणी, तसेच इतर अनुषंगिक बाबी यांवर सर्वंकष व काळजीपूर्वक विचार करून आपला अहवाल व शिफारशी निश्चित करण्यासाठी समितीस काही किमान अधिक कालावधी लागणे अपरिहार्य होतें. हें सर्व लक्षात घेऊन, जरी समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी प्रथम तीन महिन्याचा कालावधी (५ मार्च १९९८ पर्यंत) मुक्रर करण्यात आला होता तरी हा कालावधी शासनाने प्रथम ५ जून व नंतर ३१ जुलै १९९८ पर्यंत वाढविला.

१.१० वर म्हटल्याप्रमाणे, शासनाने दिनांक १२ सप्टेंबर १९९६ च्या आदेशान्वये गठीत केलेल्या 'अन्याय निवारण समिती' च्या विचारार्थ प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर प्रथम निर्णय घेऊन शासनास अहवाल 'भाग-१' सादर करण्याचे समितीने ठरविले होते. त्यादृष्टीने मंत्रालयातील संबंधित प्रशासकीय विभागांचे सचिव, त्या विभागांच्या नियंत्रणांखालील संबंधित विभाग प्रमुख, तसेच ज्या पदांच्या संबंधात असे प्रस्ताव प्राप्त झाले होते तीं पदें धारण करणा-या कर्मचा-यांचे प्रतिनिधी आणि विधान परिषदेवरील निर्वाचित मा.शिक्षक आमदार यांना समितीसमोर उपस्थित राहून आपलें म्हणणे व अभिप्राय समक्ष सादर करणे शक्य व्हावे याकरीता समितीने दिनांक ३ जानेवारी १९९८ पासून २५ मार्च १९९८ पर्यंत वेळोवेळी सहा बैठका घेतल्या. ''अन्याय निवारण समिती'' ला सादर झालेल्या प्रस्तावांवरील समितीच्या निर्णय-वजा-शिफारशी अंतर्भूत असलेला अहवाल, भाग-१, समितीने शासनास दिनांक ४ जून १९९८ रोजी सादर केला.

१.११ समितीस सुपूर्द करण्यात आलेल्या इतर विषयांच्या संदर्भात समितीला सादर करण्यात आलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने विविध संबंधित कर्मचारी संघटना व त्यांच्या महासंघांच्या **(जोडपत्र तीन )** पदाधिकारी-तथा-प्रतिनिधींना त्यांचे म्हणणे समितीपुढे थोडक्यांत मांडून चर्चेसाठी दिनांक २० फेब्रुवारी १९९८ ते ८ मे १९९८ च्या दरम्यान आमंत्रित करण्यात आले होते. त्याचवेळी संबंधित प्रशासकीय

विभागांच्या सचिवांनाही **(जोडपत्र चार)**, आवश्यक असल्यास त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख वा इतर अधिका-यांसमवेत, या चर्चेमध्ये सहभागी होण्याकरीता आमंत्रित करण्यात आले होते.

१.१२ १९८६ मध्ये नियुक्त केलेल्या वेतन समानीकरण समिती व वेतन त्रुटी समिती यांच्या शिफारशी विचारात घेऊन दिनांक १ जानेवारी १९८६ पासून अंमलात यावयाच्या सुधारित वेतनश्रेणी प्रथम विहित करण्यात आल्यानंतर ज्या संवर्गपदांच्या वेतनश्रेणी राज्य शासनाने पुनःसुधारित केल्या होत्या त्यांचे पुनर्विलोकन करण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक १९ मार्च १९९८ रोजी संबंधित प्रशासकीय विभागांच्या अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव तसेच विभाग प्रमुखांशी सविस्तर चर्चा केली.

१.१३ समितीचे कार्य चालू असतानाच राज्यातील अंशकालीन तत्वावर काम करणा-या व नियत वेतनावरील कर्मचा-यांच्या वेतन दरात वाढ करण्याची बाबही राज्य शासनाने समितीच्या विचारार्थ सोपविली.

१.१४ आपला अहवाल तयार करण्याच्या दृष्टीने व सर्वंकष विचारांती आपल्या शिफारशींना अंतिम स्वरूप देण्याच्या दृष्टीने समितीने वेळोवेळी बैठका घेऊन अंतर्गत चर्चा व विचार-विनिमय केला. त्यावेळी, आवश्यकतेनुसार, संबधित प्रशासकीय विभागांचे सचिव व इतर अधिकारी, विभाग प्रमुख व त्यांचे अधिपत्याखालील इतर दुय्यम अधिकारी, कर्मचारी प्रतिनिधी व इतर संबंधित व्यक्ती यांचीही मते समितीने वेळोवेळी घेऊन तीं अजमांवली.

१.१५ समितीच्या विचारार्थ सोपविण्यात आलेले विषय, त्यांस अनुसरून विविध प्रशासकीय विभाग, जिल्हा परिषदा, कृषीतर व कृषि विद्यापीठें, अनुदानप्राप्त संस्था यांमधील वेगवेगळया संवर्गातील विविध स्तरांवरील कर्मचा-यांच्या संघटना व त्यांच्या महासंघांनी समितीस सादर केलेल्या सुमारे ४५० निवेदनांचे परिक्षण करून आणि आवश्यक तो सर्वंकष अभ्यास व विचार करून आपला हा सर्वसमावेशक

अहवाल "भाग-२" समितीने तयार केला असून तो आतां समिती शासनास सादर करीत आहे.

## प्रकरण- २

## कर्मचारी संघटनांची प्रतिपादनें

राज्यातील कर्मचा-यांची बहुसंख्य पदे गट-क (पूर्वीचा वर्ग-३) मध्ये मोडतात. शासकीय व जिल्हा परिषदांमध्ये वर्ग-३ च्या कर्मचा-यांचे प्रतिनिधीत्व करणा-या, अनुक्रमे, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ, नागपूर या दोन महासंघाच्या म्हणण्यांवर त्यामुळें आम्ही विशेष गांभिर्याने विचार केला असून त्यांवरील आमचीं मतें व निष्कर्ष आम्ही येथें नमूद करीत आहोंत.

२.२ या महासंघांनी मुख्यत्वेकरून असे निदर्शनास आणलें कीं, दिनांक १-४-१९७६ रोजी लागू करण्यात आलेल्या वेतन सुधारणेच्या संदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या राज्य भोळे वेतन आयोगाच्या अहवालापर्यंत विविध प्रशासकीय विभागांमधील वेगवेगळया पदांच्या वेतनश्रेणीमध्ये समकक्षता/सापेक्षता होती. दिनांक १ जानेवारी १९८६ पासून लागू करण्यात आलेल्या वेतन सुधारणेच्या संदर्भात शासनाने नियुक्त केलेल्या वेतन समानीकरण समितीने मात्र एका विद्यमान वेतनश्रेणी समोर दोन पेक्षा अधिक सुधारित वेतनश्रेणी सुचवून या सापक्षतेस बाधा आणली. त्यामुळे भोळे आयोगाने ठरविल्याप्रमाणे पदांच्या सेवाप्रवेश नियमांस विशेष प्राधान्य देऊन गट 'क' व 'ड' मधील विविध भोळेकृत वेतनश्रेणींसाठी सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याच्या प्रयोजनार्थ खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आधारभूत विद्यमान वेतनश्रेणी विचारात घेण्यात याव्या.

| अ.क्र. | भोळेकृत वेतनश्रेणी | समकक्षतेसाठी गृहित धरावयाची विद्यमान वेतनश्रेणी | विहित करावयाची केंद्रीय पाचव्या आयोगाची सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | २००-२८० | ७५०-९४० | २५५०-३२०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | २०५-३५५ | ७७५-११५० | २६५०-४००० |
| ३. | २२०-३७५ | ८२५-१२०० | २७५०-४४०० |
| ४. | २५०-४३५ | ९५०-१४०० | ३०५०-४५९० |
| ५. | २६०-४९५ | ९७५-१५४० | ३२००-४९०० |
| ६-अ | २९०-५४० | १३२०-२०४० | ४०००-६००० |
| ६-ब | २९०-५४० | १३५०-२२०० | ४५००-७००० |
| ७. | ३३५-६८० | १४००-२३०० | ४५००-७००० |
| ८. | ३६५-७६० | १४००-२६०० | ५०००-८००० |
| ९. | ३९५-८०० | १६४०-२९०० | ५५००-९००० |
| १०. | ५००-९०० | २०००-३२०० | ६५००-१०५०० |

वर नमूद केलेल्या वेतन समानीकरण समितीस केंद्र शासनाकडे तत्सम / समकक्ष पदें मोठया प्रमाणात न आढळल्याने त्या समितीने स्वतःची कार्यपध्दती निश्चित करून उर्वरित पदांकरीतां सुधारित वेतनश्रेणीबाबत शिफारस केली व त्यामुळे मोठया प्रमाणात वेतन-त्रुटी निर्माण झाल्या. यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या अन्याय निवारण समितीने वेतन-त्रुटीविषयक अन्यायाची प्रकरणे खातेप्रमुख व मंत्रालयीन विभागामार्फत सादर करण्याची पध्दती अवलंबिण्यात आल्याने बहुसंख्य संवर्ग अन्याय निवारण समितीकडे गा-हाणे सादर करू शकले नाहीत.

२.३ या दोन महासंघांनी समितीस दिलेल्या निवेदनांमधील विविध मुद्यांचा अभ्यास केल्यानंतर त्यांबाबत समितीस येथे असे नमूद करावेसे वाटते कीं, डिसेंबर १९७७ मध्ये शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी स्वतंत्र वेतन आयोग नेमावयाचा नसल्यामुळे, तसेच केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने तेथील कर्मचा-यांना केंद्र शासनाने विहित केलेल्या सुधारित वेतनश्रेणी राज्य शासनाकडील तत्सम पदांना लागू करावयाच्या असल्यामुळे, याच धोरणात्मक निर्णयाच्या आधारे वेतन समानीकरण समितीची नियुक्ती करण्यात आली होती. या समितीने, असुधारित वेतनश्रेणी, सेवाप्रवेश नियम व कर्तव्यें आणि जबाबदा-या या तीन बाबींच्या आधारे, जेथे कटाक्षाने

पदांच्या बाबतीत समकक्षता आढळून आली तेथे केंद्र शासनाकडील तत्सम पदांची सुधारित वेतनश्रेणी येथील समकक्ष पदांसाठी विहित करण्याबाबत शिफारस केली होती आणि उर्वरित पदांसाठी स्वतःची कार्यपध्दती निश्चित करून त्याआधारे अशा पदांकरीता सुधारित वेतनश्रेणीबाबत शिफारस केली होती.

## वेतनश्रेणींचे समीकरण

२.४ वेतन समानीकरण समितीने विविध विद्यमान वेतनश्रेणींसमोर सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबतची शिफारस करताना सर्वसाधारणपणे अशा वेतनश्रेणींचे ''परिणामक सममूल्य'' काढून त्या आधारे सुधारित वेतनश्रेणींची निर्मिती केली होती. विद्यमान वेतनश्रेणीमध्ये किमान व कमाल वेतनमानामध्ये दिनांक १ जानेवारी १९८६ रोजी देय असलेल्या महागाई भत्याची रक्कम अधिक अंतरिम वाढी एक व दोन यांची रक्कम मिळवून असें''परिणामक सममूल्य'' काढलें होंते व या परिणामक सममूल्याच्या आधारे किमान व कमाल वेतनमानाची रक्कम संरक्षित होईल याची काळजी घेऊनच सुधारित वेतनश्रेणी निर्धारित करून अशा सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत समितीने शिफारस केली होती. या संबंधिचा तक्ता वेतन समानीकरण समितीच्या अहवालाच्या परिच्छेद २.११ मध्ये देण्यात आला आहे. उर्वरित पदांकरीता, या पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये असलेली विविधता, कर्तव्ये व जबाबदारीचे विशिष्ट स्वरूप इत्यादी बाबी विचारात घेऊन या पदांची, कार्यकारी जबाबदारी असलेली पदे, अपदवीधर व्यावसायिक पदे, कर्मशाळांमध्ये व कर्मशाळांबाहेरील तांत्रिक पदे, अध्यापनाची जबाबदारी असलेली तांत्रिक पदे अशारितीने वर्गीकरण करून त्यांचेकरीतां वर नमूद केलेल्या ''परिणामक सममूल्या''च्या आधारे निर्धारित केलेल्या वेतनश्रेणीहून थोडया वरच्या सुधारित वेतनश्रेणीची समितीने शिफारस केली होती. अन्यथा, असुधारित वेतनश्रेणीचे सममूल्य विचारात घेतां, ''हक्क'' म्हणून कर्मचा-यांना वेतन समानीकरण समितीच्या अहवालाच्या परिच्छेद २.११ मध्ये नमूद केलेल्या वेतनश्रेणीच अनुज्ञेय झाल्या असत्या.

## भोळे आयोगाच्या वेतनश्रेणी

२.५ भोळे आयोगाने देखील भोळेपूर्व दोन किंवा अधिक वेतनश्रेणींसाठी एक सुधारित वेतनश्रेणी आणि भोळेपूर्व एक वेतनश्रेणीकरीता दोन वा अधिक सुधारित वेतनश्रेणी विहित केल्या होत्या. वेतनश्रेणी निश्चितीसाठी पदाच्या मूल्यमापनाबाबतचा विचार करतां त्या पदाच्या केवळ, किंवा किंबहुना विशेष प्राधान्यानेही, सेवाप्रवेश अर्हतेचाच विचार करणे योग्य होणार नाही. याचें कारण असें कीं, सेवाप्रवेश अर्हता फक्त संबंधीत उमदेवाराची, त्याची त्या पदासाठी निवड झाल्यास, तो नियुक्तीनंतर त्या पदाकरीताच्या जबाबदा-या पेलण्यास आवश्यक ती किमान क्षमता धारण करीत असल्याची शक्यता दर्शविते. प्रत्यक्षात, कर्मचा-याच्या ३०-३५ वर्षाच्या सेवाकालावधीमध्ये त्यास देण्यात येणारे वेतन हें तो बजावीत असलेल्या कर्तव्यें आणि जबाबदारीचा मोबदला म्हणूनच त्याला देण्यात येते. उदा. कला, विज्ञान वा वाणिज्य शाखांतील पदवी ही अर्हता अत्यावश्यक असलेल्या उमेदवारांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या स्पर्धा परीक्षेद्वारे विविध प्रशासकीय व कार्यकारी स्वरुपाच्या पदावर नियुक्तीसाठी निवड होत असते. ही अर्हता धारण करणा-या ''सहाय्यकास'' रू.१६४०-२९०० ही वेतनश्रेणी आज देय आहे तर स्पर्धा परीक्षेद्वारे ''उप जिल्हाधिकारी'' म्हणून नियुक्ती झाल्यास रू.२२००-४००० ही वरची वेतनश्रेणी आज देय ठरते. ही अर्हता व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती या बाबी समान असलेल्या काहीं पदांच्या बाबतीत, उदा. मंत्रालयातील सहाय्यक, पोलिस उप निरिक्षक, विक्रीकर निरिक्षक इत्यादींना, नेमणुकीनंतर वेगवेगळया वेतनश्रेणी अनुज्ञेय होतात. प्राप्त परिस्थितीत,एखाद्या पदाकरीतां सुधारित वेतनश्रेणी विहित करताना त्या पदाच्या सेवाप्रवेश नियम व कर्तव्यें आणि जबाबदा-या या दोन्हींचा संयुक्तपणे व तारतम्याने विचार करणे संयुक्तिक ठरते. दिनांक १ जानेवारी १९८६ पासून अंमलात आलेल्या वेतन सुधारणेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या वेतन समानीकरण समितीने देखील असाच दृष्टिकोन ठेवून आपल्या अहवालाच्या विविध परिच्छेदांन्वये पदांची सेवाप्रवेश अर्हता व कर्तव्यें आणि जबाबदा-या यांचा समग्र विचार करून सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत शिफारस केली होती.

## केंद्र शासनाच्या वेतनश्रेणीबाबत महासंघांचा आग्रह

२.६ शासकीय कर्मचा-यांच्या विविध संघटना व महासंघांच्या आग्रहामुळे डिसेंबर १९७७ मध्ये महाराष्ट्र शासनाने असा निर्णय घेतला कीं, " यापुढे राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी सुधारण्यासाठी राज्य शासन स्वतंत्र वेतन आयोग नेमणार नाही. जेंव्हा जेंव्हा केंद्र शासन त्यांच्या कर्मचा-यांसाठी वेतन आयोग नियुक्त करेल तेंव्हा तेंव्हा वेतनश्रेणी विषयीच्या त्या आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे निर्णय राज्य शासकीय कर्मचा-यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतन निश्चितीचे सूत्र देखील केंद्र शासनाप्रमाणेच राहील."

वरील धोरणात्मक निर्णयाच्या अंमलबजावणीस दिनांक १ जानेवारी १९८६ पासून कार्यान्वित झालेल्या वेतन सुधारणेपासून प्रारंभ झाला. याबाबत राज्य शासनाने नियुक्त केलेल्या वेतन समानीकरण समितीने, वर उल्लेखिल्याप्रमाणे, जेथे केंद्र शासनाकडील तुलनीय पदे आढळून आली तेथे त्या पदांच्या वेतनश्रेणी राज्य शासनाकडील तत्सम पदांकरीतां विहित करण्याबाबत शिफारस केली व उर्वरित पदांच्या बाबतीत पदाच्या विद्यमान वेतनश्रेणीचे "परिणामक सममूल्य" विचारात घेऊन सुधारित वेतनश्रेणीबाबत शिफारस केली. काहीं पदांच्या बाबतीत पदधारकांना करावयाच्या कार्यकारी व इतर स्वरूपाच्या जबाबदा-या विचारात घेऊन त्यांचेकरीतां वरच्या वेतनश्रेणीचीही शिफारस केली. भोळे आयोगाने मंत्रालयातील "सहाय्यक" व सार्वजनिक आरोग्य संचालनालयातील "सार्वजनिक आरोग्य परिचारीका" या पदांकरीता रू.३६५-७६० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. वरील धोरणात्मक निर्णयाच्या परिणामस्वरूप, हीं दोन पदें केंद्र शासनाकडे आढळल्यामुळे तुलनीयतेच्या आधारे या पदांसाठी तेथे मंजूर करण्यात आलेली रू.१६४०-२९०० ही वरची सुधारित वेतनश्रेणी येथे मंजूर करण्यात आली आहे. हें नमूद करण्याचे कारण असें कीं, भोळे आयोगाच्या वेळची पदांमधील सापेक्षता कर्मचारी संघटनेच्या आग्रहामुळे शासनाने घेतलेल्या वरील धोरणात्मक निर्णयाच्या अंमलबजावणीमुळे देखील थोडयाफार प्रमाणात भंग पावली असल्याचें स्पष्ट व्हावें. पूर्वीची सापेक्षता काटेकोरपणे अबाधित ठेवावयाची झाल्यास केंद्र शासनाच्या तुलनीय प्रवर्गांशी

समकक्षतेची बांधिलकी ठेवण्याबाबत वर नमूद केलेल्या धोरणात्मक निर्णयाचा देखील फेरविचार करावा लागेल.

२.७ केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ३०-९-१९९७ च्या आदेशान्वये तेथील गट- 'अ', 'ब', 'क' व 'ड' मधील पदांसाठी सुधारित वेतनश्रेणी मंजूर केल्या आहेत. या आदेशाच्या भाग-बी व भाग-सी अन्वये काही पदांकरीतां सममूल्य वेतनश्रेणीहून वरच्या सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या आहेत व उर्वरित पदांसाठीं या आदेशाच्या भाग-ए अन्वये असुधारित वेतनश्रेणीचे सममूल्य विचारात घेऊन सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या आहेत. वर नमूद केलेल्या राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयाच्या परिणामस्वरूप, काही पदांच्या बाबतीत वरच्या सुधारित वेतनश्रेणी तर काहीं पदांच्या बाबतीत पदाच्या असुधारित वेतनश्रेणीचे 'परिणामक सममूल्य' विचारात घेऊन समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत या समितीने देखील शिफारस केली आहे. असे केल्यामुळे राज्यांतर्गत विविध पदांचा वेतनश्रेणीमध्ये असलेली सापेक्षता साहजिकच त्यामुळे काहीं प्रमाणात विस्कळित होणे क्रमप्राप्त आहे.

## सापेक्षता भंग पावणे एक नैसर्गिक प्रक्रिया

२.८ सर्वसाधारणतः दर दहा वर्षांनी होणा-या सार्वत्रिक वेतन सुधारणेच्या प्रत्येक वेळीं पूर्वी असित्वात असलेल्या वेतनश्रेणींची संख्या कमी करण्यात आलेली आहे. भोळेपूर्व वेतनश्रेणींची संख्या ३८७ एवढी होती. भोळे आयोगाने वेतनश्रेणींची संख्या ४१ केली. दिनांक १ जानेवारी १९८६ पासून अंमलात आलेल्या वेतन सुधारणेच्या वेळेस ही वेतनश्रेणींची संख्या ३० एवढी झालेली आहे. दिनांक १ जानेवारी १९९६ पासून अंमलात यावयाच्या वेतन सुधारणेच्या अनुषंगाने, उपरोक्त धोरणात्मक निर्णय विचारात घेतां, ही संख्या २० एवढी होण्याची शक्यता आहे. थोडक्यात, वेतनश्रेणींची संख्या कमी करण्याच्या प्रक्रियेमुळें पूर्वीच्या काहीं वेतनश्रेणींचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. एकत्रित केलेल्या दोन पेक्षा अधिक वेतनश्रेणींना एकच सुधारित वेतनश्रेणी दिल्यामुळे वेतनश्रेणींतील पूर्वीची सापेक्षता भंग पावणे अनिवार्य आहे. वादाकरीता, भोळे आयोगाची सापेक्षता सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याच्या प्रयोजनार्थ चिरकाल अबाधित ठेवण्यात

यावी ही मध्यवर्ती संघटनेची संकल्पना अंमलात आणावयाची ठरविल्यास त्याची परिणती सार्वत्रिक वेतन सुधारणेच्या वेळेस प्रत्येक असुधारित वेतनश्रेणीकरीता एक एक वेगळी सुधारित वेतनश्रेणी विहित करण्यामध्ये होईल व त्या परिस्थितीत त्यासाठी 'वेतन आयोग' किंवा एखादी 'समिती' नियुक्त करण्याचे प्रयोजनच उरणार नाही. प्रत्यक्षांत, सर्वसाधारणतः दर सुमारें दहा वर्षाच्या कालावधी नंतर, दरम्यान झालेल्या स्थित्यंतराच्या अनुषंगानें सर्व पदांचे पुनःमूल्यांकन, एकत्रितपणें व एकाच वेळीं आणि सापेक्षतेचेंही योग्य भान ठेवून, अपेक्षित असतें व त्या करीतांच वेतन आयोगासारखी स्वतंत्र, जबाबदार व उच्चस्तरीय समिती नेमण्याचा प्रघात रूढ झाला आहे. मात्र यामुळे पूर्वीची सापेक्षता काहीं प्रमाणात विस्कळित होणे नैसर्गिकच आहे.

वस्तुस्थितीवर आधारित वरील विवेचनाचा समग्र व सांगोपांग विचार केल्यानंतर समिती या निष्कर्षाप्रत आली कीं, आजघडीला भोळेकृत वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९९६ पासून विहित करावयाच्या सुधारित वेतनश्रेणींच्या प्रयोजनार्थ आधारभूत मानणे संयुक्तिक होणार नाही.

२.९ वरीलप्रमाणे भोळे आयोगाच्या वेळची सापेक्षता भंग पावल्याचा मुद्दा महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद महासंघ या संघटनेने देखील आपल्या निवेदनात उपस्थित केला आहे. याशिवाय, त्यांनी निवेदनामध्ये असेही सूचित केले आहे कीं, गट 'ड' मधील निम्नतम शिपाई ते राज्याचे मुख्य सचिव या अत्युच्च पदाकरीता एकच सामायिक वेतनश्रेणी (वन रनींग पे स्केल) विहित करण्यात यावी. असे केल्यामुळे कोणाच्याही मनामध्ये इतरांच्या वेतनश्रेणीबाबत ईर्षा उत्पन्न होण्याची शक्यता राहणार नाही व आपल्या वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्याबाबत देखील कोणत्याही संघटनेची त्यामुळे मागणी येण्याची शक्यता दूरावेल, असे त्यांचे म्हणणे होते.

त्यांच्या या निवेदनाचा विचार करता या समितीस असे वाटते कीं केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासन आपल्या,कर्मचा-यांसाठी सुधारित वेतनश्रेणी विहित करीत असल्यामुळे, केवळ समानीकरण व इतर तदनुषंगिक बाबींच्या आधारे राज्यांतील शासकीय व इतर कर्मचा-यांसाठी सुधारित वेतनश्रेणी विहित

करण्याबाबतचे मर्यादित कामकाज सोपविलेल्या या समितीने वरील निवेदनामधील उपरोक्त अगदीं मुलभूत अशा मुद्यांच्या बाबतीत आपले अभ्यासपूर्ण मत देणे अपेक्षित नाहीं व तसें करणे अप्रस्तुतही होईल. प्रत्यक्षात, गट 'अ','ब','क' व 'ड' मधील विविध संवर्ग पदांना विहित करण्यात आलेल्या वेतनश्रेणी या, तसा विचार केल्यास, एकाच वेतनश्रेणीचे निरनिराळे प्रभाग (सेगमेंट) म्हणतां येतील आणि स्वतःची अशी वेगळी, स्वतंत्र व वरची वेतनश्रेणी असल्यामुळे संबंधित कर्मचा-यांस जें भावनीक समाधान मिळतें व त्यांच्या दैनंदिन कामकाजात जशी उमेद दिसून येतें तें व तशी एकच सामायिक वेतनश्रेणी ठेवून साध्य होण्यासारखी नाही, एवढें मात्र या समितीस या संदर्भात म्हणावेसे वाटतें. म्हणून गट 'अ','ब' 'क' आणि 'ड' मधील विविध अर्हता धारण करणा-या व विविध स्वरूपाच्या जबाबदा-या पार पाडणा-या पदांना एकच सामायिक वेतनश्रेणी असावी हें मत आम्ही ग्राहय धरत नाहीं.

२.१० महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने आपल्या निवेदनामध्ये ''समयबध्द वेतनश्रेणीची आवश्यकता'' कां व कशी आहे या मुद्याचा उहापोह केलेला आहे. या संदर्भात महासंघाने निदर्शनास आणून दिले कीं, केंद्रीय पाचव्या वेतन आयोगाने ''अ'' गटातील अधिका-यांसाठी ४,९ व १३ वर्षाच्या अखंड सेवेनंतर एकूण तीन वेळां बढतीसाठी वरची पदे उपलब्ध नसतील तेंव्हा वरच्या पदाच्या वेतनश्रेणी द्याव्यात, तसेच ''ब'' गटातील अधिक-यांना ८ व १६ वर्षाच्या सेवेनंतर किमान दोन वेळां वरची वेतनश्रेणी द्यावी, अशी शिफारस केली आहे. या अनुषंगाने पश्चिम बंगाल राज्य शासनाने त्या राज्यातील कर्मचा-याकरीतां अशा पध्दतीने लागू केलेली समयबध्द श्रेणीवाढ येथेही लागू करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. राजपत्रित अधिकारी महासंघानेच नव्हे तर इतर जवळ जवळ सर्वच विविध संवर्गवार कर्मचारी तसेच अधिकारी संघटनांनीही समितीच्या नजरेस असे आणून दिले की, पदोन्नतीच्या संधी प्रत्येक अधिकार श्रेणीतील वरच्या पदांची संख्या मुळातच कमी असल्यामुळे किंवा काहीं ठिकाणी ती मुळीच उपलब्ध नसल्यामुळे, संबंधित कर्मचा-यांना/अधिका-यांना एकाच वेतनश्रेणीत १५ ते २०, वा अनेकदा त्याहूनही अधिक, वर्षांकरीतां पदोन्नतीच्या अभावी कुंठित राहावे लागते.

पदोन्नतीच्या संधीच्या अभावी किंवा पदोन्नती मिळण्यास अवास्तव असा प्रदीर्घ कालावधी लागत असल्यामुळे, संबंधित कर्मचा-यांचे/अधिका-यांचे मनोधैर्य (मोराल) खच्ची होतें व त्याचा साहजिक विपरीत परिणाम त्यांच्या कामकाजावर व प्रशासनाच्या एकूण कार्यक्षमतेवर होतो. म्हणून प्रत्येक कर्मचा-याला/अधिका-याला त्याच्या एकूण सेवाकाळात काहीं किमान पदोन्नतीच्या संधी मिळाव्यात या दृष्टीने योग्य ती उपाययोजना करण्यात यावी असें या सर्वांनी समितीला आवर्जून प्रतिपादन केलें.

## इतर संघटनांची निवेदने

२.११ ज्याप्रमाणे आम्ही कर्मचा-यांच्या व अधिका-यांच्या महासंघांच्या प्रतिनिधींना त्यांचे म्हणणे आमच्या पुढे मांडण्याची संधी देऊन तें ऐकून घेतले त्याचप्रमाणे आम्ही सर्व शासकीय विभागांच्या अखत्यारीतील विविध संवर्गांच्या संघटनांच्या, आणि काहीं ठिकाणी वैयक्तिक पदें धारण करणा-या कर्मचा-यांच्या संघटना असल्यास त्यांच्याही, प्रतिनिधींचे म्हणणे ऐकण्यासाठी त्यांना पाचारण केले होते व आमच्या निमंत्रणाला प्रतिसाद देऊन जे प्रतिनिधी उपस्थित राहिले त्यांचे म्हणणे आम्ही ऐकून घेतले. किंबहुना, नेमून दिलेल्या दिवशी जरी एखाद्या संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित राहू शकले नाहीत तरी इतर कोणत्याही दिवशी, त्यांच्या सोईप्रमाणे, निदान समितीच्या अध्यक्षांना भेटून आपले म्हणणे मांडण्याची संधी त्यांना निःसंकोचपणे देण्यात आली. प्रत्येक संघटनेने आमच्या पुढे जे मुद्दे मांडले ते संघटनावार येथें नमूद करावयाचे म्हटल्यास पुनरावृत्तीचा दोष पत्करावा लागेल. म्हणून या संघटनांनी जे मुद्दे सर्वसाधारणपणे मांडले त्यांचा संक्षेपाने येथे उल्लेख करणे अप्रस्तुत होणार नाही. सदर मुद्दे थोडक्यात असे आहेत :-

(१) मंत्रालयातील लिपिक आणि महसूल विभागातील लिपिक यांना पदोन्नतीच्या बाबतीत, इतर विभागातील लिपिक वर्गाशीं तुलना करतां, अधिक आकर्षक संधी उपलब्ध आहेत. अशा प्रकारचा भेदभाव नसावा.

(२) बृहन्मुंबईमधील मंत्रालयासह इतर सर्व कार्यालयांतील ''लिपिक'' पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे स्पर्धा परीक्षा घेऊन निवड

यादी शासनाकडे पाठविण्यात येते. अशा निवड यादीतील ज्या उमेदवारांना योगायोगाने मंत्रालयातील विभागात नियुक्ती मिळते त्यांना, वर म्हटल्याप्रमाणे, पदोन्नती साखळीच्या बाबतीत इतरांच्या तुलनेत अधिक आकर्षक संधी प्राप्त होतात. एवढेच नव्हे तर कालबध्द पदोन्नतीच्या योजनेनुसारही त्याना अप्रमाण फायदा मिळतो. अशात-हेचा भेदभाव काढून टाकण्यात यावा.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे विविध शासकीय विभागांतील समकक्ष वा एकाच पातळीवरील ज्या अधिकारी पदांसाठी सामायिक स्पर्धा परीक्षा घेतली जाते त्या सर्व पदांकरीतां सुरूवातीस समान (एकच) वेतनश्रेणी असावी.

(४) ज्या पदधारकांना आपल्या सेवेच्या दरम्यान आपली नित्याचीं कर्तव्यें पार पाडत असताना विशेष जोखीम पत्करावी लागते किंवा त्यांच्या आरोग्याला धोका पोहोचण्याचा संभव असतो किंवा ज्यांना प्रतिकूल वातावरणात काम करावे लागते अशा पदांना एकतर वरची वेतनश्रेणी देण्यात यावी किंवा त्यांना अशा प्रतिकूल परिस्थितीत काम करावे लागण्याबद्दल विशेष वेतन वा भत्ता मंजूर करण्यात यावा.

(५) काहीं संघटनांनी त्यांच्या कामाचे स्वरूप कसे तांत्रिक स्वरूपाचे आहे व त्यामुळे पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाने त्या संबंधात जो दृष्टिकोन घेतला आहे तो स्वीकारून, राज्यातीलही अशाप्रकारची तांत्रिक स्वरूपाची जबाबदारी पार पाडणा-या वा तांत्रिक स्वरूपाची कामे करणा-या कर्मचा-यांना/अधिका-यांना उचित वरची वेतनश्रेणी देण्यात यावी अशी विनंती केली.

(६) सर्वच संबंधित संघटनांनी पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाने ज्या ज्या पदांच्या बाबतीत विशेष लक्ष देऊन वर्तमान वेतनश्रेणीच्या तुलनेत थोडी वरची सुधारित वेतनश्रेणी देण्याची शिफारस केलेली आहे त्याकडे समितीचे लक्ष वेधून अशाच प्रकारचा फायदा राज्य शासनाकडील तुलनीय पदांसाठीं सुधारित वेतनश्रेणीबाबत शिफारस करताना समितीने करावा अशी विनंती केली.

(७) जवळ जवळ प्रत्येक कर्मचारी संघटनेने आपापले सभासद असलेल्या कर्मचा-यांना कसे अधिक मेहनतीचें, कटकटींचे, क्लिष्ट स्वरूपाचे वा विशेष महत्वाचे आणि जबाबदारीचे काम नित्यक्रम म्हणून करावे लागते याकडे समितीचे लक्ष वेधले व त्याअनुषंगाने संबंधित पदांना वेतनश्रेणी बाबत झुकते माप द्यावे अशी विनंती केली.

(८) काही अपवाद वगळता, जवळ जवळ सर्वच कर्मचारी/अधिकारी संघटनांनी १९८६ मध्ये झालेल्या गेल्या वेतन सुधारणेनंतर दरम्यानच्या काळात ज्या ज्या विशिष्ट संवर्गातील पदांच्या वा काही विशिष्ट पदांच्या वेतनश्रेणी पुनःसुधारित करण्यात आल्या होत्या त्यांकडे समितीचे आवर्जून लक्ष वेधून आपल्याला तशा प्रकारचा फायदा न मिळाल्याबद्दल खंत व्यक्त केली व त्या दृष्टीने आपल्यावर कसा अन्याय झाला आहे तें समितीस पटवून देण्याचा प्रयत्न केला.

(९) काहीं संघटनांनी अगदी बडकस आयोगापासून गेल्या वेतन सुधारणेपर्यंत वेतनश्रेणी सुधारणेच्याबाबतीत इतर संबंधित संवर्ग वा पदें यांच्या तुलनेत आपली कशी पिछेहाट झाली आहे हें दाखवून देण्याचा प्रयत्न केला व त्या दृष्टीने निदान भावी वेतन सुधारणेमध्ये या ऐतिहासिक अन्यायाचे निवारण होईल याची समितीने दक्षता घ्यावी अशी विनंती केली.

उपरोक्त प्रत्येक मुद्याचा येथे परामर्ष घेऊन त्यासंबंधी समितीने कोणता दृष्टिकोन स्वीकारला हे पदवार नमूद करण्याचा जर येथे प्रयत्न केला तर असा वृत्तांत कमालीचा विस्तीर्ण होईल. म्हणून तसे करण्याचे टाळत असतांना आम्ही एवढेच नमूद करू इच्छितो कीं, प्रत्येक कर्मचारी संघटनेने जे जे मुद्दे मांडले त्यांवर काळजीपूर्वक आणि तारतम्याने विचार करून आमच्या शिफारशी करताना त्यांची योग्य ती जाणीव आम्ही ठेवली होती.

२.१२ आटोपते घेण्यापूर्वी, ज्या संघटनांनी आमच्या निमंत्रणाला प्रतिसाद म्हणून लेखी निवेदने सादर करून व आमच्या पुढे उपस्थित राहून आपले म्हणणे

आमच्यापुढे मांडण्याची तसदी घेतली त्यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो. या संघटनांनी ज्या ज्या बाबी व मुद्दे आमच्या निदर्शनास आणून दिले ते जर तसे आणून दिले नसते तर आमच्या अहवालात बरीच न्यूनता राहून गेली असती. या संघटनानी दिलेल्या लेखी निवेदनांचा व त्यांनी आमच्या समोर समक्ष मांडलेल्या मुद्यांचा, आमचा अहवाल व शिफारशी करताना, आम्हाला निश्चितच उपयोग व फायदा झाला, हे आम्ही मुद्दाम नमूद करू इच्छितों.

## प्रकरण- ३
## पुन:परिक्षण

३.१ समितीस नेमून दिलेल्या कार्यकक्षेमध्ये दिनांक १ जानेवारी १९८६ पासून अंमलात यावयाच्या वेतनश्रेणी सुधारणेच्या संदर्भात दि. १-१०-१९८८ च्या वित्त विभागाच्या अधिसूचनेन्वये आदेश निर्गमित करण्यात आल्यानंतर दरम्यानच्या आजतागायतच्या काळांत विविध प्रशासकीय विभागांच्या अखत्यारीतील काहीं संवर्ग पदांच्या वेतनश्रेणी पुन:सुधारित करण्यात आल्यामुळे केंद्र शासनाकडील समकक्ष पदांच्या तुलनीयतेचे पुन:निरीक्षण करून (१ जानेवारी १९९६ पासून अंमलात यावयाच्या) सुधारित वेतनश्रेणींची शिफारस करण्याची बाब देखील अंतर्भूत करण्यात आली आहे.

३.२ वित्त विभागाच्या दि. १ ऑक्टोबर १९८८ च्या उपरोक्त अधिसूचनेन्वये आदेश निर्गमित करण्यात आल्यानंतर विविध प्रशासकीय विभागांच्या अखत्यारीतील काहीं पदांच्या वेतनश्रेणी पुन:सुधारित करण्याबाबत अलीकडे पर्यंत जे जे आदेश काढण्यात आलेले आहेत त्यांचा संक्षेपाने खालीलप्रमाणे उल्लेख करता येईल:-

अ) वन विभागातील सहाय्यक वन संरक्षक, वनक्षेत्रपाल, वनपाल आणि वनरक्षक या संवर्गात काम करणा-या वन संरक्षण अधिकारी/कर्मचारी यांना पुन:सुधारित वरच्या वेतनश्रेणी दि. १ जानेवारी १९९० पासून मंजूर करण्याचे शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एफएसटी १३८९/सीआर ६४४/फ-४ दि. २५ जानेवारी १९९० अन्वये काढण्यात आलेले आदेश.

ब) राज्यातील कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक आणि कृषि अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ) या सवंर्गातील पदांना दि.१ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने पुन:सुधारित उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्याचे शासन निर्णय, कृषि व प.दु.म. विभाग, क्र.आकृवि ७५८९/२४७८/भाग-३/प्रक्र४/१५-ए, दि.८ डिसेंबर १९९४ अन्वये काढण्यात आलेले आदेश.

क) तहसिलदारांना कनिष्ठ वर्ग-१ चा दर्जा देऊन त्यांना रू.२२००-३७०० ही पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी दि. १ एप्रिल १९९५ पासून लागू करण्याचे शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण ११९३/४०६५/प्र.क्र.१०२/ई-१ दि.२९ मार्च, १९९५ अन्वये काढण्यात आलेले आदेश.

ड) पोलिस शिपाई, पोलिस हवालदार, सहाय्यक पोलिस उप निरीक्षक, पोलिस उप निरीक्षक व पोलिस निरीक्षक या पदांकरीतां दि. १-१-१९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने व पोलिस नाईक, सहाय्यक पोलिस निरीक्षक आणि पोलिस उप अधिक्षक/सहाय्यक पोलिस आयुक्त या पदांसाठीं दि. १-११-१९९२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पीएए/०१९५/सीआर २२०/पोल-५-अ, दि. १४ ऑगस्ट १९९५ आणि दि.२७ फेब्रुवारी १९९६ अन्वये काढण्यात आलेले आदेश.

इ) राज्य शासन सेवेतील कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२, उप अभियंता/उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अभियंता/सहाय्यक अभियंता, (श्रेणी-१)/वास्तुशास्त्रज्ञ, सहाय्यक कार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता/वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ, अधिक्षक अभियंता/उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ आणि मुख्य अभियंता (श्रेणी-१ व २) / मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, या अभियांत्रिकी संवर्गातील पदांसाठीं दि.१-१-१९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्यासंबंधी शासन निर्णय, पाटबंधारे विभाग, क्र.वेपुर/१०९२/६२९/९२) आ(क्षेप्र), दि.१४ डिसेंबर १९९५ अन्वये काढण्यात आलेले आदेश.

३.३ वर उद्धृत केल्याप्रमाणे जानेवारी १९९० नंतर आजतागायत विविध प्रशासकीय विभागांच्या अखत्यारीतील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेगवेगळया संवर्गातील पदांकरीतां पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी मंजूर करणारे आदेश वेळोवेळी निघाले असले तरी हे विविध आदेश काढण्यास प्रवृत्त करणारी, किंबहुना जवळ जवळ भाग पाडणारी, परिस्थिती कशा प्रकारे निर्माण झाली, या स्थित्यंतराच्या प्रक्रियेचीं बीजें केव्हा व कशी पेरली गेली, याचा वस्तुनिष्ठपणे शोध घेण्याचा आम्ही प्रयत्न केला. तेंव्हा आमच्या असे निदर्शनास आले कीं, मुळात पाटबंधारे विभागाच्या निर्णय क्र.सीडीएस १५८२/१५८/(२१५) आ(१०), दिनांक १६ एप्रिल

१९८४ अन्वये जे आदेश काढण्यात आले त्यामुळे, कालांतराने, वर उद्धृत केलेले पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी विविध संवर्गातील पदांना मंजूर करण्याचे आदेश संबंधित प्रशासकीय विभागांकडून काढले जाण्याच्या प्रक्रियेस मुख्यत्वे चालना मिळाली. म्हणून पाटबंधारे विभागाच्या दि.१६ एप्रिल १९८४ च्या या मूळ कारणीभूत झालेल्या आदेशांची पार्श्वभूमी व वैशिष्टयांचा आणि त्यांच्या विविध पैलू व परिणामांचा उल्लेख येथे सविस्तरपणे करणे आम्हास आवश्यक वाटते.

३.४ मार्च, १९८१ पूर्वी काहीं वर्षे राज्यातील पदवीधर व अन्य कनिष्ठ अभियंत्याना राजपत्रित दर्जा मिळावा म्हणून या अभियंत्यांच्या संघटनांनी तीव्र आंदोलन केले होते. आपल्याला पदोन्नती मिळण्यामध्ये येणा-या अडचणी व त्याकरीतां लागणारा प्रदीर्घ कालावधी यासंबंधी त्यांचेमध्ये तीव्र असंतोष होता. त्याचप्रमाणे,विशेषकरून त्यांचेपैकी जे कनिष्ठ अभियंते पदवीधारक होते त्यांच्या मनात, आपण चांगले गुण मिळवून व अभियांत्रिकी पदवीच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेशास पात्र होऊन अभियांत्रिकी पदवी प्राप्त केल्यानंतर व कनिष्ठ अभियंता म्हणून सेवेत प्रवेश केल्यानंतर आपल्याला जी वेतनश्रेणी मिळते ती फारच निम्न आहे, तसेच आपल्याला मिळालेल्या पदाचा दर्जा देखील आपल्यापेक्षा तुलनेने कमी प्रतीची सामान्य शैक्षणिक पात्रता असलेल्या इतर शासकीय कर्मचारी वा अधिका-यांच्या पदांच्या दर्जापेक्षा हीन आहे, अशी न्यूनतेची तीव्र भावना सतत सलत होती. म्हणून एखादी विशिष्ट सुधारित वरची वेतनश्रेणी आपणांस मिळावी अशी मागणी सुव्यक्तपणे न मांडता, आपणांस उचित मान आणि प्रतिष्ठा, म्हणजेच राजपत्रित दर्जा, मिळावा अशा भावनिक मागणीसाठीं त्यांनी आपले आंदोलन केले होते. तें शमविण्याच्या दृष्टीने, दिनांक १० मार्च १९८१ रोजी महाराष्ट्र विधानमंडळासमोर शासनातर्फे असे निवेदन करण्यात आलें कीं, शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या पदवीधर कनिष्ठ अभियंत्याना, तसेच यापुढे शासनाच्या सेवेत कनिष्ठ अभियंत्यांच्या पदांवर भरती होणा-या पदवीधरांना, राजपत्रित अधिका-यांचा दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानंतर लगेच, म्हणजे दिनांक १९ मार्च १९८१ रोजी, महाराष्ट्र विधानमंडळासमोर शासनातर्फे दुस-यांदा असे निवेदन करण्यात आलें कीं, निर्धारित सेवाकाळ शर्ती पूर्ण करणा-या पदविकाधारक

अर्हतारहित कनिष्ठ अभियंत्यांना सुध्दा राजपत्रित वर्ग-२ चा दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. विधानमंडळासमोरील या घोषणांनंतर सुमारे ३ वर्षाच्या कालावधीनंतर, पाटबंधारे विभागाच्या वर उल्लेखिलेल्या दि. १६ एप्रिल १९८४ च्या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे आदेश काढण्यात आले:-

अ) तीन वर्षाची ( माध्यमिक शालांत परिक्षोत्तर) पदविका धारण केलेल्या कनिष्ठ अभियंत्यांना पांच वर्षाचा सेवाकाळ पूर्ण केल्यानंतर, दोन वर्षाची किंवा तत्सम पदविका धारण केलेल्या कनिष्ठ अभियंत्यांना ७ वर्षाचा सेवाकाळ पूर्ण केल्यानंतर आणि अर्हतारहित कनिष्ठ अभियंत्यांना १० वर्षाचा सेवाकाळ पूर्ण केल्यानंतर, ''राजपत्रित अधिकारी,वर्ग-२ (कनिष्ठ स्तर)'' असा दर्जा देण्यात यावा आणि '' शाखा अभियंता '' (सेक्शनल इंजिनियर) असे नविन पदनाम देऊन त्यांना ( रू.३९५-९०० या '' भोळे आयोगाच्या'' वेतनश्रेणी ऐवजी) रू.६००-९५० ही वरची वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

ब) कनिष्ठ अभियंता म्हणून त्यावेळी जे पदवीधर सेवेत होते व भविष्यकाळात जे यापुढे सेवेत प्रवेश करतील त्यांना देखील ''राजपत्रित अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ स्तर)'' हा दर्जा देण्यात यावा आणि '' सहाय्यक अभियंता श्रेणी-२'' (असिस्टंट इंजिनियर ग्रेड -२ ) असे नविन पदनाम देऊन त्यांनाही (रू.३९५-९०० या ''भोळे आयोग ''वेतनश्रेणी ऐवजी) रू.६००-९५० ही वरची वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी. सहाय्यक अभियंता श्रेणी-२ चीं नविन संवर्ग पदें कनिष्ठ अभियंत्यांच्या एकूण पदसंख्येच्या २५ टक्के राहतील.

क) वरीलप्रमाणे राजपत्रित अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ स्तर), नविन पदनामे आणि उच्च वेतनश्रेणी बहाल करण्यात आलेल्या सहाय्यक अभियंता श्रेणी-२ आणि शाखा अभियंता यांना पूर्वी कनिष्ठ अभियंत्यांना ज्या धर्तीवर नियुक्त करण्यात येत होते त्याच धर्तीवर तूर्त नेमणूक देण्यात यावी आणि कनिष्ठ अभियंत्यांसाठी असलेलीच कर्तव्यें, कामे आणि अधिकार त्यांना तूर्त लागू राहावेत.

३.५ पदवीधर व अन्य कनिष्ठ अभियंत्यांना राजपत्रित दर्जा देण्याबाबतची घोषणा मार्च १९८१ मध्ये करण्यात आली तेंव्हा त्यावेळी त्यांना मिळत असलेल्या रू.३९५-९०० या वेतनश्रेणीपेक्षा वरची असलेल्या रू.५००-९०० या वेतनश्रेणीत

इतर विभागातील (उदा. कृषि अधिकारी , वर्ग-२,कनिष्ठ) '' राजपत्रित वर्ग-२ कनिष्ठ'' हा दर्जा देण्यात आलेली पदें होतींच. परंतु विधानमंडळासमोरील उपरोक्त घोषणेपश्चात् सुमारे ३ वर्षांचा कालावधी उलटल्यानंतर एप्रिल, १९८४ मध्ये पदवीधर व अन्य कनिष्ठ अभियंत्यांना राजपत्रित वर्ग-२ कनिष्ठ या दर्जासह वरची सुधारित वेतनश्रेणी व नविन पदनामे मंजूर करणारे आदेश जेंव्हा पाटबंधारे विभागातर्फे काढण्यात आले तेंव्हा मात्र या रू.५००-९०० या वेतनश्रेणीपेक्षाही वरची वेतनश्रेणी रू.६००-९५० त्यांना त्यावेळी मंजूर करण्यात आली. ही वरवर क्षुल्लक वाटणारी बाब नंतर घडत गेलेल्या घटनांची नांदीच कशी ठरली हें पुढील परिच्छेदांवरून स्पष्ट होईलच.

३.६ पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे, भोळे वेतन आयोगाच्या शिफारशीवर निर्णय घेताना १९७६ मध्ये शासनाने सर्वसाधारण धोरण म्हणून जाहीर केल्याप्रमाणे राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांसाठीं वेतनश्रेणी सुधारणा करण्याकरीता स्वतंत्र आयोग नियुक्त न करता केंद्र शासन जेंव्हा जेंव्हा केंद्रीय कर्मचा-यांकरीतां वेतन आयोग नियुक्त करील त्या वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे वेतनश्रेणी विषयक निर्णय राज्य शासकीय कर्मचा-यांच्या प्रवर्गांना लागू करावयाचे होते. या धोरणात्मक निर्णयानुसार ४ थ्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाच्या निर्णयानुसार सुधारित वेतनश्रेणी दि. १ जानेवारी १९८६ पासून राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांना लागू करण्यासंबंधात जी ''वेतन समानीकरण समिती'' नियुक्त करण्यात आली होती त्या समितीने सहाय्यक अभियंता, श्रेणी-२/शाखा अभियंता या पदांकरीतां रू.६००-९५० यापूर्वीच्या वेतनश्रेणीला अनुरूप म्हणून रू.१६४०-२९०० या सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली होती. परंतु, बहुधा, रू.६००-९५० या पूर्वीच्या वेतनश्रेणीत असलेल्या इतर बहुसंख्य पदांना, त्यांच्याशी निगडीत व अनुषंगिक बाबी ध्यानात घेऊन, रू.२०००-३२०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करणे आवश्यक असल्याचे दिसून आल्यामुळे, शासनाने त्याच धर्तीवर रू.६००-९५० या पूर्वीच्या वेतनश्रेणीतील सहाय्यक अभियंता, श्रेणी-२/ शाखा अभियंता या पदांकरीतां देखील रू.२०००-३२०० ही वेतन समानीकरण समितीने सुचविलेल्या वेतनश्रेणीपेक्षा उच्च अशी सुधारित वेतनश्रेणी दि.

१-१-१९८६ पासून मंजूर केली. ''राजपत्रित अधिकारी , वर्ग-२ (कनिष्ठ स्तर)'' हा दर्जा देताना या पदांना मुळातच, वर म्हटल्याप्रमाणे, रू.५००-९०० ही वेतनश्रेणी सुरूवातीपासून मंजूर करण्यात आली असती तर दि.१-१-१९८६ नंतर रू.२०००-३२०० ही सुधारित वेतनश्रेणी या पदांकरीतां मंजूर न होता रू.१६४०-२९०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर झाली असती आणि परिणामतः साखळी प्रतिक्रिया (चेन रीॲक्शन) म्हणून नंतर ज्या घटना घडल्या त्या टळू शकल्या असत्या असें म्हणणे अप्रस्तुत होणार नाही.

३.७ वर विस्ताराने नमूद केल्याप्रमाणे घडलेल्या घडामोडींचे परिणाम व गर्भितार्थ खाली विशद केल्याप्रमाणे दिसून येतात, जे इतर विविध संवर्गातील डोळस अधिकारी व कर्मचारी यांच्या नजरेतून सुटणे शक्यच नव्हते.

१) कनिष्ठ अभियंत्यांच्या संघटनेने तीव्र आंदोलन केले असतां त्यांच्याशी तडजोड म्हणून कनिष्ठ अभियंता या संवर्गातील (अ) सुमारे २५ टक्के पदवीधर आणि (ब) उरलेल्या सुमारे ७५ टक्के (म्हणजेच बहुसंख्य) पदधारक, ज्यांनी ३ वर्षाची किवा २ वर्षाची पदविका धारण केलेली होती किंवा जे अर्हतारहित होते, यांना (अ) सेवा प्रारंभापासूनच आणि (ब) अनुक्रमे केवळ ५,७, व १० वर्षांच्या सेवाकालानंतर कालबध्द पध्दतीने पदोन्नती, व तीही एकदम राजपत्रित दर्जासह रू.६००-९५० (सुधारित रू.२०००-३२००) या उच्चश्रेणीत आणि त्यांच्या कर्तव्यें, जबाबदा-या व अधिकार यांमध्ये कोणतीही वाढ न करतां, शासनाने मंजूर केली.

२) कनिष्ठ अभियंता या पदावर थेट भरतीकरीतां शालांत परीक्षोत्तर तीन वर्षाची (१० अधिक ३) अभियांत्रिकी पदविका ही किमान आवश्यक अर्हता आहे. तरीही **स्वेच्छेने** या पदावर नियुक्तीकरीतां निवडीसाठीं अभियांत्रिकी पदवीधारक अर्ज करू शकतात. अशाप्रकारे स्वेच्छेने अर्ज केलेल्या काहीं पदवीधारकांची पूर्वी कनिष्ठ अभियंता या पदाकरीतां निवड झाली होती. निवड झाल्यानंतर मात्र त्यांनी आपल्याला कनिष्ठ अभियंता म्हणून, देण्यात आलेली वेतनश्रेणी कमी आहे व आपल्याला देण्यात आलेला दर्जाही कमी प्रतीचा आहे अशी तक्रार करण्यास व आपला असंतोष प्रकट करण्यास सुरूवात केली. असे स्वेच्छेने

कनिष्ठ अभियंता या संवर्गात थेट भरतीने आलेले सुमारे २५ टक्के पदवीधर वगळल्यास उरलेले सुमारे ७५ टक्के, म्हणजेच बहुसंख्य, कनिष्ठ अभियंते तीन वर्षांची किंवा दोन वर्षांची पदविका धारण केलेले किंवा अर्हतारहित होते. स्वेच्छेने कनिष्ठ अभियंता या पदावर रूजू झालेल्या पदवीधरांना, त्यांच्यातील असंतोष तसे पाहता समर्थनीय नसतांनाही, त्यांनी सेवेत प्रवेश केल्यापासूनच, आणि अपदवीधर कनिष्ठ अभियंत्यांना अनुक्रमे केवळ ५,७ व १० वर्षाच्या सेवाकालानंतर कालबध्द अशी पदोन्नती देऊन, तसेच या दोहोंना राजपत्रित दर्जाही प्रदान करून, रू.६००-९५० (सुधारित रू.२०००-३२००) या तुलनेने उच्च वेतनश्रेणीतील राजपत्रित अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ) म्हणून,अनुक्रमे, सहाय्यक अभियंता श्रेणी-२ आणि शाखा अभियंता या पदांवर, त्यांच्या कर्तव्ये ,जबाबदा-या व अधिकार यांच्यामध्ये कोणतीही वाढ न करता नियुक्त करण्याचा अघटित निर्णय शासनाने घेतला.

३) दि.१-१-१९८६ पासून ज्या सुधारित वेतनश्रेणी राज्य शासनाकडील कर्मचा-यांना मंजूर करण्यात आल्या होत्या त्या केंद्र शासनाकडील तत्सम कर्मचा-यांना चतुर्थ केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीवरील आधारित ज्या वेतनश्रेणी मान्य करण्यात आल्या होत्या त्यानुसार होत्या. केंद्र शासनाकडील कनिष्ठ अभियंत्यांना रू.१४००-२३०० ही सुधारित वेतनश्रेणी दि.१-१-८६ पासून मंजूर करण्यात आली होती व तीच वेतनश्रेणी राज्यातीलही कनिष्ठ अभियंत्यांना लागू करण्यात आली. मात्र केंद्र शासनाकडील (केंद्रीय सार्वजनिक निर्माण विभाग) कनिष्ठ अभियंत्यांना रू.१४००-२३०० या वेतनश्रेणीत ५ वर्षाचा कालावधी पूर्ण केल्यानंतर रू.१६४०-२९०० ही वेतनश्रेणी व त्यानंतर पुढील १० वर्षाचा सेवाकाल पूर्ण केल्यानंतर (कालबध्द) रू.२०००-३५०० ही वेतनश्रेणी, त्यांच्या पदनामात वा दर्जात कोणतीही वाढ न होता, मिळते. ५ वर्षानंतर व १० वर्षानंतर अनुक्रमे उपरोक्त दोन वेतनश्रेणी मिळण्यासाठी या कनिष्ठ अभियंत्यांनी अभियांत्रिकी पदविका (३ वर्षे) किंवा तत्सम अर्हता धारण करणे हे देखील आवश्यक आहे. या सर्व बाबींच्या तुलनेत, राज्य शासनाकडील बहुसंख्य कनिष्ठ अभियंता, जे ३ वर्षाची / २ वर्षाची पदविका धारण करत होते वा अर्हतारहित होते, त्यांना केवळ (अनुक्रमे) ५,७, व १०

वर्षांच्या सेवाकालानंतर एकदम राजपत्रित दर्जासह रू.२०००-३२०० ही वेतनश्रेणी मिळू लागली. एवढेच नव्हे तर ते त्यांच्यावरील उच्च पदावर असलेल्या उप अभियंता/उप विभागीय अधिकारी/उप विभागीय अभियंता/सहाय्यक अभियंता (श्रेणी-१), ज्यांची वेतनश्रेणी रू.२०००-३५०० होती, यांच्याही अगदी जवळ येऊन ठेपले.

३.८ वर विस्ताराने उद्धृत केलेल्या परिस्थितीचा जो परिणाम व्हावयाचा तोच झाला. कनिष्ठ अभियंता या रू.१४००-२३०० या वेतनश्रेणीतील पदाशी व त्याकरीतां अत्यावश्यक असलेली अभियांत्रिकी पदविका (१० अधिक ३) ही किमान अर्हता आणि त्या पदधारकांना सोपविलेलीं कामे, जबाबदारी व अधिकार यांचेशी समकक्षता वा त्याहून ज्येष्ठता असलेल्या इतर विविध प्रशासकीय विभागातील पदावर काम करणा-या कर्मचा-यांमध्ये असंतोष निर्माण होऊन तो दिवसेंदिवस वाढत गेला. त्यामुळे उद्भवलेली परिस्थिती व घडलेल्या घटनांचा परिणाम म्हणून प्रथम वन विभागातील वनक्षेत्रपाल या रू.१६४०-२९०० या वेतनश्रेणीतील इतःपर वर्ग-३ मधील पदांना वर्ग-२ चा दर्जा व रू.२०००-३२०० ही पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी आणि सहाय्यक वन संरक्षक या रू.२०००-३५०० या वेतनश्रेणीतील इतःपर वर्ग-२ मधील पदांना वर्ग-१ चा दर्जा व रू.२२००-३७०० ही पुनःसुधारित वेतनश्रेणी दि.१ ऑक्टोबर, १९९० पासून मंजूर करणारे आदेश महसूल व वन विभागाने दि. २५ जानेवारी १९९० रोजी काढले. तद्नंतर कृषि विभागातील कर्मचारी व अधिकारी यांचे सुरू असलेले आंदोलन शमविण्याकरीता कृषि सहाय्यक ( शालांत परीक्षा उत्तीर्ण अधिक दोन वर्षांची पदविकाधारक)यांचेकरीतां रू.१२००-१८०० या वेतनश्रेणी ऐवजी त्या संवर्गात नियमित ७ वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर(कालबध्द) रू.१३५०-२२०० ही पुनःसुधारित वेतनश्रेणी, कृषि पर्यवेक्षक (मोठया संख्येने कृषि पदवीधारक) यांचेसाठीं रू.१४००-२६०० या वेतनश्रेणी ऐवजी रू.१६००-२६६० ही पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी आणि कृषि अधिकारी, कनिष्ठ वर्ग-२, (बहुसंख्येने कृषि पदवी वा त्याहूनही उच्च पदव्युत्तर अर्हताधारक) यांचेकरीतां रू.१६४०-२९०० या वेतनश्रेणी ऐवजी रू.२०००-३२०० ही पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी

दि.१ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर करण्याचे आदेश कृषि व पदुम विभागाने दि.८ डिसेंबर, १९९४ रोजीं काढले. तद्नंतर शासनाच्या वेगवेगळया योजनांमुळे नवीन नवीन कामांचा वाढता व्याप व एकूण कार्यकारी जबाबदारी आणि ''प्रशासनाच्या इतर विभागातील वर्ग-१ च्या अधिका-यांकडून कामात समन्वय घडवून आणण्याची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडणे शक्य व्हावे '' म्हणून तहसिलदार, जे पूर्वी वर्ग-२ चा दर्जा धारण करीत होते, त्यांना कनिष्ठ वर्ग-१ चा दर्जा देऊन रू.२०००-३५०० या वेतनश्रेणी ऐवजी रू.२२००-३७०० ही पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी दि. १ एप्रिल १९९५ पासून मंजूर करणारे आदेश महसूल व वन विभागाने दि.२९ मार्च १९९५ रोजी काढले. हें सर्व घडत असताना, कायदा व सुव्यवस्था आणि सार्वजनिक सुरक्षेची संवेदनशील व मूलभूत जबाबदारी पेलावी लागणा-या पोलिस दलातील अधिकारी व कर्मचारी यांनी मागे का राहावे? दि. १४ ऑगस्ट १९९५ व नंतर दि.२७ फेब्रुवारी १९९६ रोजी गृह विभागाने काढलेल्या आदेशांनुसार पोलिस शिपाई या निम्न पदापासून पोलिस उप अधिक्षक/सहाय्यक पोलिस आयुक्त या पोलिस अधिकारश्रेणीतील सर्व पदांसाठीं विविध पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी दि.१-१-१९८६ अथवा दि.१-११-१९९२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर करण्यात आल्या. या एकूण सांखळी प्रतिक्रियेचा (चेन रीॲक्शनचा) अंत येथेच झाला नाही. इतर विभागातील कर्मचा-यांना/अधिका-यांना पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी वर नमूद केल्याप्रमाणे क्रमशः मंजूर करण्यात आल्यानंतर, त्यांची वरीयता स्पष्टपणे पुन्हा प्रस्थापित व्हावी या करीतां पाटबंधारे विभागाच्या दि.१४ डिसेंबर १९९५ च्या आदेशान्वये कनिष्ठ अभियंता या अभियांत्रिकी अधिका-यांच्या अधिकारश्रेणीतील कनिष्ठ अभियंता या निम्नतम पदापासून मुख्य अभियंता (स्तर-१) या उच्चतम पदापर्यंत सर्वच स्तरांवरील पदांकरीता पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या. त्यांपैकी विशेष उल्लेखनीय बाबी अशा कीं, कनिष्ठ अभियंता (किमान आवश्यक अर्हता ३ वर्षांची अभियांत्रिकी पदविका)या पदासाठी जी रू.१४००-२३०० ही मान्य सुधारित वेतनश्रेणी (केंद्र शासनाकडील कनिष्ठ अभियंत्यांशी समकक्ष) होती ती ऐवजीं, रू.१४००-२६००व रू.१६००-२६०० हे मधले दोन टप्पे एकदम ओलांडून, रू.१६४०-२९०० ही पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी, जी

सर्वसाधारणपणे लिपिक वर्गाच्या पदोन्नती शिडीतील चवथ्या टप्प्यावरील किंवा थेट भरतीकरीतां पदव्युत्तर पदवी किंवा पदवी आणि तद्‌नंतर दोन वर्षांचे व्यावसायिक प्रशिक्षण ही किमान आवश्यक अर्हता असलेल्या पदांसाठीं आहे, मंजूर करण्यात आली. तसेंच शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२, (म्हणजेच, पूर्वी म्हटल्याप्रमाणे, ज्या कनिष्ठ अभियंत्यांनी ३ वर्षांची पदविका वा त्याहून कमी अर्हता धारण केलेली होती त्यांनी त्यांच्या अर्हतेनुसार अनुक्रमे केवळ ५,७ व १० वर्षांची सेवा पूर्ण केल्यावर किंवा जे कनिष्ठ अभियंते त्यांच्या सेवेतील थेट प्रवेशाचे वेळी अभियांत्रिकी पदवी धारण करीत होते त्यांना ) रू.२०००-३२०० या वेतनश्रेणीऐवजी रू.२०००-३५०० ही पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी (वर्ग-२ च्या दर्जासह) मंजूर करण्यात आली. तसेच, कार्यकारी अभियंता या पदाची रू.३०००-४५०० (केंद्र शासनाकडील कार्यकारी अभियंता यांना मिळणा-या वेतनश्रेणीशी समकक्ष) ही वेतनश्रेणी उंचावून रू.३२००-४६२५ ही पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. या सर्व पुनःसुधारित उच्च वेतनश्रेणींना वेतननिश्चितीसाठी ९ वर्षाहून अधिक (म्हणजेच दि.१-१-८६ पासून ) पूर्वलक्षी प्रभाव देखील देण्यात आला.

३.९ वर विशद केल्याप्रमाणे, गेल्या सुमारे दहा वर्षाच्या कालावधीचे दरम्यान, दि.१ जानेवारी १९८६ पासून अंमलात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीतील काहीं विशिष्ट संवर्गातील पदांसाठी पुनःसुधारणा घडवून आणणा-या चक्राचे एक आवर्तन अशा रितीने जणु पूर्ण झाले. लगेच दुस-या आवर्तनाची सुरुवात देखील बहुधा झाली असती. परंतु मध्यंतरीच्या काळात पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाची नियुक्ती, त्या आयोगाच्या अपेक्षित शिफारशी व त्यांवर दि.१ जानेवारी १९९६ पासून अंमलात यावयाच्या केंद्रीय कर्मचा-यांसाठी सुधारित वेतनश्रेणींची प्रथम अपेक्षा व नंतर अलिकडेच झालेली घोषणा, यांमुळे या चक्राने निदान काहीं काळ विराम घेतला आहे, असें म्हटल्यास वावगे ठरूं नये.

३.१० वर वर्णन केलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर साकल्याने व तारतम्याने विचार करून, आम्हाला सोपविलेल्या कार्यकक्षेतील विषय क्र. २ ला अनुसरून

राज्य शासकीय व इतर संवर्ग पदांच्या वेतनश्रेणी दरम्यान ( म्हणजे १-१-८६ पासून पुढील कालावधीत) पुनःसुधारित करण्यात आल्यामुळे केंद्र शासनाकडील समकक्ष पदांच्या तुलनीयतेचे पुनःपरीक्षण करून (दि.१-१-९६ पासून अंमलात यावयाच्या) सुधारित वेतनश्रेणींची आम्हास शिफारस करावयाची आहे. यादृष्टीने समितीने अशा दरम्यान वेतनश्रेणीत पुनःसुधारणा करणा-या आदेशांचे अवलोकन करून, संबंधित प्रशासकीय विभागांचे सचिव तथा विभाग प्रमुख यांच्याशी बैठका घेऊन त्याबाबत चर्चा केली. समितीसमोर शासकीय कर्मचारी व इतर संबंधीत कर्मचा-यांच्या विविध संघटनांनी आपली बाजू मांडताना झालेल्या चर्चेतही वर नमूद केलेल्या विविध विभागांतर्गत पदांच्या दरम्यान झालेल्या श्रेणीवाढीबाबत आवर्जून उल्लेख केला व ज्यांना या वाढींचा फायदा मिळालेला नाही त्यांनी, विशेषकरून, अभियांत्रिकी अधिका-यांच्या सुधारित वेतनश्रेणी दि.१ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने पुनःसुधारित करण्याकरीतां दि. १४ डिसेंबर, १९९५ रोजी पाटबंधारे विभागाने काढलेल्या आदेशांबाबत आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या होत्या. या सर्व विस्तृत चर्चेनंतर सर्वंकष विचाराअंती समिती या निष्कर्षाप्रत आली कीं, दरम्यान झालेल्या पदांच्या वेतनश्रेणीतील वाढी, विविध पदांमध्ये वेतनश्रेणी संबंधीची पूर्वीची सापेक्षता पुनःप्रस्थापित करण्याच्या हेतुने, इतर विभागातील ज्या त्या वेतनश्रेणीमधील संबंधित पदांना देणे संयुक्तिक होणार नाही. त्यामुळे तशी ती न देण्याबाबत समितीची शिफारस आहे. शासकीय विभागांच्या अखत्यारीतील विविध पदांच्या वेतनश्रेणीसंबंधातील पूर्वीची सापेक्षता (परीक्षणांती गुणवत्तेच्या दृष्टीने काही अगदीं अपवादात्मक संवर्ग वा पदें वगळता) पुनःस्थापित करण्याच्या हेतुने, दि. १ जानेवारी १९९६ पासून अंमलात यावयाच्या प्रस्तावित वेतनश्रेणी सुधारणेच्या प्रयोजनार्थ, दरम्यान झालेल्या आणि पदांच्या पुनःसुधारित वेतनश्रेणी ऐवजी कोणती वेतनश्रेणी आधारभूत धरावी यासंबंधी विचार करून आम्ही यापुढील परिच्छेदांत आपल्या शिफारशी सविस्तरपणे दिल्या आहेत. आम्ही पुनःश्च नमूद करू इच्छितो की, या शिफारशी करतानां, विशेषें करून नंतर मंजूर केलेल्या वेतनश्रेणीतील पुनःसुधारणेपूर्वीच्या विविध संवर्गांच्या विविध पदांच्या वेतनश्रेणीतील सापेक्षता, केंद्र शासनाकडे तत्सम अधिकारी/कर्मचारी संवर्ग वा पदें असल्यास त्यांचेबाबत पांचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अहवालातील विवेचन आणि

शिफारशी व त्यांस अनुसरून केंद्र शासनाने दि. १ जानेवारी १९९६ पासून मंजूर केलेल्या नवीन सुधारित वेतनश्रेणी, १९८६ नंतर संबंधित पदांच्या सेवाप्रवेश नियमातील किमान आवश्यक अर्हतेमध्ये घडून आलेला बदल आणि विहित कर्तव्यें आणि जबाबदा-या यांतही झालेले लक्षणीय बदल, आदि सर्व अनुषंगिक बाबींचा काळजीपूर्वक व तारतम्याने विचार करून आम्ही आमच्या या शिफारशी केल्या आहेत.

३.११ कृषि व पदुम विभागाच्या क्रमांक ७५८९/२४७८/भाग-३/ प्र.क्र.४ /९५-ए, दिनांक ८ डिसेंबर १९९४ च्या आदेशान्वये कृषि विभागातील कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक आणि कृषि अधिकारी वर्ग -२ (कनिष्ठ) या पदांना खालीलप्रमाणे वरच्या पुनःसुधारित वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९८६ पासून मंजूर केल्या आहेत.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **पुन:सुधारित वेतनश्रेणी** |
|---|---|---|
| १. | कृषि सहाय्यक | रू.१२००-१८००(मूळ वेतनश्रेणी)<br>रू.१३५०-२२००(७ वर्षे अर्हताकारी सेवा पूर्ण केलेल्या कर्मचा-यांना) |
| २. | कृषि पर्यवेक्षक | रू.१६००-२६६० |
| ३. | कृषि अधिकारी वर्ग-२(कनिष्ठ) | रू.२०००-३२०० |

यासंबंधातील सर्व बाबींचा साकल्याने विचार करून आणि विविध पदांच्या पूर्वीच्या वेतनश्रेणीतील सापेक्षता पुनःप्रस्थापित करणे संयुक्तिक वाटल्यामुळे या समितीने वरील पदांना पुढीलप्रमाणे वेतनश्रेणी आधारभूत धरून सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत शिफारस केली आहेः-

| **अ.क्र** | **पदनाम** | **आधारभूत धरलेली वेतनश्रेणी** | **प्रस्तावित सुधारित वेतनश्रेणी** |
|---|---|---|---|
| १. | कृषि सहाय्यक | रू.१२००-१८०० | रू.४०००-६०००(एस-७) |
| २. | कृषि पर्यवेक्षक | रु.१४००-२६०० | रु.५०००-८०००(एस-९) |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | कृषि अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ) | रु.१६४०-२९०० | रू.५५००-९०००(एस-१०) |

३.१२ गृह विभागाच्या क्रमांक पीएए-०१९५/सीआर २२०/पोल-५-अ, दिनांक १४ ऑगस्ट १९९५ व समक्रमांक दिनांक २७ फेब्रुवारी १९९६ च्या आदेशान्वये राज्य पोलिस दलातील विविध पदांना वरच्या पुनःसुधारित वेतनश्रेणी मंजूर केल्या आहेत. मंजूर करण्यात आलेल्या या पुनःसुधारित वेतनश्रेणी पुढीलप्रमाणे आहेतः-

| अ.क्र. | पदनाम | पुन:सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १. | पोलिस शिपाई | रू. ९५०-१४०० |
| २. | पोलिस नाईक | रू.१२००-१८०० |
| ३. | पोलिस हवालदार | रू.१३२०-२०४० |
| ४. | सहाय्यक पोलिस उप निरीक्षक | रू.१४००-२३०० |
| ५. | पोलिस उप निरीक्षक | रू.१६४०-२९०० |
| ६. | सहाय्यक पोलिस निरीक्षक | रु.२०००-३२०० |
| ७. | पोलिस निरीक्षक | रु.२२००-३५०० |

यासंबंधातील सर्व बाबींचा साकल्याने विचार करून या समितीने वरील पदांना पुढीलप्रमाणे वेतनश्रेणी आधारभूत धरून सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याची शिफारस केली आहे:-

| अ.क्र. | पदनाम | आधारभूत धरलेली वेतनश्रेणी | प्रस्तावित सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | पोलिस शिपाई | रू. ९५०-१५०० | रू.३०५०-४५९०(एस-५) |
| २. | पोलिस नाईक | रू. ९७५-१६६० | रू.३२००-४९००(एस-६) |
| ३. | पोलिस हवालदार | रु.१३२०-२०४० | रू.४०००-६०००(एस-७) |
| ४. | सहाय्यक पोलिस उप निरीक्षक | रू.१४००-२३०० | रू.४५००-७०००(एस-८) |
| ५. | पोलिस उप निरीक्षक | रू.१६४०-२९०० | रू.५५००-९०००(एस-१०) |
| ६. | सहाय्यक पोलिस निरीक्षक | रू.१६४०-२९०० | रू.५५००-९०००(एस-१०) अधिक विशेष वेतन |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | पोलिस निरीक्षक | रू.२०००-३२०० | रू.६५००-१०५००(एस-१२) |

३.१३ उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या क्रमांक मुलेसा/१४९२/सीआर ८६२/ उद्योग-४, दिनांक २ जुलै १९९७ च्या आदेशान्वये राज्यातील शासकीय मुद्रणालयातील विविध पदांसाठीं वरच्या पुनःसुधारित वेतनश्रेणी दिनांक १ नोव्हेंबर १९८९ पासून मंजूर करण्यात आल्या आहेत. केंद्र शासनाने त्यांच्याकडील शासकीय मुद्रणालयातील औद्योगिक कामगारांना पुनःसुधारित वेतनश्रेणी विहित करण्याकरीता नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशींच्या आधारे निर्गमित केलेल्या केंद्र शासनाच्या क्रमांक सी-१७०३४/३७/८६-आयडीसी(ए-तीन), दिनांक ३० ऑगस्ट १९९० च्या आदेशांचा लाभ राज्यातील शासकीय मुद्रणालयातील औद्योगिक कामगारांना देण्यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने नियुक्त केलेल्या धोंड समितीच्या शिफारशींच्या आधारे हे आदेश निर्गमित केलेले असल्यामुळे, या आदेशान्वये शासकीय मुद्रणालयातील विविध पदांना विहित केलेल्या पुनःसुधारित वेतनश्रेणी आधारभूत धरून त्या अनुषंगाने सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत आम्ही शिफारस केली आहे. धोंड समितीच्या अहवालामध्ये केंद्र शासनाच्या मुद्रणालयातील विविध पदांच्या सेवाप्रवेश नियमांचे अवलोकन त्या समितीस करता न आल्याचा उल्लेख लक्षात घेऊन आम्ही अशी शिफारस करीत आहोत कीं, उद्योग, उर्जा व कामगार विभागाने शक्य तितक्या लवकर केंद्र शासनाच्या मुद्रणालयातील पदांचे सेवाप्रवेश नियम येथील पदांना विहित करण्याबाबत कार्यवाही करावी.

३.१४ पाटबंधारे विभागाच्या क्रमांक वेपुर/१०९२/(६२९/९२) आ(क्षेप्र), दिनांक १४ डिसेंबर १९९५ च्या आदेशान्वये अभियांत्रिकी संवर्गातील विविध पदांना वरच्या पुनःसुधारित वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९८६ पासून मंजूर केल्या आहेत. या वेतनश्रेणी पुढीलप्रमाणे आहेतः-

| **अ.क्र.** | **पदनाम** | **पुन:सुधारित वेतनश्रेणी** |
|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता | रू.१६४०-२९०० |

| | | |
|---|---|---|
| २. | शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता(श्रेणी-२) | रू.२०००-३५०० |
| ३. | उप अभियंता/उप विभागीय अधिकारी/उप विभागीय अभियंता/सहाय्यक अभियंता (श्रेणी-१)/वास्तुशास्त्रज्ञ | रू.२२००-४००० |
| ४. | सहाय्यक कार्यकारी अभियंता | रू.२२००-४००० प्रारंभिक दोन जादा वेतनवाढी |
| ५. | कार्यकारी अभियंता/ वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ | रू.३२००-४६२५ |
| ६. | अधिक्षक अभियंता/ उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ | रू.३७००-५००० रू.४५००-५७०० (२०टक्के पदांसाठी निवडश्रेणी) |
| ७. | मुख्य अभियंता(श्रेणी-१) | रू.५४००-६५०० |
| ८. | मुख्य अभियंता(श्रेणी-२) | रू.५४००-६५०० |
| ९. | मुख्य वास्तुशास्त्रज्ञ | रू.५४००-६५०० |

येथील अभियांत्रिकी संवर्गातील विविध पदांना वेतन समानीकरण समितीने केंद्र शासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील पदांची दिलेली समकक्षता व इतर यापूर्वी विस्ताराने विशद केलेल्या सर्व अनुषंगिक बाबींचा साकल्याने विचार करून, येथील अशा पदांना पुढीलप्रमाणे वेतनश्रेणी आधारभूत धरून सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत या समितीने शिफारस केली आहे:-

| **अ.क्र.** | **पदनाम** | **आधारभूत धरलेली वेतनश्रेणी** | **प्रस्तावित सुधारित वेतनश्रेणी** |
|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता | रू.१६००-२६६० | रू.५०००-८००० (एस-९) |

| | | |
|---|---|---|
| २. शाखा अभियंता (कनिष्ठ अभियंता म्हणून विहित सेवाकाल पूर्ण केल्यानंतर) सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (थेट भरती) (राजपत्रित अधिकारी, वर्ग-२ (कनिष्ठ स्तर) | रू.१६४०-२९०० | रू.५५००-९००० (एस-१०) |
| ३. उप अभियंता/उप विभागीय अधिकारी/उप विभागीय अभियंता/सहाय्यक अभियंता (श्रेणी-१)/वास्तुशास्त्रज्ञ | रू.२०००-३५०० (५० टक्के पदांसाठी) | रू.६५००-१०५०० (एस-१२) |
| | रू.२५००-४००० (५० टक्के पदांसाठी) | रू.७५००-१२००० (एस-१४) |
| ४. सहाय्यक कार्यकारी अभियंता | रू.२२००-४००० | रू.८०००-१३५०० (एस-१५) (प्रारंभिक जादा वेतन वाढी नाहीत). |
| ५. कार्यकारी अभियंता/ वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ | रू.३०००-४५०० | रू.१००००-१५२०० (एस-१९) |
| ६. अधिक्षक अभियंता/ उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ | रू.३७००-५००० | रू.१२०००-१६५०० (एस-२१) |
| | रू.४५००-५७०० | रू.१४३००-१८३०० (एस-२४) (२० टक्के पदांसाठी निवडश्रेणी) |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | मुख्य अभियंता(श्रेणी-१) | रू.५१००-६३०० | रू.१६४००-२०००० (एस-२६) |
| ८. | मुख्य अभियंता(श्रेणी-२) | रू.५१००-६३०० | रू.१६४००-२०००० (एस-२६) |
| ९. | मुख्य वास्तुशास्त्रज्ञ | रू.५१००-६३०० | रू.१६४००-२०००० (एस-२६) |

३.१५ महसूल व वन विभागाच्या क्रमांक संकीर्ण ११९३/४०६५ /प्र.क्र.१०२ / इ-१, दिनांक २९ मार्च १९९५ च्या आदेशान्वये तहसिलदार या पदाची वेतनश्रेणी दिनांक १ एप्रिल १९९५ पासून रू.२०००-३५०० वरून रू.२२००-३७०० अशी उंचावण्यात आली आहे. असे केल्यामुळे वर्ग-२ मधील विविध प्रशासकीय विभागाखालील इतर राजपत्रित पदांच्या वेतनश्रेणींच्या बाबतीत पूर्वीची सापेक्षता भंग पावली असून ती पुनःस्थापित करणे संयुक्तिक वाटल्यामुळे, त्या हेतूने तहसिलदार या पदास रू.२०००-३५०० ही वेतनश्रेणी आधारभूत धरून रू.६५००-१०५०० (एस-१२) ही सुधारित वेतनश्रेणी विहित करण्यात यावी अशी समितीने शिफारस केली आहे.

३.१६ महसूल व वन विभागाच्या क्रमांक एफएसटी/१३८९/सीआर ६४४/ फ-४, दिनांक २५ जानेवारी १९९० च्या आदेशान्वये वन विभागातील विविध पदांना पुढीलप्रमाणे नव्याने सुधारित वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९९० पासून मंजूर करण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पुन:सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १. | वनरक्षक | रू.८२५-१२०० (विशेष वेतन बंद केले) |
| २. | वनपाल | रू.१२००-२०४० |

३. वनक्षेत्रपाल रू.२०००-३२००

४. सहाय्यक वन संरक्षक रू.२२००-३७००

या संबंधातील सर्व बाबींचा साकल्याने विचार करून आणि विविध पदांच्या पूर्वीच्या वेतनश्रेणीतील प्रस्थापित सापेक्षता अबाधित ठेवणे संयुक्तिक वाटल्यामुळे, वन विभागातील उपरोक्त विविध पदांना पुढीलप्रमाणे वेतनश्रेणी आधारभूत धरून सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत समितीने शिफारस केली आहे.

| अ.क्र. | पदनाम | आधारभूत धरलेली वेतनश्रेणी | प्रस्तावित सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | वनरक्षक | रू.९५०-१५०० | रू.३०५०-४५९० (एस-५) |
| २. | वनपाल | रू.१२००-१८०० | रू.४०००-६००० (एस-७) |
| ३. | वनक्षेत्रपाल | रू.१६४०-२९०० | रू.५५००-९००० (एस-१०) |
| ४. | सहाय्यक वन संरक्षक | रू.२०००-३५०० | रू.६५००-१०५०० (एस-१२) |

३.१७ प्रशासकीय विभागांनी दरम्यान निर्गमित केलेल्या उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने, त्यानंतरच्या काळात वरच्या पुन:सुधारित वेतनश्रेणीत कर्मचारी / अधिका-यांची नियुक्ती झाली असावी हें विचारात घेऊन समितीने अशी शिफारस केली आहे कीं, दिनांक १ जानेवारी १९९६ पूर्वी किंवा नंतर सेवेत लागलेल्या कर्मचा-यांना / अधिका-यांना त्यांची विद्यमान वेतनश्रेणी ठेवून (रीटेन) घेण्याबाबतचा विकल्प देण्याची मुभा देण्यात यावी.

३.१८ दिनांक १ जानेवारी १९८६ रोजी , सर्वसाधारण वेतनसुधारणा अंमलात आल्यानंतर दरम्यानच्या काळात राज्यातील विविध प्रशासकीय विभागातील काहीं

संवर्ग वा पदांच्या वेळोवेळी करण्यात आलेल्या वेतनश्रेणीतील पुनःसुधारणेमुळे जी परिस्थिती उद्‌भवली आणि ज्या समस्या निर्माण झाल्या त्याचा सविस्तर परामर्ष आम्ही ५.पूर्वी घेतलाच आहे. या अनुभवाचे तात्पर्य व त्यापासून घ्यावयाचा बोध सरळ व स्वयंस्पष्ट आहे असे आम्हास वाटते. या संबंधात थोडेसे खुलासेवार नमूद करावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, दर १० वर्षांच्या कालावधीनंतर आपल्या समस्त कर्मचा-यांच्या वेतनसुधारणेच्या प्रश्नाचा सखोल व सर्वांगीण अभ्यास करून त्यासंबंधी शिफारशी करण्याकरीतां केंद्र शासनाकडून वेतन आयोगाची नियुक्ती केली जाते. या आयोगाकडून एखाद्या विशिष्ट केंद्रीय मंत्रालयांतर्गत वा विभागांतर्गत कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी सुधारणेचा खंडितपणे विचार केला जात नसून आयोगाकडून केले जाणारे विश्लेषण व अभ्यास हा विस्तृत व सर्वसमावेशक असतो. वेतन आयोग ही यंत्रणा वा संस्था स्वतंत्र, म्हणजेच शासनापासून अलिप्त, असल्यामुळे या संस्थेने काढलेल्या निष्कर्षांना व केलेल्या शिफारशींना साहजिकच वस्तुनिष्ठतेचा व सम-न्यायाचा दर्जा प्राप्त होतो व त्यामुळे कर्मचारी संघटनांकडून देखील सर्वसाधारणपणे या शिफारशी स्वीकारार्ह मानल्या जातात. राज्य शासनाकडून डिसेंबर १९७७ मध्ये करण्यात आलेल्या धोरणात्मक घोषणेनुसार केंद्रीय कर्मचा-यांसाठी चवथ्या केंद्रीय वेतन आयोगाने शिफारस केलेल्या सुधारित वेतनश्रेणींच्या धर्तीवर राज्य शासनाकडील कर्मचा-यांच्या व अधिका-यांच्या समकक्ष पदांसाठी तदनुरूप सुधारित वेतनश्रेणी दि.१ जानेवारी १९८६ पासून अंमलात आल्या आहेत. राज्य शासनाकडील व इतर संबंधित कर्मचा-यांसाठी दि. १ जानेवारी १९९६ पासून अंमलात यावयाच्या वेतन सुधारणेसाठी देखील हाच दृष्टिकोन आम्ही सर्वसाधारणपणे अवलंबला आहे. दोन सर्वसाधारण वेतनसुधारणेमधील दरम्यानच्या काळात मात्र शासनाकडून जर काहीं विशिष्ट संवर्गाच्या वा पदांच्या वेतनश्रेणी पुनःसुधारित करण्यात आल्या तर तशीच पुनःसुधारणा न मिळालेल्या कर्मचा-यांमध्ये आपल्यावर अन्याय झाला व विशिष्ट कर्मचारी गटांना शासनाने आपली खास मर्जी बहाल केली अशी भावना निर्माण होते. परिणामतः, वेतनश्रेणीवाढ न मिळालेल्या कर्मचा-यांकडून ती मिळविण्यासाठी शासनाकडे निवेदने व मागण्या येण्यास 'सुरूवात होते व त्या मिळविण्याकरीतां संघर्ष करण्याकडेही ते प्रवृत्त होतात. अशा प्रकारे, कर्मचा-यांच्या विविध गटांमध्ये

इर्षेची  भावना निर्माण होऊन ती दृढ होणे वा वाढीस लागणे, हें शासनाच्या विविध विभागातील कर्मचारी व अधिका-यांमध्ये एकात्मता, समन्वय व परस्पर सहकार्याचें पोषक वातावरण टिकून राहण्यास बाधा आणणारे आहे. विशिष्ट संवर्गाच्या वा पदांच्या वेतनश्रेणीत दरम्यानच्या काळातही सुधारणा करणे काहीं प्रसंगी अनिवार्य ठरतें हें खरे आहे. उदा., एखाद्या पदासाठी वा संवर्गासाठी विहित केलेल्या शैक्षणिक वा व्यावसायिक किमान अत्यावश्यक अर्हतेमध्ये बदल करून ती वाढविण्यात आली तर, किंवा न्यायालयाचा वा लवादाचा तसा निर्णय झाला तर, त्यानुसार आवश्यक ती वेतनश्रेणीतील सुधारणा करणे अपरिहार्य होते. परंतु, अशी परिस्थिती निर्माण होण्याची उदाहरणे अगदी थोडीथोडकीच, म्हणजेच अत्यंत अपवादात्मक, म्हणता येतील. असे अपवाद वगळतां, सर्वसाधारण वेतनसुधारणा अंमलात आल्यानंतर त्याद्वारे प्रस्थापित झालेली विविध विभागातील वेगवेगळया संवर्गामधील पदांच्या वेतनश्रेणीतील सापेक्षता विस्कळीत होणार नाही याची जागरूकता व सावधानता त्यानंतर कटाक्षाने पाळणे अत्यावश्यक आहे. कर्मचा-यांच्या एखाद्या विशिष्ट गटांकडून, दरम्यानच्या काळात, वेतनश्रेणीची मागणी आल्यास ती निग्रहपूर्वक अमान्य करणे हेंच व्यापक व दूरगामी दृष्टीने श्रेयस्कर ठरतें. बदलत्या कालमानानुसार व आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत होणा-या स्थित्यतरांमुळे किंवा आर्थिक व सामाजिक विकासाकरीतां हाती घेण्यात येणा-या योजना व कार्यक्रमांचे प्राथम्यक्रम कालमानानुसार बदलल्यामुळे काहीं संबंधित विभागांतर्फे राबविण्यात येणा-या योजना व कार्यक्रमांस विशेष महत्व प्राप्त होणे हे अपरिहार्य आहे. परंतु अशा विभागांच्या कर्मचा-यांनी त्या आधारावर वेतन सुधारणेंचा प्रयत्न केला तर,  सर्वांगीण विचार करून, अशा प्रकारच्या प्रवृत्तींना खतपाणी मिळणार नाही व वेतन सुधारणेसाठी विविध कर्मचारी गटात चढाओढीची अनारोग्यदायी स्पर्धा निर्माण होणार नाही हें पाहणे, एकूण प्रशासनातील सुव्यवस्था व विविध कर्मचा-यांच्या संवर्गात परस्पर सौहार्दाची भावना टिकवून धरण्याच्या दृष्टीने फार अगत्याचें ठरते. जर कर्मचा-यांच्या विशिष्ट संवर्गाच्या वा पदांच्या वेतनश्रेणीत सुधारणा होणे आवश्यक असेल तर त्या संबंधिचा विचार यथावकाश नियुक्त व्हावयाच्या वेतन आयोगासारख्या 'अलिप्त व सर्व समावेशक अभ्यास करण्यासाठीं नेमलेल्या संस्थेतर्फे होणें हेच योग्य होईल. म्हणून आमची अशी

शिफारस राहील कीं, एखादी सर्वसाधारण वेतनसुधारणा झाल्यानंतर, वर उल्लेख केल्याप्रमाणे अगदी अनिवार्य व अत्यंत अपवादात्मक घटना वगळल्यास, दरम्यानच्या काळात एकांगी वा पृथक स्वरूपाचे वेतनसुधारणेचे प्रस्ताव मान्य करण्यात येऊ नयेत.

## प्रकरण-४

## दृष्टिकोन

दिनांक १ जानेवारी १९८६ पासून अंमलात आलेल्या वेतन सुधारणेच्या संदर्भात निवृत्त न्यायमूर्ती श्री.एन.बी.नाईक यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या वेतन समानीकरण समितीने राज्य शासनाकडील समकक्ष पदांकरीतां केंद्र शासनाकडील तत्सम पदांच्या सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने जेथे केंद्र शासनाकडील तत्सम पदें आढळली तेथे केंद्र शासनाकडील अशा पदांच्या सुधारित वेतनश्रेणी येथील पदांना विहित करण्याबाबत शिफारस केली होती. उर्वरित पदांच्या बाबतीत त्यांच्या विद्यमान वेतनश्रेणींचे ''परिणामक सममूल्य'' विचारात घेऊन त्या अनुषंगाने सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत शिफारस केली होती. काही पदांच्या बाबतीत त्यांचे विनिर्दिष्ट सेवाप्रवेश नियम आणि जबाबदा-यामधील क्लिष्टता आणि विशेष जिकिरीच्या स्वरूपाची कर्तव्ये विचारात घेऊन उपरोक्त सममूल्याधिष्ठित वेतनश्रेणीहून वरच्या वेतनश्रेणी विहित करण्याबाबतही शिफारस केली होती.

४.१ आम्ही देखील पदांना सुधारित वेतनश्रेणी विहित करतांना मुख्यत्वें आधीच्या वेतन समानीकरण समितीने राज्यातील काही ठराविक पदांना केंद्र शासनाकडील पदांची दिलेली समकक्षता आधारभूत मानून त्याप्रमाणे अनुरूप सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली आहे. मात्र केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक ३० सप्टेंबर १९९७ च्या अधिसूचनेन्वये तेथील विविध मंत्रालयातील व संलग्न कार्यालयातील, तसेच काहीं विशिष्ट समान संवर्ग आणि पदांसाठीं,ठराविक अटींच्या अधीन राहून पाचव्या केंद्रीय आयोगाने केलेल्या शिफारशींस अनुसरून तदनुरूप वेतनश्रेणी म्हणून थोडया वरच्या वेतनश्रेणी मंजूर केल्या आहेत.'आधीच्या वेतन समानीकरण समितीने येथील पदांना केंद्र शासनाकडील पदांची दिलेली समकक्षता आधारभूत मानून

येथील अशा पदांकरीतां, राज्य शासनाने घेतलेल्या पूर्वी नमूद केलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने, केंद्र शासनाकडील व येथील पदांची समकक्षता टिकून राहण्याच्या दृष्टीने अशा वरच्या सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत या समितीने शिफारस केली आहे.

४.२ जेथें एखाद्या पदाचे सेवाप्रवेश नियम आणि कर्तव्यें व जबाबदा-या या तें पद ज्या मूळ प्रशासकीय विभागामध्ये मुख्यत्वे आहे **तेथील पदाच्या सेवाप्रवेश नियमाबरहुकूम असल्याचे आढळून आलें तेथे** (उदा. सांख्यिकी सहाय्यक हे अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील पद इतरत्र, मूळ पदाप्रमाणेच गणित वा संख्याशास्त्र या विषयासह द्वितीय श्रेणीतील पदवी अशी अर्हता असलेले असल्यास) अशा पदांसाठीं समकक्षतेच्या आधारे या समितीने मूळ प्रशासकीय विभागातील पदांची सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत शिफारस केली आहे.

४.३ केंद्र शासनाच्या दिनांक ३० सप्टेंबर १९९७ च्या अधिसूचनेन्वये निर्गमित केलेल्या आदेशामध्ये विद्यमान वेतनश्रेणी समोर सममूल्य सुधारित वेतनश्रेणी दर्शविलेल्या आहेत. राज्य शासनाकडील काही विद्यमान वेतनश्रेणी केंद्र शासनाकडे सध्या अस्तित्वात नाहीत. तसेच, केंद्र शासनाकडील विद्यमान वेतनश्रेणींची संख्या लक्षात घेता तेथील ब-याच वेतनश्रेणी राज्य शासनाकडे अस्तित्वात नाहीत. ही बाब लक्षात घेऊन या समितीने त्या अनुषंगाने येथील विद्यमान वेतनश्रेणींकरीतां सममूल्याधिष्ठित अनुरूप अशा वेतनश्रेणी निर्धारित करून त्यांची शिफारस केली आहे.

४.४ राज्य शासनाकडे रू.७७५-११५० अशी वेतनश्रेणी अस्तित्वात आहे. केंद्र शासनाकडे रू.७७५-१०२५ आणि रू.८००-११५० या वेगवेगळया वेतनश्रेणी सध्या अस्तित्वात आहेत. ही बाब लक्षात घेऊन, या समितीने येथील रू.७७५-११५० या विद्यमान वेतनश्रेणीकरीतां, केंद्र शासनाने तेथील उपरोक्त दोन विद्यमान वेतनश्रेणींकरीतां विहित केलेल्या दोन वेगळया सुधारित वेतनश्रेणींचे सामलीकरण करून, रू.२६१०-४००० अशी नवीन सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत

शिफारस केली आहे. येथील रू.८००-११५० ही वेतनश्रेणी प्रामुख्याने राज्यातील शासकीय मुद्रणालयामध्ये अस्तित्वात असल्यामुळे या वेतनश्रेणीसाठीं मात्र

रू.२६५०-४०००(एस-३) ही केंद्र शासनाने विहित केलेली सुधारित वेतनश्रेणीच विहित करण्याबाबत या समितीने शिफारस केली आहे.

४.५ राज्य शासनाकडे गट'अ' मध्ये रू.२२००-३७०० ही वेगळी वेतनश्रेणी अस्तित्वात आहे. केंद्र शासनाकडे ही वेतनश्रेणी अस्तित्वात नाही. येथील ही विद्यमान वेतनश्रेणी केंद्र शासनाकडे रू.२३७५-३७५० या वेतनश्रेणीशी तुलनीय आहे हे लक्षात घेऊन, समितीने रू.२२००-३७०० या येथील विद्यमान वेतनश्रेणीसाठीं रू.७४५०-११५०० (एस-१३) ही सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत शिफारस केली आहे.

४.६ राज्य शासनाकडे रू.३२००-४६२५ आणि रू.३२००-४७०० या दोन वेतनश्रेणी सध्या अस्तित्वात आहेत. केंद्र शासनाने रू.३२००-४७०० या वेतनश्रेणीस विहित केलेली रू.१०६५०-१५८५० (एस-२०) हीच वेतनश्रेणी या दोन विद्यमान वेतनश्रेणीकरीतां विहित करण्याबाबत समितीने शिफारस केली आहे.

४.७ राज्य शासनाकडे अस्तित्वात असलेल्या रू.५४००-६५०० या वेगळया विद्यमान वेतनश्रेणीस, या वेतनश्रेणीचे सममूल्य तसेच ही वेतनश्रेणी केवळ आरोग्य सेवा संचालनालय तसेच वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय या फारच मोठया संचालनालयांच्या प्रत्येकी एक विभाग प्रमुखाकरीतां असल्याचे लक्षात घेऊन, या विद्यमान वेतनश्रेणीकरीतां, प्रशासकीय विभागाच्या सचिवांकरीता रू.५९००-६७०० या विद्यमान वेतनश्रेणीपेक्षा निम्न असलेली रु.५१००-६७०० ही वेतनश्रेणी आधारभूत मानून, रू.१६४००-२०९०० (एस-२७) ही सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत या समितीने शिफारस केली आहे.

## वेतनश्रेणीचे समीकरण

८.८ वर निर्देशिल्याप्रमाणे वेतनश्रेणींचे समीकरण आम्ही खालीं दर्शविले आहे.

| अ.क्र. | केंद्र शासनाकडील सुधारित वेतनश्रेणींचा क्रमांक | विद्यमान वेतनश्रेणी (रूपये) | सुधारित वेतनश्रेणी (रूपये) | राज्य शासनाकडील सुधारित वेतनश्रेणींचा क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | एस-१ | ७५० नियत<br>७५०-९४० | २५५० नियत<br>२५५०-५५-२६६०-६०-३२०० | श्रे-१ |
| २. | एस-२ | ७७५-१०२५ व<br>७७५-११५० | २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० | श्रे-२ |
| ३. | एस-३ | ८००-११५० | २६५०-६५-३३००-७०-४००० | श्रे-३ |
| ४. | एस-४ | ८२५-१२०० | २७५०-७०-३८००-७५-४४०० | श्रे-४ |
| ५. | एस-५ | ९५०-१४००<br>९५०-१५०० | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | श्रे-५ |
| ६. | एस-६ | ९७५-१५४०<br>९७५-१६६० | ३२००-८५-४९०० | श्रे-६ |
| ७. | एस-७ | १२००-१८००<br>१२००-२०४०<br>१३२०-२०४० | ४०००-१००-६००० | श्रे-७ |
| ८. | एस-८ | १३५०-२२००<br>१४००-२३०० | ४५००-१२५-७००० | श्रे-८ |
| ९. | एस-९ | १४००-२६००<br>१६००-२६६० | ५०००-१५०-८००० | श्रे-९ |
| १०. | एस-१० | १६४०-२९०० | ५५००-१७५-९००० | श्रे-१० |
| ११. | एस-१२ | २०००-३२००<br>२०००-३५०० | ६५००-२००-१०५०० | श्रे-१२ |
| १२. | एस-१३ | २२००-३७००<br>२३७५-३५०० | ७४५०-२२५-११५०० | श्रे-१३ |
| १३. | एस-१४ | २५००-४००० | ७५००-२५०-१२००० | श्रे-१४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४. | एस-१५ | २२००-४००० | ८०००-२७५-१३५०० | श्रे-१५ |
| १५. | एस-१९ | ३०००-४५००<br>३०००-५००० | १००००-३२५-१५२०० | श्रे-१९ |
| १६. | एस-२० | ३२००-४६२५<br>३२००-४७०० | १०६५०-३२५-१५८५० | श्रे-२० |
| १७. | एस-२१ | ३७००-५००० | १२०००-३७५-१६५०० | श्रे-२१ |
| १८. | एस-२४ | ४१००-५३००<br>४५००-५७०० | १४३००-४००-१८३०० | श्रे-२४ |
| १९. | एस-२५ | ४८००-५७०० | १५१००-४००-१८३०० | श्रे-२५ |
| २०. | एस-२६ | ५१००-६३०० | १६४००-४५०-२०००० | श्रे-२६ |
| २१. | एस-२७ | ५४००-६५०० | १६४००-४५०-२०९०० | श्रे-२७ |
| २२. | एस-२९ | ५९००-६७०० | १८४००-५००-२२४०० | श्रे-२९ |
| २३. | एस-३० | ७३००-७६०० | २२४००-५२५-२४५०० | श्रे-३० |

४.९ विद्यमान वेतनश्रेणींच्या प्रस्तावित वेतन सुधारणेमुळे करण्यात आलेल्या पुनर्रचनेमुळे काही ठिकाणी पदोन्नतीच्या पदासाठीं देखील निम्नपदाची वेतनश्रेणी अनुज्ञेय होण्याची शक्यता आहे. अशा तुरळक ठिकाणी पदोन्नतीच्या पदासाठीं, समितीने प्रकरण क्रमांक ५ मध्ये विशद केल्याप्रमाणे, विशेष वेतनाची रक्कम अनुज्ञेय राहील.

४.१० राज्यातील काहीं गट'अ' राजपत्रित पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत 'राज्य सेवा परीक्षा' नामक संयुक्त स्पर्धा परीक्षा घेतली जाते. या परीक्षेसाठी किमान पात्रता ''कोणत्याही विद्याशाखेची पदवी'' अशी आहे. असे असले तरी या विविध गट'अ' मधील पदांकरीता सध्या रू.२२००-३७०० व रू.२२००-४००० या दोन वेतनश्रेणी अस्तित्वात आहेत. या समितीला महाराष्ट्र राज्य वित्त व लेखा सेवा वर्ग १ व विक्रीकर अधिकारी वर्ग १ हीं दोन पदें प्रामुख्याने रू.२२००-३७०० या निम्न वेतनश्रेणीत आढळलीं. उपरोक्त विवेचन विचारात घेतां, या समितीने अशी शिफारस केली आहे कीं, कोणत्याही विद्याशाखेची पदवी ही किमान पात्रता आवश्यक असलेल्या महाराष्ट्र लोकसेवा

आयोगामार्फत घेण्यात येणा-या उपरोक्त संयुक्त परीक्षा संबंधातील गट 'अ' मधील सर्व पदांकरीता रू.२२००-४००० ही विद्यमान वेतनश्रेणी आधारभूत मानून रू.८०००-१३५०० (एस-१५) ही सुधारित वेतनश्रेणी या पदांना विहित करण्यात यावी.

४.११ पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाने केलेल्या शिफारशींस अनुसरून थेट भरतीसाठी विज्ञान शाखेतील पदवी किंवा अभियांत्रिकी पदविका ही किमान अर्हता अत्यावश्यक असलेल्या तंत्रज्ञ वा अभियांत्रिकी संवर्गातील पदांसाठीं केंद्र शासनाने मान्य केल्याप्रमाणे रू.५०००-८००० (एस-९) या सुधारित वेतनश्रेणीची या समितीने शिफारस केली आहे.

४.१२ माध्यमिक शालांत परीक्षा अधिक दोन वर्षाची पदविका/प्रमाणपत्र ही अर्हता सेवाप्रवेशामध्ये अंतर्भूत असलेल्या पदांकरीतां या समितीने रू.४०००-६००० (एस-७) या सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली आहे. तसेंच काही संवर्ग पदांसाठी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशी सुधारित किमान अर्हता विहित करण्यात आलेली असून देखील अशीं पदें गट'ड' मध्ये निम्नश्रेणीत असल्याचे समितीला आढळून आले. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण ही किमान अर्हता विचारात घेता या समितीने, हीं पदे कुठच्या गटात मोडतात हीं बाब दुर्लक्षून, अशा सर्व पदांना रू.३०५०-४५९० (एस-५) या सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली आहे.

४.१३ विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींशी घेतलेल्या मुलाखतींत या समितीला प्रामुख्याने मंत्रालयातील ''सहाय्यक'' पदास रू.१६४०-२९०० ही फारच वरची वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्यामुळे मंत्रालयातील लिपिकांना आपल्या रू.९५०-१५०० या वेतनश्रेणीतून एकदम रू.१६४०-२९०० या तुलनेने ब-याच उच्च वेतनश्रेणीवर पदोन्नतीची संधी मिळते इतकेच नव्हे तर कालबध्द पदोन्नतीच्या योजनेनुसार लक्षणीय व अवाजवी आर्थिक लाभ देय ठरतो अशी तक्रार पुन्हापुन्हा ऐकावयास मिळाली. मंत्रालयातील लिपिक पदाची अधिकारश्रेणी सर्वसाधारणपणे

केंद्र शासनाच्या केंद्रीय सचिवालयामधील अधिकारश्रेणीप्रमाणे असली तरी केंद्र शासनाकडे ''सहाय्यक'' या पदाच्याखाली असलेले ''उच्चस्तर लिपिक'' (अपर डिव्हीजन क्लार्क) हे पद मात्र राज्यातील मंत्रालयात अस्तित्वात नाही. राज्यातील मंत्रालयात पूर्वी कार्यासन पध्दती अस्तित्वात होती. या पध्दतीमध्ये कार्यासनात ''वरिष्ठ'' व ''कनिष्ठ'' असे दोन प्रकारचे ''सहाय्यक'' असत. कामाच्या निपटा-याच्यादृष्टीने ''वरिष्ठ सहाय्यक'' हा ''कनिष्ठ सहाय्यका'' च्या वरचा स्तर नव्हता आणि कनिष्ठ सहाय्यकांनी हाताळलेली प्रकरणे वरिष्ठ सहाय्यकामार्फत वर सादर केली पाहिजेत असा दंडकही नव्हता. ज्ञान आणि अनुभव व त्यांचे आधारावर प्राप्त होणारी परिपक्वता आणि कुवत प्रतिबिंबीत होणारे हे सहाय्यकांचे केवळ दोन प्रकार होते व त्यांचेकरीता अनुरूप अशा दोन वेगवेगळया वेतनश्रेण्या होत्या. ''कनिष्ठ सहाय्यक'' म्हणून नियुक्ती झाल्यानंतर त्या व्यक्तींस सुरूवातीस आपल्या कार्यासनातील नित्य स्वरूपाची सहज-सरळ प्रकरणे हाताळावी लागत. कालांतराने त्यांच्या ज्ञानात व अनुभवात भर पडत गेल्यानंतर तुलनेने अधिकाधिक क्लिष्ट स्वरूपाची प्रकरणें अभ्यासून त्यांवर टिप्पणी सादर करण्याचे कामकाज त्यांच्याकडे सोपविण्यात येत असे. सर्वसाधारणपणे, तुलनेने अधिक क्लिष्ट स्वरूपाची प्रकरणे (कनिष्ठ सहाय्यक या पदांवरून कालांतराने वरिष्ठ सहाय्यक म्हणून पदोन्नती मिळालेले)वरिष्ठ सहाय्यक हाताळत असत. मंत्रालयीन लिपिकास रू.९५०-१५०० या वेतनश्रेणीतून एकदम ''सहाय्यक'' या पदावर रू.१६४०-२९०० या तुलनेने ब-याच उच्च वेतनश्रेणीत थेट पदोन्नती मिळते व अशाप्रकारची संधी इतरत्र असलेल्या लिपिक वर्गासच नव्हे तर कोणत्याही इतर तुलनीय कर्मचा-यांनाही उपलब्ध नाही हे खरे आहे. ''लिपिक'' या निम्नपदाच्या वेतनश्रेणीतील रू.१५०० या कमाल वेतनाहून मंत्रालयातील ''सहाय्यक'' या पदाच्या रू.१६४०-२९०० या वेतनश्रेणीतील रू.१६४० हे किमान वेतनही प्रत्यक्षात जास्त आहे. परिणामतः, कालबध्द पदोन्नती योजनेंतर्गत मंत्रालयातील ''लिपिक'' पदधारकांना लक्षणीय व अप्रमाण असा लाभ मिळतो हेही खरे आहे. वर म्हटल्याप्रमाणे, केंद्र शासनाकडे केंद्रीय सचिवालयामध्ये ''सहाय्यक'' या पदाच्या खालोखाल व ''लिपिक'' या पदाच्या वर ''उच्चस्तर लिपिक'' हे पद अस्तित्वात आहे हे वर म्हटलेच आहे. या सर्व अनुषंगिक बाबींचा साकल्याने विचार करता, आम्हांस असे वाटते की,

राज्यातील मंत्रालयात देखील ''सहाय्यक'' या पदाखाली ''कनिष्ठ सहाय्यक'' असे पद रू.४५००-७००० (एस-८) या वेतनश्रेणीमध्ये निर्माण करण्यात यावे. मात्र ''कनिष्ठ सहाय्यक'' ही पदे जादा पदे म्हणून निर्माण न करता लिपिक व सहाय्यक या पदांची संख्या विचारात घेऊन अशा पदांच्या केवळ रूपांतरान्वये, पुढील काही वर्षांच्या काळात टप्प्याटप्प्याने,निर्माण करण्यात यावी, अशी आमची शिफारस राहील.

८.१.८ सार्वजनिक बांधकाम विभागातील अनुरेखक संवर्गातील पदधारकांना केंद्र शासनाच्या दिनांक १४-१०-१९९४ च्या आदेशांच्या अनुषंगाने काहीं ठराविक कालावधीनंतर पदोन्नतीच्या वरच्या पदाची वेतनश्रेणी दिली जावी अशी शिफारस समितीच्या अहवाल भाग-१ मध्ये केलेली आहे. त्या अनुषंगाने त्या संवर्गातील विविध पदांसाठी पुढीलप्रमाणे विद्यमान वेतनश्रेणी आधारभूत मानून सुधारित वेतनश्रेणीची शिफारस या समितीने केली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अनुरेखक | रू. ९७५-१५४०<br>रू.१२००-२०४०<br>(७ वर्षांच्या सेवेनंतर) | रू.३२००-४९००(एस-६)<br>रू.४०००-६०००<br>(एस-७)<br>(७ वर्षांच्या सेवेनंतर) |
| २ | सहाय्यक आरेखक | रू.१२००-२०४०<br>रू.१४००-२३००<br>(५ वर्षांच्या सेवेनंतर) | रू.४०००-६०००<br>(एस-७)<br>रू.४५००-७०००<br>(एस-८)<br>(५ वर्षांच्या सेवेनंतर) |
| ३ | आरेखक | रू.१६००-२६६०<br>रू.१६४०-२९००<br>(४ वर्षांच्या सेवेनंतर) | रू.५०००-८०००<br>(एस-९)<br>रू.५५००-९०००(एस-१०)<br>(४ वर्षांच्या सेवेनंतर) |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | प्रमुख आरेखक | रू.१६४०-२९०० | रू.५५००-९०००(एस-१०) |

केंद्र शासनाच्या धर्तीवर अनुरेखक, सहाय्यक आरेखक व आरेखक या संवर्गाचे पदनाम यापुढे अनुक्रमे आरेखक श्रेणी-३, आरेखक श्रेणी-२ व आरेखक श्रेणी-१ असे करण्याबाबत व या पदावर भावी नेमुणका पुढील सुधारित अर्हतेच्या अधीन राहूनच करण्याबाबत देखील या समितीने शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | पदनाम | सुधारित अर्हता |
|---|---|---|
| १ | आरेखक श्रेणी-३ | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अधिक आरेखक किंवा तत्सम विषयातील किमान दोन वर्षे मुदतीच्या अभ्यासक्रमाची पदविका. |
| २ | आरेखक श्रेणी-२ | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अधिक अभियांत्रिकी किंवा तत्सम विषयातील किमान दोन वर्षे मुदतीच्या अभ्यासक्रमाची पदविका. |
| ३ | आरेखक श्रेणी-१ | |

संबंधीत तांत्रिक क्षेत्रात दरम्यान झालेल्या प्रगतीनुसार ''ट्रेसिंग''आणि ''फेरो प्रिटिंग '' यांचा वापरच संपुष्टात येत आहे हें लक्षात घेऊन पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे अनुरेखक व फेरोप्रिंटर ही पदें टप्प्याटप्प्याने समाप्त करण्याबाबत देखील या समितीने शिफारस केली आहे.

४.१५ पशुवैद्यकीय पदवी जेथे राजपत्रित पदांसाठी किमान सेवाप्रवेश अर्हता म्हणून अत्यावश्यक आहे अशा पशुवैद्यकीय अधिका-यांसाठी, केंद्रीय पाचव्या वेतन आयोगाच्या परिच्छेद क्रमांक ५५.२९१ मध्ये विशद केल्याप्रमाणे, आम्ही संबंधित पद कोणत्या विद्यमान वेतनश्रेणीत आहे याचा विचार न करता, रू.८०००-१३५०० (एस-१५) या सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली आहे. अराजपत्रित

पदांसाठी मात्र अशा पदांच्या विद्यमान वेतनश्रेणी विचार घेऊन तदनुरूप समकक्ष सुधारित वेतनश्रेणीची शिफारस आम्ही केली आहे.

४.१६ केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ३० सप्टेंबर १९९७ च्या आदेशान्वये रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील भौतिकोपचार तज्ञ व व्यवसायोपचार तज्ञ या पदांसाठीं रू.५५००-९००० (एस-१०) ही सुधारित वेतनश्रेणी, केंद्रीय पाचव्या वेतन आयोगाच्या अहवालाच्या परिच्छेद क्रमांक ५२.९६ मध्ये विशद केल्याप्रमाणे, मंजूर केली आहे. ही बाब लक्षात घेऊन आम्ही देखील आपल्याकडील रू.१४००-२६०० या विद्यमान वेतनश्रेणीतील भौतिकोपचार तज्ञ व व्यवसायोपचार तज्ञ या पदांकरीतां रू.५५००-९००० (एस-१०) या सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली आहे.

४.१७ केंद्र शासनाने त्यांचे दिनांक ३० सप्टेंबर १९९७ च्या आदेशान्वये रू.१६००-२६६० या विद्यमान वेतनश्रेणीतील वैद्यकीय समाजसेवक (पदव्युत्तर पदवी किंवा पदवी अधिक दोन वर्षाची समाजकार्य या विषयाची पदविका ही विहित अर्हता धारण असलेल्या), तसेच रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील मनोरूग्ण समाजसेवक (पदव्युत्तर पदवी किंवा पदवी अधिक दोन वर्षाची समाजसेवा या विषयातील पदविका ही विहित अर्हता असलेल्या) या पदांसाठीं, केंद्रीय पाचव्या वेतन आयोगाच्या अहवालाच्या परिच्छेद क्रमांक ५२.१०३च्या अनुषंगाने, रू.५५००-९०००(एस-१०) ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे.

रू.१६००-२६६० या विद्यमान वेतनश्रेणीतील वैद्यकीय समाजसेवक व मनोरूग्ण समाजसेवक या तत्सम येथील पदांना देखील रू.५५००-९००० (एस-१०) या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

४.१८ केंद्र शासनाने त्यांचे दिनांक ३० सप्टेंबर १९९७ च्या आदेशान्वये रू.१४००-२६०० या विद्यमान वेतनश्रेणीतील परिवीक्षा अधिकारी (श्रेणी-२) या पदासाठीं, केंद्रीय पाचव्या वेतन आयोगाच्या अहवालाच्या परिच्छेद क्रमांक १०४.६५ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.५५००-९००० (एस-१०) हीं सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली आहे. आम्ही देखील येथील परिवीक्षा अधिकारी या

पदासाठीं रू.५५००-९००० (एस-१०) या सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली आहे.

४.१९ पूर्वीच्या वेतन समानीकरण समितीने एखाद्या पदास केंद्र शासनाकडील तत्सम पदाची दिलेली समकक्षता आणि आतां दोन्हीकडील पदांचे समान सेवाप्रवेश नियम आणि/अथवा समान विद्यमान वेतनश्रेणी यांच्या आधारे गृहित धरलेली समकक्षता आधारभूत मानून, मूळ विभागातील एखाद्या पदास केंद्र शासनाकडील तत्सम पदाची सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत आम्ही शिफारस केली असल्यास त्या व इतर प्रशासकीय विभागातील तत्सम पदांना देखील समकक्षतेच्या आधारे मूळ प्रशासकीय विभागातील पदाची तीच सुधारित वेतनश्रेणी अनुज्ञेय राहील अशीही आम्ही शिफारस केली आहे.

४.२० समितीच्या अहवालाच्या भाग-१ मध्ये अंतर्भूत ३६ प्रस्तावावर आम्ही स्वतंत्रपणे शासनास यापूर्वीच निर्णय—वजा -शिफारशी केल्या आहेत. त्यातील वेतनश्रेणी विषयक शिफारशी स्वीकृत होतील असें गृहित धरून संबंधित पदाकरीतां आम्ही तदनुरूप सुधारित वेतनश्रेणींची शिफारस केली आहे.

## शिक्षकीय पदे

४.२१ पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाने यासंबंधात केलेल्या शिफारशींस अनुसरून केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ३० सप्टेंबर १९९७ च्या आदेशान्वये शिक्षकीय पदांकरीतां वरच्या टप्प्यातील विद्यमान द्वि/त्रिस्तरीय वेतनश्रेणी आधारभूत मानून त्या आधारावर वरच्या द्वि/त्रिस्तरीय सुधारित वेतनश्रेणी मंजूर केल्या आहेत. केंद्रीय पाचव्या वेतन आयोगाच्या अहवालातील या संबंधातील परिच्छेद व शिफारशींचे आम्ही अवलोकन केले. त्यांत सुरूवातीसच आयोगाने असें नमूद केले आहे कीं, दिल्लीचे राष्ट्रीय राजधानी क्षेत्र (नॅशनल कॅपिटल टेरीटरी) आणि इतर केंद्र प्रशासित क्षेत्रांतील, तसेच केंद्रीय पोलिस संघटना, रेल्वे आणि संरक्षण (डिफेन्स) आदी केंद्रीय मंत्रालये व विभाग 'यांच्या आस्थापनांनी चालविलेल्या, प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांतील, शिक्षक, ज्यांची संख्या सुमारे

५०००० आहे. एवढ्याच शिक्षकांच्या संदर्भात त्यांनी या बाबीचा विचार केला. थोडक्यात, मार्च १९८५ मध्ये नियुक्त करण्यात आलेल्या प्राध्यापक डी.पी. चट्टोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय आयोगाने, म्हणजेच पूर्ण देशाच्या व्यापक स्तरावरील आयोगाने, देशातील सर्व राज्यांतील व केंद्र प्रशासित क्षेत्रातील शिक्षकांच्या वेतनश्रेणींच्या सुधारणेचा ज्याप्रमाणे विचार केला होता त्याच्याशी तुलना करतां असे म्हणता येईल की, केंद्रीय पाचव्या वेतन आयोगाने केवळ दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील व इतर लहान सहान केंद्र प्रशासित क्षेत्रांतील आणि केंद्र शासनाच्या आस्थापनांनी चालविलेल्या शाळांतील मर्यादित संख्येने असलेल्या शिक्षकांचा विचार केलेला आहे. केंद्र शासनाच्या एकूण सुमारे ३९ लक्ष नागरी (सिव्हीलीयन) कर्मचा-यांच्या तुलनेत या आयोगाने वेतन सुधारणे संबंधात विचारात घेतलेल्या शिक्षकाची संख्या, वर म्हटल्याप्रमाणे, सुमारे ५०,००० एवढीच, म्हणजे तुलनेने फारच अल्प होती हे स्पष्ट होईल. तसेच, आयोगाने विचारात घेतलेली शिक्षकाची पदे ज्या प्राथमिक, मिडल्, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतून आहेत त्या शाळांचा आकृतीबंध, त्यांतील शिक्षकांच्या आस्थापनेचा आकृतीबंध, अनुषंगिक शैक्षणिक व व्यावसायिक प्रशिक्षणाच्या किमान आवश्यक अर्हतेसंबंधीच्या तरतुदी, आदी अनुषंगिक बाबीही काही प्रमाणात भिन्न आहेत. वर निर्देश केलेल्या सुमारे ५०,००० शिक्षकांपैकी बहुसंख्य शिक्षक दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातीलच, म्हणजे तुलनेने प्रगत अशा महानगर क्षेत्रातील शाळांतून काम करतात याचेही यासंबंधात भान ठेवणे आवश्यक आहे असे आम्हास वाटते.

४.२२ वर उल्लेख केलेल्या वस्तुस्थितीच्या तुलनेत आपल्या राज्यातील स्थितीचा विचार केल्यास जी प्रमुख गोष्ट ध्यानात येते ती अशी कीं, राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची संख्या फारच मोठी, म्हणजे सुमारे ५ लक्ष ३० हजार एवढी असून या संख्येची राज्यातील शासकीय, जिल्हा परिषदा, कृषि व कृषीतर विद्यापीठे, शासन अनुदानीत संस्थांतील शिक्षकेतर कर्मचारी यांच्या एकूण सुमारे २० लक्ष या संख्येशी तुलना केल्यास ती (शिक्षकांची संख्या) सुमारे २५ टक्के एवढी म्हणजे 'बरीच मोठी आहे. त्यामुळे राज्यातील या बाबीची पार्श्वभूमी व संदर्भ निश्चितच भिन्न आहेत.

४.२३ वर निर्देश केलेल्या प्राध्यापक डी.पी.चट्टोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या राष्ट्रीय आयोगाने शालेय स्तरावरील शिक्षकांच्या पदांसाठी शिफारस केलेल्या द्वि/त्रिस्तरीय वेतनश्रेणींचा आकृतीबंध १९८९ मध्ये स्वीकृत करून राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना तो लागू करण्यात आलेला आहे. या आकृतीबंधानुसार कालबध्द अशा द्वि/त्रिस्तरीय वेतनश्रेणी, राज्यातील शासकीय व इतर कर्मचा-यांना तशा प्रकारच्या वेतनश्रेणी मिळण्यापूर्वी, शिक्षकांना लागू करण्यात आल्या होत्या व त्याचा लाभ सर्व शालेय स्तरावरील शिक्षकांना पूर्वीच्या वेतनश्रेणी सुधारणे पासून, म्हणजेच दि.१-१-१९८६ पासून, मिळत आलेला आहे.

४.२४ पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाने शालेय स्तरावरील शिक्षकांसाठी उच्च द्वि/त्रिस्तरीय वेतनश्रेणींची शिफारस त्यांच्या अहवालातील ज्या परिच्छेद ५५.२५९ मध्ये केलेली आहे त्यातील संबंधित उतारा आम्ही खाली देत आहोत:-

"While the balance of advantage would lie in retaining the present three-tier pay structure for the teachers, we are nevertheless of the view that the scales of pay of the teaching fraternity need to be improved. After taking into account the composite scales of pay suggested by the National Commission on Teachers and other relevant factors as well as the rationalised pay structure proposed by us in general, we recommend that teachers in schools and heads of educational institutions may be provided the replacement scales......."

वरील उता-यावरून हे स्पष्ट होईल कीं, पांचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या मतेंही शिक्षकांसाठी विद्यमान त्रिस्तरीय वेतनश्रेणींची संरचना (तदनुरूप समक्ष सुधारित वेतनश्रेणी मंजूर करून) चालू ठेवणे हे फायद्याच्या समतोलाच्या दृष्टीने योग्यच होईल. तरीही, प्रस्तावित केलेल्या एकूण वेतन सुधारणेची सर्वसाधारण संरचना, त्यांच्या दृष्टीने शिक्षकवर्गाच्या वेतनातील सुधाराची आवश्यकता आणि इतर संबंधित बाबी विचारांत घेतां, उच्च सुधारित द्वि/त्रिस्तरीय वेतनश्रेणींची शिफारस केल्याचे त्यांनी नमूद केले आहे. थोडक्यात, आयोगाने केलेल्या या

संबंधातील शिफारशींना त्यांनीच दिलेले समर्थन तोकडे असून तेवढेसे बळकट नाही असे म्हटल्यास चुकीचे होणार नाही. आयोगाने शिक्षकांसाठी शिफारस केलेल्या उच्च सुधारित वेतनश्रेणीच्या पाठोपाठ त्यांच्या अहवालातील ५५.२६७ या परिच्छेदात दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्रामधील शिक्षण संचालनालयातील शैक्षणिक प्रशासकीय अधिका-यांकरीतांही (शिक्षण संचालक या पदापासून शिक्षण अधिकारी/सहाय्यक शिक्षण संचालक या त्या शिक्षण संचालनालयातील अधिकार श्रेणीमधील सर्व पदांकरीतां) सुधारित वेतनश्रेणींची शिफारस केली आहे. त्याचे अवलोकन करता स्पष्टपणे असे दिसून येते की, त्या वेतनश्रेणींच्या तुलनेत आपल्या राज्यातील शिक्षण संचालनालयातील अधिकारश्रेणीतील पदांना सध्या मिळणा-या (शिक्षण संचालक या पदापासून उप शिक्षणाधिकारी या निम्नतम पदापर्यंत)वेतनश्रेणी निश्चितच कमी आहेत. राज्य शासनाच्या विविध विभागातील प्रशासकीय व इतर अधिका-यांच्या पदांच्या वेतनश्रेणींच्या तुलनेत शिक्षण संचालनालयातील समकक्ष पदांच्या वेतनश्रेणींची सापेक्षता ढासळू नये म्हणून केंद्रीय पांचव्या वेतन आयोगाने दिल्लीतील शिक्षण संचालनालयातील शिक्षक प्रशासकांच्या पदांकरीतां शिफारस केलेल्या वेतनश्रेणी आपल्या राज्यातील शिक्षण संचालनालयातील शिक्षक प्रशासकांच्या पदांना लागू करणे शक्य होणार नाही हे उघड आहे.

४.२५ संक्षेपाने नमूद करावयाचे झाल्यास, वर केलेल्या विवेचनावरून खालील बाबी स्पष्टपणे दिसून येतातः-

(अ) पांचवा केंद्रीय वेतन आयोग हा मुख्यत्वे शिक्षकेतर केंद्रीय कर्मचा-यांच्या/ अधिका-यांच्या वेतन सुधारणेसंबंधी शिफारशी करण्याकरीतां नियुक्त करण्यात आला होता व अगदी मर्यादित संख्या असलेल्या शिक्षक वर्गासंबंधी त्या आयोगाने एका विशिष्ट वस्तुस्थितीच्या संदर्भात केलेल्या शिफारशी सीमांतिक स्वरूपाच्या आहेत. त्या दृष्टीने, पूर्वीच्या चट्टोपाध्याय आयोगाशी तुलना करता पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाची कार्यकक्षा व त्या आयोगाच्या एकूण कामाचे केंद्रस्थान (फोकस) व व्याप्ती यांचे स्वरूप निश्चितच भिन्न होते.

(ब) या वेतन आयोगाने दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील व इतर तुलनेने लहान अशा केंद्र प्रशासित क्षेत्रातील/आस्थापनांतील शाळांपुरता मर्यादित विचार करून इतर केंद्रीय कर्मचा-यांच्या संख्येच्या तुलनेत अगदीच अल्प अशा संख्येने असलेल्या शालेय शिक्षकांच्या वेतनश्रेणी सुधाराचा अनुषंगिक म्हणून विचार करून आपल्या शिफारशी केलेल्या आहेत.

(क) या वेतन आयोगाने शिफारस करताना आपल्या दृष्टीक्षेपात ठेवलेल्या शाळांतील शिक्षक आस्थापनेचा आकृतीबंध व इतर अनुषंगिक बाबी आपल्या राज्यातील तत्सम परिस्थितीशी तुलना करता भिन्न आहेत.

(ड) उपरोक्त आयोगाने आपल्या दृष्टीपथातील मर्यादित संख्येने असणा-या शिक्षकांसाठी उच्च सुधारित वेतनश्रेणींची शिफारस करताना दिलेले समर्थन अगदी सर्वसाधारण व भावनिक स्वरूपाचे असून पुरेसे बळकट नाही.

(इ) या वेतन आयोगाने शिक्षकांसाठी शिफारस केलेल्या उच्च सुधारित वेतनश्रेणींच्या संदर्भात दिल्लीस्थित शिक्षण संचालनालयातील शैक्षणिक प्रशासकीय अधिका-यांच्या पदांसाठीही शिफारस केलेल्या सुधारित वेतनश्रेणी, राज्यातील एकूण शासकीय अधिका-यांच्या वेतनश्रेणींच्या संरचनेचा सम्यकपणे विचार केल्यास, राज्यांतील शैक्षणिक अधिका-यांच्या पदांसाठी ग्राहय धरणे शक्य नाही.

(फ) या वेतन आयोगाने शिक्षकांसाठी उच्च सुधारित वेतनश्रेणींच्या शिफारशी करताना त्या सरसकट स्वरूपाच्या केलेल्या आहेत. विशिष्ट शैक्षणिक अर्हता असलेल्या किंवा इतर काही विशिष्ट पात्रता वा कसोटयांशी त्या संलग्न नाहीत.

(ग) आजही राज्यातील शालेय स्तरावरील शिक्षकांना मिळणा-या वेतनश्रेणींच्या तुलनेत, निरीक्षण, पर्यवेक्षण व मार्गदर्शन करणा-या राज्यातील शैक्षणिक प्रशासकीय अधिका-यांमध्ये आपल्या मिळणा-या वेतनाचे संदर्भात असमाधानाची भावना आहे असे आम्ही त्यांच्याशी केलेल्या चर्चेच्या दरम्यान आम्हाला जाणवले होते. इतर बाबींसमवेत ही देखील बाब ध्यानात ठेवावयास हवी.

४.२६ वर उदधृत केलेल्या कारणास्तव, केवळ शालेय शिक्षकांनाच आजच्या विद्यमान वेतनश्रेणींच्या ऐवजी तदनुरूप समकक्ष सुधारित वेतनश्रेणींपेक्षा

उच्च सुधारित वेतनश्रेणी दिल्यास शिक्षकांच्या पदांसाठीं असलेल्या वेतनश्रेणी व इतर शासकीय अधिकारी व कर्मचा-यांना आणि विशेष करून शैक्षणिक प्रशासकीय कर्मचारी व अधिकारी यांना लागू असलेल्या वेतनश्रेणी यातील आजही दोलायमान असलेले संतुलन बिघडून जाईल व त्याची जी व्यापक साखळी प्रतिक्रीया होईल ती निश्चितच अहितकारी होईल असें आम्हास वाटतें.

वरीलप्रमाणे सर्वंकष विचार करता, केंद्रीय पांचव्या वेतन आयोगानें, वर विशद केल्याप्रमाणे, केवळ अत्यंत मर्यादित क्षेत्रातील व संख्येनें फारच अल्प अशा शिक्षकांकरीतां शिफारस केलेल्या उच्च सुधारित वेतनश्रेणी राज्यातील शालेय स्तरावरील फारच मोठया संख्येने असलेल्या शिक्षकांसाठीं स्वीकारण्याची शिफारस करणे उचित होणार नाही असे आम्हास निश्चितपणे म्हणावेसे वाटते. त्यामुळे आमची अशी शिफारस आहे की, राज्यातील शिक्षकीय पदांना लागू असलेल्या विद्यमान द्वि/त्रिस्तरीय वेतनश्रेणी आधारभूत मानून त्या आधारे त्यांना समकक्ष अशा तदनुरूप द्वि/त्रिस्तरीय वेतनश्रेणीची शृंखला विहित करण्यात यावी. मात्र तसे करताना आम्ही ज्या '' सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेची'' वेगळी शिफारस केली आहे ती या शालेय स्तरावरील (प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षकांना देखील लागू करण्यात यावी अशी आमची शिफारस आहे.

## कला संचालनालय

४.२७ कला, विज्ञान व वाणिज्य या विद्या शाखांतील महाविद्यालयें, अभियांत्रिकी व वास्तुशास्त्र महाविद्यालये आणि तंत्र निकेतनें, तसेंच वैद्यकीय महाविद्यालयें यामधील शिक्षकीय पदांकरीतां विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद आणि भारतीय वैद्यकिय परिषद यांनी पुरस्कृत केलेल्या त्रिस्तरीय वेतनश्रेणी, त्यासंबंधीच्या ''पॅकेज स्कीम'' मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून, यापूर्वीच मंजूर करण्यात आलेल्या आहेत. तथापि, राज्यातील कला संचालनालयाच्या अखत्यारीतील कला व उपयोजित कला महाविद्यालयातील अध्यापकीय वर्गाला मात्र, ब-याच वर्षांचा काळ उलटून गेला असला तरी, अद्यापपर्यंत त्या धर्तीवर 'वेतनश्रेणी मंजूर न करण्यात आल्याचे या समितीच्या निदर्शनास आले. या संबंधात अखिल भारतीय पातळीवर सर्वसाधारण

आकृतीबंध मान्य होऊन त्यानुसार अशा वेतनश्रेणी या पदांना मंजूर करण्यास आणखीही बराच कालावधी लागण्याची शक्यता विचारात घेऊन, संबंधितांना काहीं न्यायोचित किमान लाभापासून वंचित ठेवणे योग्य होणार नसल्याने, पुढील प्रमाणे सुधारित वेतनश्रेणींची आम्ही शिफारस केली आहे:-

| | |
|---|---|
| संचालक | रू.१५१००-१८३०० (एस-२५) |
| अधिष्ठाता | रू.१२०००-१८००० अधिक विशेष वेतन (एस- २३) |
| प्राध्यापक | रू.१२०००-१८००० (एस- २३) |
| वरिष्ठ अधिव्याख्याता | रू.१००००-१५२०० (एस- १९) |
| अधिव्याख्याता | रू.८०००-१३५०० (एस- १५) |

वर नमूद केलेलें वरिष्ठ अधिव्याख्याता हें पद नवीन असून, अधिव्याख्यात्यांच्या एकूण पदसंख्येच्या अधिकाधिक किती टक्के पदांना व कोणत्या अटी व शर्तींच्या अधीन हीं पदें व त्यांच्यांसाठींची सुधारित वेतनश्रेणी अनुज्ञेय असावी याबाबतचा निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने संचालक, कला संचालनालय, यांच्याशी सल्लामसलत करून घ्यावा असे आम्ही प्रस्तावित करतो.

## सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना

४.२८ राज्य शासन सेवेत गट ''क'' व ''ड'' संवर्गातील काहीं ठिकाणी पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत, तर काहीं ठिकाणी अशा संधी उपलब्ध असल्या तरी पदोन्नती मिळण्यास प्रदीर्घ कालावधी लागतो. या संदर्भात कर्मचारी संघटनांतर्फे कालबध्द पदोन्नतीची योजना राबविण्यात यावी अशा सतत करण्यात आलेल्या मागणीचा विचार करून सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ८ जून १९९५ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशान्वये गट ''क'' व ''ड'' (वर्ग ३ व ४ ) मधील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठितता घालविण्यासंबधात योजना शासनाने मंजूर केली व ती दि.१ ऑक्टोबर १९९४ पासून अंमलात आणली. या योजनेचा तपशील थोडक्यात असा आहे कीं, गट ''क'' व ''ड'' मधील पदधारकाना १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देण्यात येईल. ज्या कर्मचा-यांना

पदोन्नती साखळीतील पदावर पदोन्नतीसाठी पद अस्तित्वातच नाही अशा कर्मचा-यांना सदर निर्णयासोबतच्या परिशिष्टामध्ये दर्शविण्यात आल्यानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यात येईल. मात्र ज्या कर्मचा-यांना दोन पेक्षा जास्त पदोन्नती मिळाल्या आहेत अशा कर्मचा-यांना या योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणार नाही. या आदेशानुसार देण्यात आलेल्या पदोन्नतीमुळे जबाबदारी आणि कर्तव्ये यात वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नतीप्रमाणे वेतन निश्चितीचा लाभ देण्यात येतो. मात्र असा लाभ त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक (फंक्शनल) पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा मिळत नाही.

४.२९ सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ८ जून १९९५ च्या उपरोक्त आदेशांचा लाभ गट ''अ'' व ''ब'' मधील अधिका-यांना सध्या मिळत नसल्यामुळे कुंठितता घालविण्यासाठी व पदोन्नतीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांचेकडून आग्रहाची मागणी समितीपुढे करण्यात आल्याचें वर नमूद केलेंच आहे. यासंबंधात केंद्रीय पाचव्या वेतन आयोगाने आपल्या अहवालातील परिच्छेद २२.१ ते २२.४३ अन्वये अशा प्रकारच्या योजनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, तसेच केरळ, राजस्थान, कर्नाटक, पश्चिम बंगाल आदि राज्यातील राज्य शासनांनी या संबंधात मंजूर केलेल्या योजनांचा संक्षिप्त तपशील या सर्वांचा परामर्ष घेऊन ज्या शिफारशी केल्या आहेत त्या आम्ही विचारात घेतल्या. त्याचप्रमाणे या अहवालाच्या परिशिष्ट २२.१ मध्ये या आयोगाने केंद्र शासनाच्या कर्मचा-यांसाठी ''ॲश्युअर्ड करीअर प्रोग्रेशन '' (ए.सी.पी.), म्हणजेच ''आश्वासित सेवाकाल प्रगती'', योजनेची जी रूपरेषा व वैशिष्टये उद्‌धृत केली आहेत त्यांचाही समितीने अभ्यास केला. या आयोगाने स्पष्टपणे शिफारस केलेली असली तरी तशा प्रकारची '' आश्वासित सेवाकाल प्रगती'' योजना स्वीकृत करून ती अंमलात आणण्याचे आदेश केंद्र शासनाने अद्याप निर्गमित केलेले नाहीत असें समजतें. असे असले तरी सेवेतील कुंठितता व प्रदीर्घ सेवाकाळानंतर एकाच वेतनश्रेणीत नियमित वार्षिक वेतनवाढीशिवाय कोणतीही अतिरिक्त प्रगती वा लाभ न मिळाल्यामुळे आणि पदोन्नतीपासून वंचित राहावे लागल्यामुळे त्याचा संबंधित कर्मचारी व अधिकारी यांच्या मनोधैर्यावर होणारा अनिष्ट परिणाम व त्यांच्यातील

संभाव्य वैफल्याची भावना आणि या सर्वांचे शासकीय कामकाज व प्रशासकीय कार्यक्षमता यांवर होणारे अनिष्ट परिणाम यांचा विचार करतां, या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी काहीं ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे असे आम्हास वाटते. मात्र अशी उपाययोजना करताना सध्या शासनाने गट ''क'' व ''ड'' कर्मचा-यांसाठी जी योजना मंजूर केली आहे त्यांतील समितीच्या निदर्शनास आलेल्या त्रुटी व त्या योजनेअन्वये काही ठिकाणी कार्यात्मक पदोन्नतीचे वरचे पद कमालीच्या वरच्या वेतनश्रेणीमध्ये असल्यामुळे केवळ अशाच संबंधित कर्मचा-यांना अवाजवी आर्थिक लाभ मिळणे व इतर ठिकाणी कार्यात्मक पदोन्नतीच्या वरच्या पदाची वेतनश्रेणी त्या कर्मचा-यांच्या वर्तमान वेतनश्रेणीच्या लगतच्या वरच्या वेतनश्रेणीतच असल्यामुळे त्यांना मिळणारा तुलनेने कमी आर्थिक लाभ अशा भेदभावाच्या परिस्थितीवर देखील उपाययोजना करणे आवश्यक आहे असे समितीचे मत झाले. थोडक्यात, प्राप्त परिस्थितीत व अनुषंगिक सर्व बाबींचा विचार करून, राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याकरीतां वेतनश्रेणीतील कुंठिततेचे निवारण करण्यासाठी सुयोग्य योजना असावी अशी समितीची शिफारस असून अशा प्रस्तावित ''सेवांतर्गत आश्वासित प्रगती'' योजनेची रूपरेषा व प्रमुख वैशिष्टये या पुढील परिच्छेदानंतर दिलेल्या परिशिष्टामध्ये आम्ही नमूद केली आहेत.

४.३० संक्षेपाने म्हणावयाचे तर, एखाद्या वेतनश्रेणीतील १० वर्षाच्या अखंड व समाधानकारक सेवेच्या कालावधीत संवर्गनिहाय नियमित कार्यात्मक पदोन्नतीची संधी उपलब्ध न झाल्यास संबंधित अधिका-यास/कर्मचा-यास निदान काहीं जादा प्रमाणात वेतनातील वाढीचा लाभ मिळावा असे या समितीने प्रस्तावित केलेल्या योजनेचे मूळ उद्दिष्ट आहे. या योजनेअन्वये नियमित कार्यात्मक पदोन्नती साखळीतील लगतच्या वरच्या पदाची वेतनश्रेणी आपोआप अनुज्ञेय होणार नाही. मात्र वर्तमान वेतनश्रेणीच्या लगतची वरची वेतनश्रेणी अनुज्ञेय होईल. अशा लगतच्या वरच्या वेतनश्रेणीत वेतननिश्चिती करताना नियमित पदोन्नतीप्रमाणेच वेतन निश्चितीचा लाभ देण्यात येईल. परंतु अशा वेतन निश्चितीचा मिळालेला लाभ त्याच वेतनश्रेणीत नियमित कार्यात्मक पदोन्नती मागाहून मिळाल्यावर पुन्हा

देय ठरणार नाही. मात्र नंतर मिळालेली नियमित कार्यात्मक पदोन्नती त्याहून वरच्या श्रेणीत असल्यास अशा वरच्या वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीसाठी पदोन्नतीप्रमाणेच वेतन निश्चितीचा लाभ पुन्हा मिळेल. या योजने अंतर्गत लाभ संबंधित अधिका-यास/कर्मचा-यास एखाद्या वेतनश्रेणीतील १० वर्षाच्या अखंड प्रत्यक्ष सेवेच्या दरम्यान नियमित कार्यात्मक पदोन्नती न मिळाल्यास अनुज्ञेय राहील. परंतु एखाद्या अधिका-यास/कर्मचा-यास त्याच्या नियमित कार्यात्मक पदोन्नती साखळीत दोनदा नियमित कार्यात्मक पदोन्नती मिळाली असल्यास त्यानंतर मात्र या योजनेचा लाभ मिळण्यास तो पात्र असणार नाही. तसेच, एखाद्या अधिका-यास/कर्मचा-यास या योजने अंतर्गत लाभ अधिकाधिक दोन वेळा मिळू शकेल. समितीची अशीही शिफारस आहे की, ही प्रस्तावित सुधारित योजना सामान्य प्रशासन विभागाचे दि.८ जून १९९५ रोजी काढण्यात आलेले आदेश (व त्यासंबंधात नंतर करण्यात आलेली स्पष्टीकरणे) अधिक्रमित करून दि.१ जानेवारी १९९६ पासून अंमलात आणण्यात यावी. ज्या कर्मचा-यांना सामान्य प्रशासन विभागाच्या दि.८ जून १९९५ रोजीच्या उपरोक्त आदेशांन्वये कालबध्द पदोन्नती योजनेनुसार वरच्या उच्च असुधारित वेतनश्रेणीचा लाभ मिळाला असेल त्यांना ती वरची असुधारित वेतनश्रेणी ठेवून घेण्याचा **किंवा** या नवीन सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार त्यांच्या कालबध्द पदोन्नतीपूर्वीच्या मूळ पदाच्या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष असलेल्या सुधारित वेतनश्रेणीच्या लगतची वरची सुधारित वेतनश्रेणी स्वीकृत करण्याचा विकल्प देण्यात यावा. या योजनेचा लाभ ''अ'',''ब'', ''क'' व ''ड'' या सर्व गटातील अधिका-यांना/कर्मचा-यांना, योजनेतील अटी व शर्तीनुसार, अनुज्ञेय असावा. मात्र, सध्याच्या रू.३०००-४५०० (सुधारित रू.१००००-१५२०० - एस-१९) या वेतनश्रेणीतील वा त्या वरच्या वेतनश्रेणीतील अधिका-यांना १० वर्षाहून अधिक काळ त्या-त्या वेतनश्रेणीतच राहिल्यास लगतची वरची वेतनश्रेणी या योजने अंतर्गत अनुज्ञेय असणार नाही. परिणामतः या मर्यादेपर्यंतच्या सर्व अधिकारी व कर्मचा-यांना ही योजना शासनाने स्वीकारून लागू केल्यास त्यांना आपल्या सेवाकालाच्या दरम्यान किमान दोनदा नियमित कार्यात्मक पदोन्नतीचा आणि/अथवा या योजनेनुसार लगतच्या वरच्या वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीचा लाभ मिळू शकेल. त्यामुळे

सेवेतील कुंठिततेच्या परिणाम स्वरूप त्यांच्यामध्ये सर्वसाधारणपणे आढळून येणारी असमाधानाची भावना कदाचित पूर्णत्वाने नव्हे पण निदान भरीव व लक्षणीय प्रमाणात, दूर होण्यास मदत होईल असा समितीस विश्वास वाटतो. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ८ जून १९९५ च्या आदेशांन्वये ज्या कर्मचा-यांना,(उदा.शासकीय जिल्हा परिषदांमधील कर्मचारी व अकृषि विद्यापीठांतील शिक्षकेतर कर्मचारी इत्यादी), ''कालबध्द पदोन्नती'' ची योजना लागू करण्यात आली आहे अशा सर्व कर्मचा-यांना प्रस्तुतची ''सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना'' दि. १ जानेवारी, १९९६ पासून, त्या संबंधातील विहित अटी व शर्तीसह, लागू करण्यात यावी.

## परिशिष्ट

## (संदर्भ : परिच्छेद ४.२९ )

राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचेकरीतां

सेवांअतर्गत आश्वासित प्रगती योजना

(सा.प्र.वि.चे दि.८-६-९५ चे या संबंधीचे आदेश अधिक्रमित करून)

एखाद्या वेतनश्रेणीतील १० वर्षाच्या अखंड व समाधानकारक सेवेच्या कालावधीत संवर्गनिहाय नियमित कार्यात्मक पदोन्नतीची संधी उपलब्ध न झाल्यास, संबंधित अधिका-यास/कर्मचा-यास निदान काहीं जादा प्रमाणात वेतनातील वाढीचा लाभ मिळावा हें या योजनेचे मूळ उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टांच्या संदर्भात इतर अनुषंगिक प्रशासकीय बाबींचा विचार करून या योजनेचा तपशील व तिच्या कार्यवाहीबद्दल दंडक खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेतः-

(१) १० वर्षाच्या अखंड व नियमित सेवेनंतरही गट ''अ'' व ''ब'' मधील अधिका-यास वा ''क'' व ''ड'' मधील कर्मचा-यास नियमित कार्यात्मक (फंक्शनल) पदोन्नतीची संधी उपलब्ध न झाल्यास त्यास ही योजना लागू राहील.

(२) या योजनेअन्वये नियमित कार्यात्मक पद्दोन्नती साखळीतील लगतच्या उच्च वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी आपोआप अनुज्ञेय होणार नाही. मात्र विद्यमान वेतनश्रेणीच्या लगतची वरची वेतनश्रेणी अनुज्ञेय होईल.

(३) अशी लगतची वरची वेतनश्रेणी ही जर नियमित कार्यात्मक पदोन्नती साखळीतील लगतच्या वरच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी असेल तर ती वेतनश्रेणी या योजने अंतर्गत प्राप्त होण्यासाठीं पदोन्नतीकरीतां आवश्यक असलेले नेहमीचे निकष संबंधित अधिका-याने/कर्मचा-याने पूर्ण करणे बंधनकारक राहील. मात्र जेथे अशी लगतची वरची वेतनश्रेणी नियमित कार्यात्मक पदोन्नती साखळीतील लगतच्या वरच्या वरिष्ठ पदाची नसेल तेथे या योजने अंतर्गत ती लगतची वरची वेतनश्रेणी प्राप्त होण्यासाठीं संबंधित अधिका-याचे/कर्मचा-याचे गोपनीय अहवाल किमान ''चांगल्या'' दर्जाचे (प्रतवारी ''ब'') असणे आवश्यक राहील.

(४) या योजने अंतर्गत लाभ संबंधित अधिका-यास/कर्मचा-यास एखाद्या वेतनश्रेणीतील १० वर्षाच्या अखंड प्रत्यक्ष सेवेच्या दरम्यान नियमित कार्यात्मक पदोन्नती न मिळाल्यास अनुज्ञेय राहील. एखाद्या अधिका-यास/कर्मचा-यास त्याच्या नियमित कार्यात्मक पदोन्नती साखळीत दोनदा नियमित कार्यात्मक पदोन्नती मिळाली असल्यास त्यानंतर मात्र या योजनेचा लाभ मिळण्यास तो पात्र असणार नाही. तसेच, एखाद्या अधिका-यास/कर्मचा-यास या योजने अंतर्गतचा लाभ अधिकाधिक दोन वेळा मिळू शकेल.

(५) वर काहींही नमूद केले असले तरी, सध्याच्या रू.३०००-४५०० (सुधारित रू.१००००-१५२०० -एस-१९) या वेतनश्रेणीतील अथवा त्यावरच्या वेतनश्रेणीतील अधिका-यांना त्या-त्या वेतनश्रेणीतच १० वर्षाहून अधिक काळ राहिल्यास लगतची वरची वेतनश्रेणी या योजने अंतर्गत अनुज्ञेय असणार नाही.

(६) या योजने अंतर्गत मिळालेल्या लाभामुळे जबाबदारी आणि कर्तव्यें यांत वाढ होत नसली तरी, लगतच्या वरच्या वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करताना नियमित पदोन्नती प्रमाणेच वेतन निश्चितीचा लाभ देण्यात येईल. परंतु असा वेतन निश्चितीचा मिळालेला लाभ त्याच वेतनश्रेणीत नियमित कार्यात्मक पदोन्नती मागाहून मिळाल्यावर पुन्हा देय असणार नाही. मात्र नंतर मिळालेली नियमित कार्यात्मक पदोन्नती त्याहून वरच्या वेतनश्रेणीत असल्यास अशा वरच्या वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीसाठीं पदोन्नती प्रमाणेच वेतन निश्चितीचा लाभ पुन्हा मिळेल.

(७) या योजने अंतर्गत लाभ मिळाला तरी संबंधित अधिका-याचे/कर्मचा-याचे नांव कनिष्ठ (मूळ) संवर्गाच्या ज्येष्ठता सूचितच राहील आणि सेवाप्रवेश तरतुदीनुसार

वरच्या उपलब्ध रिक्त पदावर योग्य वेळी नियमित कार्यात्मक पदोन्नतीसाठीं त्याचा विचार करण्यात येईल.

(८) नियमित कार्यात्मक पदोन्नती नाकारलेल्या अधिका-यास/कर्मचा-यास नियमित कार्यात्मक पदोन्नतीपूर्वी या योजनेचा लाभ दिला गेला असेल तर, ज्या वेतनश्रेणीतून उन्नतीने त्याला या योजनेनुसार लगतची वरची वेतनश्रेणी देण्यात आली होती त्या मूळच्या वेतनश्रेणीत त्याला प्रत्यावर्तित करण्यात येईल. या दृष्टीने अशा आशयाचे लेखी बंधपत्र संबंधित अधिका-याला/कर्मचा-याला द्यावे लागेल. मात्र देण्यात आलेल्या आर्थिक लाभाची वसुली त्याचेकडून केली जाणार नाही.

(९) संबंधित अधिका-याकरीतां/कर्मचा-याकरीतां नियमित कार्यात्मक पदोन्नतीसाठीं वरचे पद उपलब्ध होईपर्यंत या योजनेनुसार लगतची वरची वेतनश्रेणी मिळाल्यास तो अधिकारी/कर्मचारी मूळच्या पदनामासह त्या पदाचीच कर्तव्यें व जबाबदा-या पार पाडील.

(१०) या योजनेचा प्रमुख उद्देश कुंठिततग्रस्त अधिका-याला/कर्मचा-याला, त्याच्या विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात, वेतनवाढीचा लाभ काहीं जादा प्रमाणात देण्याचा असल्यामुळे, घरबांधणी अग्रिम, शासकीय निवासस्थानाचे वाटप (इत्यादी) अशा प्रयोजनासाठीच त्याचा विचार केला जाईल. अन्य कुठल्याही बाबींसाठीं, ज्या अधिका-याच्या /कर्मचा-याच्या दर्जावर (स्टेटस्) आधारित असतात, (जसें की, शासकीय कार्यक्रमासाठी औपचारिक निमंत्रण, वरच्या पदावरील स्वीयेतर सेवा), तो विचारात घेतला जाणार नाही.

(११) जर एखादा अधिकारी/कर्मचारी अतिरिक्त ठरला व त्यामुळे त्याची बदली क्रमप्राप्त ठरली, अथवा त्याच्या विनंतीवरून त्याची अन्य विभागात बदली करण्यात आली तर, अशारितीने नवीन विभाग/कार्यालयातील त्याचा सेवाकाळ विचारात घेताना त्यांच्या पूर्वीच्या कार्यालयातील समपातळीवरील सेवा १० वर्षाचा सेवा कालावधी परिगणित करताना विचारात घेतली जाईल.

(१२) कुंठितता घालविण्यासाठी ही योजना लागू केल्यामुळे, पदाच्या उपलब्धतेनुसार नियमित कार्यात्मक पदोन्नतीसाठी असलेल्या संधीवर कुठलाही प्रतिकूल परिणाम होता कामा नये. म्हणजेच, या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली असली तरी एखाद्या कार्यालयाची कार्यक्षमता वाढविण्याकरीतां, कामाचे

(३) अशी लगतची वरची वेतनश्रेणी ही जर नियमित कार्यात्मक पदोन्नती साखळीतील लगतच्या वरच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी असेल तर ती वेतनश्रेणी या योजने अंतर्गत प्राप्त होण्यासाठीं पदोन्नतीकरीतां आवश्यक असलेले नेहमीचे निकष संबंधित अधिका-याने/कर्मचा-याने पूर्ण करणे बंधनकारक राहील. मात्र जेथे अशी लगतची वरची वेतनश्रेणी नियमित कार्यात्मक पदोन्नती साखळीतील लगतच्या वरच्या वरिष्ठ पदाची नसेल तेथे या योजने अंतर्गत ती लगतची वरची वेतनश्रेणी प्राप्त होण्यासाठीं संबंधित अधिका-याचे/कर्मचा-याचे गोपनीय अहवाल किमान ''चांगल्या'' दर्जाचे (प्रतवारी ''ब'') असणे आवश्यक राहील.

(४) या योजने अंतर्गत लाभ संबंधित अधिका-यास/कर्मचा-यास एखाद्या वेतनश्रेणीतील १० वर्षाच्या अखंड प्रत्यक्ष सेवेच्या दरम्यान नियमित कार्यात्मक पदोन्नती न मिळाल्यास अनुज्ञेय राहील. एखाद्या अधिका-यास/कर्मचा-यास त्याच्या नियमित कार्यात्मक पदोन्नती साखळीत दोनदा नियमित कार्यात्मक पदोन्नती मिळाली असल्यास त्यानंतर मात्र या योजनेचा लाभ मिळण्यास तो पात्र असणार नाही. तसेच, एखाद्या अधिका-यास/कर्मचा-यास या योजने अंतर्गतचा लाभ अधिकाधिक दोन वेळा मिळू शकेल.

(५) वर काहींही नमूद केले असले तरी, सध्याच्या रू.३०००-४५०० (सुधारित रू.१००००-१५२०० -एस-१९) या वेतनश्रेणीतील अथवा त्यावरच्या वेतनश्रेणीतील अधिका-यांना त्या-त्या वेतनश्रेणीतच १० वर्षाहून अधिक काळ राहिल्यास लगतची वरची वेतनश्रेणी या योजने अंतर्गत अनुज्ञेय असणार नाही.

(६) या योजने अंतर्गत मिळालेल्या लाभामुळे जबाबदारी आणि कर्तव्यें यांत वाढ होत नसली तरी, लगतच्या वरच्या वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करताना नियमित पदोन्नती प्रमाणेच वेतन निश्चितीचा लाभ देण्यात येईल. परंतु असा वेतन निश्चितीचा मिळालेला लाभ त्याच वेतनश्रेणीत नियमित कार्यात्मक पदोन्नती मागाहून मिळाल्यावर पुन्हा देय असणार नाही. मात्र नंतर मिळालेली नियमित कार्यात्मक पदोन्नती त्याहून वरच्या वेतनश्रेणीत असल्यास अशा वरच्या वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीसाठीं पदोन्नती प्रमाणेच वेतन, निश्चितीचा लाभ पुन्हा मिळेल.

(७) या योजने अंतर्गत लाभ मिळाला तरी संबंधित अधिका-याचे/कर्मचा-याचे नांव कनिष्ठ (मूळ) संवर्गाच्या ज्येष्ठता सूचितच राहील आणि सेवाप्रवेश तरतुदीनुसार

स्वरूप लक्षात घेऊन, आवश्यक असलेल्या पदोन्नतीच्या संधी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न अबाधितपणे चालूच राहावेत.

(१३) ज्या कर्मचा-यांना सामान्य प्रशासन विभागाच्या दि.८ जून १९९५ रोजीच्या उपरोक्त आदेशांन्वये कालबध्द पदोन्नती योजनेनुसार वरच्या उच्च असुधारित वेतनश्रेणीचा लाभ मिळाला असेल त्यांना ती वरची असुधारित वेतनश्रेणी ठेवून घेण्याचा **किंवा** या नवीन सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार त्यांच्या कालबध्द पदोन्नतीपूर्वीच्या मूळ पदाच्या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष असलेल्या सुधारित वेतनश्रेणीच्या लगतची वरची सुधारित वेतनश्रेणी स्वीकृत करण्याचा विकल्प देण्यात यावा.

## कुंठितता कमी करण्यासाठी इतर उपाय

४.३१ पदोन्नतीतील कुंठिततेवर कोणत्या प्रकारे उपाय योजना करता येईल यासंबंधी विचार करून पांचव्या केंद्रीय वेतन आयोगाने त्यांच्या अहवालातील परिच्छेद २२.४० मध्ये अशी शिफारस केली आहे कीं, एखाद्या संवर्गातील लागोपाठ असलेल्या दोन श्रेणींमध्ये भरतीसाठीं थेट सेवा प्रवेशाची तरतूद सर्वसाधारणपणे नसावी. आम्ही देखील या शिफारशीस दुजोरा देतो व असे सुचवितो कीं, राज्य शासनाकडील विविध विभागांतर्गत सेवांच्या बाबतीत देखील विविध स्तरांवरील संवर्गातील पदांच्या सेवा प्रवेश नियमांचे पुनरावलोकन करण्यात येऊन या शिफारशीस अनुलक्षून योग्य ते बदल करण्यात यावे. एखाद्या संवर्गातील लागोपाठच्या दोन श्रेणींतील पदांकरीतां भरतीसाठी थेट सेवाप्रवेशांची तरतूद अगदी अत्यावश्यकच असेल तर, केवळ अपवादात्मक परिस्थितीत, अंतर्भूत असावी. विविध सेवांतर्गत संवर्गातील अधिकार श्रेणींतील विविध स्तरांवर पदोन्नतीचा वाटा (''कोटा'') किती असावा यासंबंधी कांही सरसकट शिफारस करणे हें उचित होणार नाही व ते आमच्या कार्यकक्षेच्या पलीकडचेही होईल. ज्या त्या प्रशासकीय विभागाने यासबंधात विचार करून व संबंधितांशी (सामान्य प्रशासन विभाग इत्यादी) सल्ला-मसलत करून ठरवावे. मात्र, यासंबंधात दोन संवर्गांच्या बाबतीत आमच्या निदर्शनांस आलेल्या सध्याच्या वस्तुस्थितीचा येथे उल्लेख करणे अप्रस्तुत होणार नाही, असे आम्हास वाटते. सार्वजनिक बांधकाम विभाग व

पाटबंधारे विभाग या दोन विभागातील अभियांत्रिकी अधिका-यांच्या अधिकारश्रेणीत आजमितीस कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता श्रेणी-२, उप अभियंता आणि सहाय्यक कार्यकारी अधिकारी या चारही लगतच्या स्तरांवर नियुक्तीसाठीं थेट भरतीची तरतूद असून, पैकी सहाय्यक अभियंता श्रेणी-२ व सहाय्यक कार्यकारी अभियंता या पदांवर १०० टक्के थेट भरतीची सध्या तरतूद आहे. या चारही श्रेणी अखेर कार्यकारी अभियंता या पदावर पदोन्नतीने नियुक्तीकरीतां पूरक श्रेणी आहेत. या सध्याच्या वस्तुस्थितीमुळे कुंठितता निर्माण होण्यात भर पडते किंवा कसे याचा काळजीपूर्वक अभ्यास होणे आम्हांस आवश्यक वाटते. तसा तो संबंधित विभागाने करून, या सध्याच्या वस्तुस्थितीत, अर्थात कार्यक्षमतेला व तांत्रिक गुणात्मकतेला बाधा न आणता, कांही बदल करणे आवश्यक आहे काय, याचा उपरोक्त संबंधित प्रशासकीय विभागांनी अवश्य विचार करावा असे आम्हांस सुचवावेसे वाटते. त्याचप्रमाणे, महसूल विभागातील नायब तहसिलदार, तहसिलदार व उप जिल्हाधिकारी या तीनही लगतच्या श्रेणींमध्ये सध्या विविध प्रमाणात थेट सेवा भरतीची तरतूद आहे. ती बदलून केवळ नायब तहसिलदार व उप जिल्हाधिकारी या दोनच स्तरांवर (तहसिलदार या मधल्या स्तरावरील थेट सेवा भरती क्रमशः कमीकमी करून व अखेर संपुष्टात आणून) करणे, कार्यक्षमतेला बाधा न आणता, श्रेयस्कर होईल किंवा कसे, याचा महसूल व वन विभागाने सर्वंकष विचार करावा असेही आम्हांस सुचवावेसे वाटते.

केंद्रीय सेवांमध्ये विविध विभागांतर्गत अधिकारश्रेणीतील पदांवर पदोन्नतीने नियुक्ती करताना केंद्रीय लोकसेवा आयोगाशी सल्ला-मसलत करण्यासंबंधी आज ज्या तरतुदी व वस्तुस्थिती आहे त्यासंबंधातही, पदोन्नतीतील कुंठितता व इतर अनुषंगिक मुद्यांच्या संदर्भात पांचव्या केंद्रीय वेतन आयोगाने विचार करून आपल्या अहवालातील परिच्छेद १७.३ ते १७.८ मध्ये कांही सूचना केल्या आहेत, त्यांच्याशी आम्ही सहमत आहोंत. राज्यातील वेगवेगळया प्रशासकीय विभागांच्या अंतर्गत असलेल्या सेवांच्या/अधिकारश्रेणींमधील विविध संवर्गातील पदांवर पदोन्नतीने नियुक्तीच्या अनुषंगाने संबंधित सेवाप्रवेश नियमांमध्ये असलेल्या सद्य तरतुदींचेही उपरोक्त सूचनांच्या संदर्भात पुनरावलोकन विनाविलंब होणे आम्हांस आवश्यक वाटते. असे पुनरावलोकन करून, कोणत्या स्तरांवरील/पदांवरील

पदोन्नतीसाठीं महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सल्ला-मसलतीची आवश्यकता असावी यासंबंधी योग्य असें सर्वसाधारण धोरण पुनर्निश्चित करण्यात यावे असे आम्हांस वाटते. याबाबतही सामान्य प्रशासन विभागाने साद्यंत विचार करून, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी विचार-विनिमयाने असे सर्वसाधारण धोरण नेमून दिल्यास कार्यात्मक पदोन्नतीच्या संदर्भात आज जो अनेकदा प्रदीर्घ विलंब होतो तो निदान कांही प्रमाणात कमी होण्यास व त्याद्वारे पदोन्नतीतील कुंठितता तद्वतच कमी होण्यास मदत होईल असे म्हणावयास हरकत नाही.

मात्र सध्या पोलिस उप निरीक्षक या पदावर थेट भरतीद्वारे नियुक्तीकरीता आयोगाकडून जी स्पर्धा परीक्षा घेतली जाते तिची व्याप्ती वाढवून व ती सामायिक स्पर्धा परीक्षा करून, पोलिस उप निरीक्षक, नायब तहसिलदार व मुख्याधिकारी(''क'' वर्ग नगरपालिका) या तिन्ही समकक्ष पदांकरीता थेट भरतीसाठी या सामायिक स्पर्धा परीक्षेद्वारे उमेदवार निवडण्यात यावेत असे आम्हास वाटते. शिवाय बृहन्मुंबईमधील मंत्रालयातील प्रशासकीय विभाग आदीं करीतां कनिष्ठ सहाय्यक (प्रस्तावित) तसेच विक्रीकर निरीक्षक व उत्पादनशुल्क उप निरीक्षक (एक्साईज् सब इन्स्पेक्टर) याही तीन समकक्ष पदांकरीता, सध्याच्या संबंधित स्पर्धा परीक्षेची कक्षा वाढवून तिचें या तिन्ही पदांकरीता थेट भरतीसाठीं सामायिक परीक्षेत रूपांतर करण्यात यावे, असेही आम्ही प्रस्तावित करतो.

**दक्षता रोध**

४.३२ कर्मचा-यांच्या प्रगतीच्या संबंधात त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय करण्याबाबत केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने केंद्र शासनाने सर्वच सुधारित वेतनश्रेणींमध्ये दक्षता रोध अंतर्भूत केलेला दिसून येत नाही. असे असले तरी, त्याऐवजी कर्मचा-यांच्या प्रगतीचा आढावा घेऊन त्याअनुषंगाने त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय करावी किंवा कसें याबाबतची शिफारस (पहा : केंद्रीय पांचव्या वेतन आयोगाच्या अहवालातील परिच्छेद ४३.२९) केंद्र शासनाने स्वीकृत केली किंवा कसें हें समजलेले नाही. प्राप्त परिस्थितीत आम्हीही केंद्र शासनाच्या दक्षता रोधरहित सुधारित वेतनश्रेणी येथे लागू करण्याबाबत शिफारस केली आहे.

## उच्च प्रारंभिक वेतन/आगावू वेतन वाढी

४.३३ कांही विवक्षित पदांच्या बाबतीत उच्च प्रारंभिक वेतन देण्याची तरतूद आहे. यापैकी कांही प्रकरणांत उच्च अर्हतेच्या किंवा व्यावसायिक अनुभवाच्या शर्तीवर उच्च प्रारंभिक वेतन किंवा आगावू वेतनवाढी दिल्या जातात. इतर प्रकरणांत कोणतीही विशिष्ट कारणे याबाबत दिल्याचे आम्हांस आढळून आले नाही. आमचे असे मत आहे कीं, सेवाप्रवेश नियमांमध्ये आवश्यक म्हणून जे विहित केले असेल त्यापेक्षा जास्त अर्हतेस किंवा अनुभवास कोणतेही विशेष महत्व देण्याची गरज नाही. म्हणून उच्च अर्हतेच्या कारणावरून आम्ही उच्च प्रारंभिक वेतनाची किंवा आगावू वेतनवाढीची शिफारस केलेली नाही. अपवाद फक्त दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर) आणि न्यायदंडाधिकारी-प्रथम वर्ग या पदांचा आहे. त्यांच्या रू.८०००-१३५०० या वेतनश्रेणीत आम्ही रू.९१०० या उच्च प्रारंभिक वेतनाची शिफारस केली आहे.

## राजपत्रित दर्जा

४.३४ अलीकडेच वेतनसुधारणेची स्पष्ट मागणी न करता मान व प्रतिष्ठा, म्हणजेच ''राजपत्रित दर्जा'', मिळण्याची भावनात्मक मागणी पुढे करून त्याद्वारे वेतनसुधारणा पदरात पाडून घेण्याचे प्रयत्न कांही कर्मचारी गटांकडून झाल्याचे व होत असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. ''राजपत्रित दर्जा'' ही संकल्पनाच खरे पाहता आता कालबाह्य व निरूपयोगी झालेली आहे. या संदर्भात पांचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अहवालातील परिच्छेद ४४.२१ व ४४.२२ आम्ही मुद्दाम खाली उदधृत करीत आहोत.

**"DISCONTINUANCE OF GAZETTED STATUS**

44..21 The other distinction which has been inherited from the colonial past and is unique to us is that between gazetted and non gazetted officials. Initially, gazetted Officers used to be few in number and so important as to find a mention in the Official Gazette, every time they were appointed, promoted, transferred and so on. Today, the phrase "gazetted " is more of an anachronism. This practice makes the present day official gazettes unnecessarily voluminous and, in turn, results in a general apathy of civil servants towards the Gazettes. Gazetted status has now been reduced to one more element in the caste hierarchy of the Civil Service. In practical terms, all it means is that a particular official, can attest copies of documents, issue character certificates, attest passport forms etc.

44.22 We may, therefore, abolish this distinction too and lay down the law that all executives and supervisory personnel would have the powers of attestation etc. currently vested in the gazetted officers."

वरील परिच्छेदात पांचव्या केंद्रीय वेतन आयोगाने व्यक्त केलेल्या मताशी व त्यांनी केलेल्या शिफारशींशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत. राज्यात देखील शासकीय राजपत्रामध्ये राजपत्रित दर्जा असलेल्या अधिका-यांच्या नियुक्त्या, बदल्या आदी संबंधिचे आदेश प्रसिध्द करण्याची पध्दत संपुष्टात येऊन बरीच वर्षे उलटून गेली आहेत. एखाद्या अधिनियमातील तरतुदीनुसार विवक्षित व्यक्तीची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करणारे आदेश काढून ते शासकीय राजपत्रात प्रसिध्द करणे व इतर अधिका-यांची नियुक्ती आदी आदेश शासकीय राजपत्रात प्रसिध्द होणे या दोन भिन्न-भिन्न बाबींची गफलत केली जात असल्याचे अनेकदा दिसून येते. एखाद्या अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या प्राधिका-याला, त्या अधिनियमान्वयेच काही विशिष्ट अधिकार प्राप्त होतात. असे अधिकार वापरणा-या व्यक्तीची संबंधित प्राधिकारी म्हणून नियुक्ती खरोखरच झाली आहे किंवा कसे हे पडताळून पाहण्यासाठी त्या व्यक्तीची संबंधित प्राधिकारी म्हणून नियुक्ती केली गेल्याचे औपचारिक आदेश वा अधिसूचना काढण्यात आली आहे की नाही, हे महत्वाचे ठरते. संबंधित नियुक्तीचे आदेश वा अधिसूचना यांना अशारितीने कायदेशीर दृष्टया महत्व प्राप्त होते. राजपत्रित दर्जा असलेल्या पदांवर नियुक्ती केल्याचे आदेश वा अधिसूचना यांचा संदर्भ वेगळाच आहे व असे आदेश, वर म्हटल्याप्रमाणे, शासकीय राजपत्रात आता प्रसिध्द करण्यात येतच नाहीत. म्हणून "राजपत्रित अधिकारी" या संज्ञेला वा संकल्पनेला स्पष्ट व औपचारिकपणे मूठमाती देणे हेच योग्य ठरेल. आम्ही तसे करण्याची शासनास शिफारस करतो.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग

४.३५ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील प्रशासकीय संरचनेमध्ये उच्चतम पद "सचिव" हे असून त्या पदाची विद्यमान वेतनश्रेणी रु.३७००-५०००,म्हणजे मंत्रालयातील "उप सचिव" या पदाच्या विद्यमान वेतनश्रेणीशी समकक्ष, अशी आहे. या पदाच्या खालोखाल "उप सचिव" ही पदे असून त्या पदाकरीतां विद्यमान वेतनश्रेणी रू.३०००-४५००, म्हणजे मंत्रालयातील "अवर सचिव" या पदांच्या विद्यमान वेतनश्रेणींशी समकक्ष आहे. शिवाय या दोन

टप्प्यांच्या मध्ये ''उप सचिव व परीक्षा नियंत्रक'' हे पद असून त्याकरीतां विद्यमान वेतनश्रेणी आयोगाच्या कार्यालयातील इतर उप सचिव या पदाचीच, म्हणजे रू.३०००-४५०० अशी, असून तें पद धारण करणा-या अधिका-यास मात्र रु. ३०० एवढे विशेष वेतन दिले जाते. आयोगाकडील '' उप सचिव'' या पदाच्या खालोखाल ''अवर सचिव'' हे पद असून त्या पदाची विद्यमान वेतनश्रेणी रू.२२००-३७००, म्हणजे मंत्रालयातील ''सहाय्यक सचिव'' या पदाकरीता विहित केलेल्या वेतनश्रेणीशी ती समकक्ष आहे. या शिवाय, त्याखाली निम्न स्तरावर आयोगाच्या कार्यालयीन गरजांनुसार इतरही पदें अस्तित्वात आहेत.

या संबंधातील आमच्याशी झालेल्या चर्चेच्या दरम्यान आयोगातर्फे असे सांगण्यात आले कीं, आयोगाच्या कार्यालयातील सचिव, उप सचिव, अवर सचिव या पदांना मंत्रालयातील तीच पदनामे असलेल्या पदांपैकी प्रत्येकी एक-एक टप्प्याने जी खालची वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे ती योग्य नाही. म्हणून या सर्व पदांची श्रेणीवाढ करून मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील तशीच पदनामे असलेल्या पदांना मंजूर असलेली वेतनश्रेणी मान्य करावी आणि दि.१-१-१९९६ पासून तदनुरूप उच्च सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याची या समितीने शिफारस करावी.

या समितीची मर्यादित कार्यकक्षा लक्षात घेता, आयोगाच्या कार्यालयातील सचिव, उप सचिव, अवर सचिव या सर्वच पदांची सरसकट एकसमयावच्छेदेकरून श्रेणीवाढ करण्याचा प्रश्न आमच्या कक्षेच्या बाहेर आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. शिवाय, आम्हास असे समजते कीं, आयोगाची सध्याची प्रशासकीय संरचना व एकूण व्यवस्था आणि त्या व्यवस्थेतील विविध स्तरावरील पदें आदींची पुनर्रचना करण्यासंबंधिचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्यामुळे, त्यासंबंधात आम्ही काहीं शिफारशी करणे किंवा सरसकट सर्वच पदांची श्रेणीवाढ करण्याचीही शिफारस करणे हें योग्य होणार नाही. परंतु आयोगाची सांविधानिक जबाबदारी आणि आयोगाच्या एकूण कामाचा व्याप लक्षात घेता आमची अशी मर्यादित शिफारस आहे की, आयोगाच्या कार्यालयातील उच्चतम, म्हणजे ''सचिव'' या पदाकरीतां रू.४५००-५७००या वेतनश्रेणीच्या समकक्ष, म्हणजे रू.१४३००-८३००(एस२४), ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी. या पदाच्या

खालोखाल विविध स्तरांवर कोणत्या वेतनश्रेणीतील किती पदं असावीत, म्हणजेच एकूण अधिकारश्रेणी व विविध वेतनश्रेणीतील पदांची संख्या किती असावी या बाबीचा निर्णय सध्याच्या एकूण कामकाज व कार्यपध्दती यांचे मूल्यमापन व अभ्यास करून ठरविणे योग्य होईल असें आम्हास वाटते. तसा अभ्यास विनाविलंब करून यासंबंधी अंतिम निर्णय घेण्यात यावा असे आम्ही सुचवितो.

## इतर प्रशासकीय सुधारणा

४.३६ राज्य वेतन सुधारणा समितीच्या कार्यकक्षेमध्ये कर्मचा-यांची कार्यक्षमता वाढविण्याबाबत, तसेच कार्यालयीन शिस्त व प्रशासकीय यंत्रणेत सुधारणा करण्याबाबत शिफारशी करण्यासंबंधीची बाब अंतर्भूत करण्यात आलेली नाही. त्यामुळे या संदर्भात विस्ताराने भाष्य करणे संयुक्तिक होणार नाही याची समितीला जाणीव आहे. असे असले तरी, पांचव्या केंद्रीय वेतन आयोगाने विविध प्रशासकीय विभागांकरीतां निर्धारित केलेल्या उद्दिष्टांच्या संदर्भात अशा उद्दिष्टांची पूर्तता झाल्यावर त्यांच्याशी निगडीत असलेल्या कर्मचारीवृंदांचें पुनःसंघटन करण्याची प्रक्रिया सुरू करणे, कार्यालयीन दैनंदिन कामकाजासाठी संगणकांचा मोठया प्रमाणात वापर करणे, कर्मचा-यांचे आरोग्य सुधारण्यासाठीं कार्यालयीन पर्यावरणाची विविधांगी सुधारणा करणे, अनावश्यक खर्चाला प्रतिबंध घालण्याच्या हेतूने इमारतींची/कार्यालयांची देखभाल, स्वच्छता, कर्मचा-यांसाठीं कँटीन व्यवस्था, लेखे व अभिलेखे अद्ययावत ठेवणे इत्यादी बाबींसाठी कंत्राट पध्दतीद्वारे अशा शासकीय सेवा (सर्व्हीसेस) सहकारी/खाजगी क्षेत्राकडे सुपूर्द करणे, अधिका-यांना त्यांच्या कामामधील उणिवांबद्दल वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल या अटीच्या अधीन राहून त्यांना पुरेसे अधिकार प्रदान करून कामकाजाचा निपटारा किंवा कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठीं प्रशासन यंत्रणेमध्ये असलेले विविध प्रशासकीय स्तर कमी करणे, प्रशासकीय कामकाज अधिकारीभिमूख करणे, कार्यालयीन कामाचे तास व सुट्टयांचे दिवस सुनिश्चित करणे, कार्यालयीन वेळेमध्ये जेवण व चहापान इत्यादीसाठीं वेळ निर्धारित करणे, या व इतर अशा महत्वाच्या बाबींबाबत राज्य शासनाने कर्मचारी संघटनांना विश्वासात घेऊन सुधारित धोरण निश्चित करणे योग्य होईल व तें निकडीचेंहीं आहे असें या समितीला प्रसंगतः नमूद करावेसें वाटते.

**उपसंहार**

८.३७ प्रस्तुतच्या वेतन सुधारणेच्या प्रयोजनार्थ नियुक्त करण्यात आलेल्या राज्य वेतन सुधारणा समितीच्या कार्यकक्षा तुलनेने ब-याच सीमित होत्या. वेतन आयोगास विविध संवर्गांच्या व पदांच्या जबाबदारी, कर्तव्ये आदींचे मूल्यमापन करण्याची असलेली जबाबदारी लक्षात घेतां आमच्या समितीची कार्यकक्षा व मुदत मर्यादित होती. परिणामतः, विविध पदांचे, संबंधितांनी केलेल्या श्रेणीवाढीच्या विनंतीच्या संदर्भात, पुनर्मुल्यांकन आम्हास करता आले नाही याची आम्हास पूर्ण जाणीव आहे. आमच्या मर्यादित भूमिकेची आब राखूनही, गेल्या वेतन सुधारणेनंतर विविध प्रशासकीय विभागांच्या आणि विशेष करून त्यांच्या अखत्यारीतील विविध विभाग प्रमुखांच्या व त्यांच्या क्षेत्रीय (रीजनल / डिव्हिजनल) कार्यालयांच्या जडणघडणीत, सर्वसाधारण मार्गदर्शन व पर्यवेक्षणाच्या जबाबदारींत आणि एकूण कामाच्या व्यापात दरम्यान घडलेल्या स्थित्यंतराच्या अनुषंगाने झालेले बदल पूर्णतः दुर्लक्षित करणे मात्र समितीस शक्य नव्हते. ते विचारांत घेतां, सर्वसाधारण पुनर्आढावा घेऊन, समितीस योग्य आढळून आलेल्या विभाग प्रमुखांच्या/क्षेत्रीय प्रमुखांच्या वेतनश्रेणीत आम्ही थोडीफार सुधारणा सुचविली आहे. यांमध्ये अर्थ व सांख्यिकी संचालनालय, लेखा व कोषागारे संचालनालय, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय , धर्मादाय आयुक्तालय आणि भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

दिनांक १ जानेवारी १९९६ पासून प्रस्तुतची वेतन सुधारणा अंमलात यावयाची आहे हें विचारात घेऊन, तसेच दि.१ जानेवारी १९८६ ते ३१ डिसेंबर १९९५ या दरम्यान विविध प्रशासकीय विभागांनी निर्गमित केलेल्या वेतनश्रेणीवाढीच्या आदेशांचे पुनर्निरीक्षण करण्यासंबंधीच्या बाबीचा समितीच्या कार्यकक्षेत करण्यात आलेला अंतर्भाव विचारात घेऊन, दि.१ जानेवारी १९९६ नंतर श्रेणीवाढ झालेल्या पदांबाबत आम्ही दखल घेतलेली नसून त्याचा अंतर्भाव अहवालात केलेला नाही.

# प्रकरण - ५
## विशेष वेतन

विशेष वेतन हें साधन (अ) जेव्हां व्यापक संवर्गातील काहीं निवडक पदांना उच्च किंवा संवर्गबाहय जबाबदा-या सोपविल्या असतील तेव्हां मोबदला म्हणून आणि (ब) समुचित वरची वेतनश्रेणी उपलब्ध नसेल तेव्हां तिच्या बदली म्हणून, अशा दोन प्रकारच्या परिस्थितीत वापरले जाते.

५.२ विशेष वेतनाच्या दुस-या प्रकारच्या वापराच्या संबंधात आम्ही शक्य असेल तेथे शिफारस केलेल्या सुधारित वेतनश्रेणीत विशेष वेतन विलीन करून तें काढून टाकण्याचे प्रस्तावित केले आहे, (पहाः- विवरणपत्र-१). उलटपक्षी, काहीं नवीन प्रकरणात आम्ही विशेष वेतन मंजूर करण्याची शिफारस केली आहे,(पहाः- विवरणपत्र-२).

५.३ उच्च किंवा संवर्गबाहय जबाबदा-या पेलण्याकरीतां मोबदला म्हणून दिलेल्या विशेष वेतनाच्या संबंधात आम्हांला आढळलेल्या काहीं प्रकरणात आमच्या मते विशेष वेतन चुकीने देण्यात आले आहे. अशा प्रकरणात आम्ही तें बंद करण्याची शिफारस केली आहे, (पहाः- विवरणपत्र-३).

५.४ उच्च व संवर्गबाहय जबाबदा-यांच्या कारणांवरून समर्थनीय म्हणून मानलेल्या विशेष वेतनाच्या उर्वरित सर्व प्रकारात आम्ही पुढीलप्रमाणे शिफारशी करीत आहोंतः-

(अ) रोख रकमेचा व्यवहार करणा-या व्यक्तीः- यांच्या बाबतीत आम्ही केंद्र शासनाचे आदेश स्वीकारण्याचें प्रस्तावित केले आहे, (पहाः- कर्मचारी वर्ग, सार्वजनिक गा-हाणी व निवृत्तीवेतने मंत्रालय, कर्मचारी वर्ग व प्रशिक्षण विभाग, कार्यालयीन ज्ञापन क्रमांक ४/५/९७ आस्थापना(वेतन-दोन), दिनांक ५ मे,१९९८).

(ब) इतर :- येथील विद्यमान विशेष वेतनाबद्दल विचार करून केंद्र शासनाच्या धर्तीवर येथे देखील त्याप्रमाणे विशेष वेतनाचे सुधारित दर लागू करण्याबाबत आम्ही शिफारस केली आहे. (पहा:- कर्मचारी वर्ग, सार्वजनिक गा-हाणी व निवृत्तीवेतने मंत्रालय, कर्मचारी वर्ग व प्रशिक्षण विभाग, कार्यालयीन ज्ञापन क्रमांक ४/४/९७ आस्थापना(वेतन-दोन), दिनांक २२ एप्रिल १९९८)

(क) विशेष वेतनाची श्रेणीवाढ कमाल मर्यादा :- विद्यमान वेतनश्रेणी समोर तद्नुरूप सुधारित वेतनश्रेणी विहित करताना श्रेणींच्या संख्येत झालेली लक्षणीय घट पाहतां काहीं ठिकाणी पदोन्नतीच्या पदांस देखील खालच्या पदाची सुधारित वेतनश्रेणी विहित होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत, पदोन्नतीच्या पदाची उच्च वा अधिक क्लिष्ट जबाबदारी पेलण्यासाठी मोबदला म्हणून आम्ही वेतनश्रेणीच्या वेगवेगळया गटांच्या संदर्भात पुढीलप्रमाणे विशेष वेतन अनुज्ञेय करण्याबाबत शिफारस करीत आहोत.

| अ.क्र. | सुधारित वेतनश्रेणी | अनुज्ञेय विशेष वेतन |
|---|---|---|
| | रूपये | रूपये (दरमहा) |
| १. | १६४००-२०९००<br>१६४००-२०००० | १००० |
| २. | १४३००-१८३०० | ८०० |
| ३. | १२०००-१६५००<br>१०६५०-१५८५० | ७०० |
| ४. | १००००-१५२०० | ६०० |
| ५. | ८०००-१३५००<br>७५००-१२८००<br>७४५०-११५००<br>६५००-१०५०० | ४०० |
| ६. | ५५००-९००० | ३०० |

| | | |
|---|---|---|
| | ५०००-८००० | |
| ७. | ४५००-७००० | २५० |
| ८. | ४०००-६००० | २०० |
| ९. | ३२००-४९००<br>३०५०-४५९० | १५० |
| १०. | २७५०-४४००<br>२६५०-४०००<br>२६१०-४०००<br>२५५०-३२०० | १०० |

५.५ मंत्री आस्थापनेवर प्रतिनियुक्तीवर पाठविलेल्या अधिका-यांना / कर्मचा-यांना सध्या केंद्र शासनाच्या कर्मचारी वर्ग, सार्वजनिक गा-हाणी व निवृत्तीवेतने मंत्रालय, कर्मचारी वर्ग व प्रशिक्षण विभाग, कार्यालय ज्ञापन क्र.६/३०/८६-आस्थापना (वेतन-२), दिनांक १८ डिसेंबर १९८६ आणि समक्रमांकाच्या कार्यालयीन ज्ञापन दिनांक २४ फेब्रुवारी १९८७ आणि परिच्छेद ४.१ आणि ६.१ कार्यालयीन ज्ञापन क्रमांक २/२९/९१-आस्थापना (वेतन-२), दिनांक ५ जानेवारी १९९४ च्या आदेशानुसार प्रतिनियुक्ती भत्ता आणि विशेष वेतन मिळते. अशाप्रकारचे भत्ते / विशेष वेतने आता केंद्र शासनाच्या नविनतम आदेशानुसार विनियमित होतील. (पहाः- कर्मचारी वर्ग, सार्वजनिक गा-हाणी व निवृत्तीवेतने मंत्रालय, कर्मचारी वर्ग व प्रशिक्षण विभाग, कार्यालयीन ज्ञापन क्रमांक २/८/९७ आस्थापना(वेतन-दोन), दिनांक ११ मार्च १९९८)

# विवरणपत्र-एक

## विविध विभागातील/कार्यालयातील निरनिराळया पदांना सुधारित वेतनश्रेणी सुचवितांना विलीन करण्यात आलेली विशेष वेतने

| अ.क्र. | विभागाचे/कार्यालयाचे नांव | पदनाम | विशेष वेतनासहित विद्यमान वेतनश्रेणी | सुचविलेली सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४<br>रूपये | ५<br>रूपये |
| १ | **सामान्य प्रशासन विभाग**<br>मंत्रालय नौरस आहारगृह व मंत्रालय उपहारगृह | व्यवस्थापक, कोंकण भवन उपहारगृह | १४००-२६०० अधिक १२० विशेष वेतन | ५५००-९००० |
| २ | **उच्च तंत्र शिक्षण व सेवा योजना विभाग**<br>कला संचालनालय | १) प्राध्यापक | ३२००-४६२५ अधिक २०० विशेष वेतन | १२०००-१८००० |
| ३ | **महसूल व वन विभाग**<br>मुख्य वन संरक्षक | वनरक्षक | ८२५-१२०० अधिक ३० विशेष वेतन | ३०५०-४५९० |
| ४ | **महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय** | १)ग्रंथपाल, संशोधन व माहिती अधिकारी<br>२) मुख्य प्रतिवेदक / अतिरिक्त मुख्य प्रतिवेदक | २२००-४००० अधिक २०० विशेष वेतन<br>२२००-४००० अधिक २०० विशेष वेतन | १००००-१५२००<br>१००००-१५२०० |

# विवरणपत्र-दोन

## योग्य उच्चतर वेतनश्रेणींच्या अभावी विविध विभागातील / कार्यालयातील निरनिराळया पदांसाठी आता सुचविलेली विशेष वेतने

| अ.क्र. | विभागाचे/कार्यालयाचे नांव | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारित वेतनश्रेणी | विशेष वेतनाचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४<br>रूपये | ५<br>रूपये | ६<br>रूपये |
| १ | **वित्त विभाग**<br>विक्रीकर विभाग | अपर विक्रकीर आयुक्त | ४५००-५७०० | १४३००-१८३०० | ८०० |
| २ | **सामान्य प्रशासन विभाग**<br>विमानचालन संचालनालय | १) मुख्य वैमानिक<br>२) वरिष्ठ दल नायक<br>१) वरिष्ठ कॅप्टन | ५४००-६५००<br>५४००-६५००<br>५४००-६५०० | १६४००-२०९००<br>१६४००-२०९००<br>१६४००-२०९०० | १००० <br>१०००<br>१००० |
| ३ | **गृह विभाग**<br>ए) संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा<br>बी) अपमृत्यू निर्णता, महाराष्ट्र राज्य मुंबई | संचालक<br>१)शवगृह सहाय्यक<br>२) शवगृह सेवक<br>३) शवविच्छेदन सेवक | ४५००-५७००<br>८२५-१२००<br>७५०-९४०<br>७५०-९४० | १४३००-१८३००<br>२७५०-४४००<br>२५५०-३२००<br>२५५०-३२०० | ८००<br>१००<br>१००<br>१०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | **वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**<br>वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय | १) डिसेक्शन हॉल परिचर<br>२) डिसेक्शन रूम परिचर<br>३) पोस्टमॉर्टम रूम परिचर<br>४) पोस्टमॉर्टम सेवक | ७५०-९४०<br>७५०-९४०<br>७५०-९४०<br>७५०-९४० | २५५०-३२००<br>२५५०-३२००<br>२५५०-३२००<br>२५५०-३२०० | १००<br>१००<br>१००<br>१०० |



एच ४११५--६अ

## विवरणपत्र-तीन

**विविध विभागातील / कार्यालयातील निरनिराळया पदांना सध्या अनुज्ञेय असलेली पण आमच्या मते समर्थनीय नसल्यामुळे बंद करण्यात आलेली विशेष वेतने**

| अ.क्र. | विभागाचे/कार्यालयाचे नांव | पदनाम | विशेष वेतनासहित विद्यमान वेतनश्रेणी | सुचविलेली सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४<br>रूपये | ५<br>रूपये |
| १ | मंत्रालयीन विभागातील समान पदे | १) हवालदार | ७७५-११५० अधिक ३० विशेष वेतन | २६१०-४००० |
| | | २) नाईक | ७७५-११५० अधिक ३० विशेष वेतन | २६१०-४००० |
| | | ३) झेरॉक्स चालक | ७७५-११५० अधिक ३० विशेष वेतन | २६१०-४००० |
| | | ४) रोनिओ चालक | ७७५-११५० अधिक ३० विशेष वेतन | २६१०-४००० |
| | | ५) दारवान | ७७५-११५० अधिक ३० विशेष वेतन | २६१०-४००० |
| | | ६) सहाय्यक दारवान | ७७५-११५० अधिक ३० विशेष वेतन | २६१०-४००० |
| | | ७) उद्‌वाहक | ७७५-११५० अधिक ३० विशेष वेतन | २६१०-४००० |
| २ | मंत्रालयीन विभागातील विशिष्ट पदे<br>महसूल वन विभाग | सहाय्यक संचालक (नगर रचना) | ३०००-४५०० अधिक १०० विशेष वेतन | १००००-१५२०० |
| ३ | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय | झेरॉक्स चालक | ७७५-११५० अधिक ३० विशेष वेतन | २६१०-४००० |

## प्रकरण-६

## स्पष्टीकरणात्मक टीपा

विविध प्रशासकीय विभागांतील निरनिराळया संवर्ग पदांना त्यांच्या विद्यमान वेतनश्रेणींच्या अनुषंगाने कोणत्या समकक्ष वेतनश्रेणी अनुज्ञेय होतील या संबंधिचा तपशील या अहवालाच्या परिच्छेद ४.८ मधील तक्त्यात दिलेला आहे. यास अपवाद म्हणून जेथे वेगळी सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबतची शिफारस या समितीने केली आहे त्याबाबतचे प्रशासकीय विभाग/विभाग प्रमुखनिहाय कारणांसह स्पष्टीकरणात्मक टीपा यापुढे दिल्या आहेत.

### मंत्रालयीन विभाग

### (अ) मंत्रालयातील सर्व विभागातील समान पदे

#### मंत्रालयीन विभाग

रू.१४००-२६०० अधिक विशेष वेतन रू.१००/- या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक प्रभारी, नोंदणी शाखा आणि रोखलेखापाल ही पदें मूलतः मंत्रालयातील सहाय्यक या संवर्गातील असल्यामुळे या पदांना रू.५५००-९००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे. या पदांना विशेष वेतन या अहवालाच्या परिच्छेद ५.४ (अ )मध्ये विशद केल्याप्रमाणे अनुज्ञेय होईल.

### (ब) विविध मंत्रालयीन विभागातील विशिष्ट पदे :-

#### (३) शालेय शिक्षण विभाग:-

रू.१२००-२०४० या विद्यमान वेतनश्रेणीतील सांख्यिकी सहाय्यक या पदास, या अहवालच्या परिच्छेद ४.२ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.४५००-७००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

#### (४)गृह विभाग

रू.१६४०-२९०० या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक (स्वागत शाखा) आणि सहाय्यक (विशिष्ट शाखा) या पदांना, हीं पदें मंत्रालयातील सहाय्यक या मूळ संवर्गातील असल्यामुळे, या अहवालाच्या परिच्छेद ४.२ मध्ये विशद केल्याप्रमाणे रू.५५००-९००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली

आहे. या पदांना विशेष वेतन या अहवालाच्या परिच्छेद ५.४ (ब) मध्ये विशद केल्याप्रमाणे अनुज्ञेय होईल.

**(९) पाटबंधारे विभाग :-**

रू.५४००-६५०० या विद्यमान वेतनश्रेणीतील मुख्य अभियंता व सह सचिव या पदास या अहवालाच्या परिच्छेद ३.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे रू.१६४००-२०००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे. तसेच रू.३२००-४६२५ अधिक विशेष वेतन रू.३००/- या विद्यमान वेतनश्रेणीतील कार्यकारी अभियंता व पदसिध्द अवर सचिव या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ३.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.१००००-१५२०० या सुधारित वेतनश्रेणीची व सुधारित विशेष वेतन या अहवालाच्या परिच्छेद ५.४(ब) मध्ये विशद केल्याप्रमाणे विहित करण्याबाबत आम्ही शिफारस केली आहे.

रू.१२००-२०४० या विद्यमान वेतनश्रेणीतील सांख्यिकी सहाय्यक या पदास, या अहवालच्या परिच्छेद ४.२ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.४५००-७००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील आरेखक या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.४५००-७००० व ४ वर्षाच्या सेवेनंतर रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची, त्या परिच्छेदातील अटींच्या अधीन राहून, आम्ही शिफारस केली आहे.

रू.१२००-२०४० या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक आरेखक या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.४५००-७००० व ५ वर्षाच्या सेवेनंतर रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची, त्या परिच्छेदातील अटींच्या अधीन राहून, आम्ही शिफारस केली आहे.

रू.९७५-१५४०या विद्यमान वेतनश्रेणीतील अनुरेखक या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.४०००-६००० व ७ वर्षाच्या सेवेनंतर रू.४५००-७००० या सुधारित वेतनश्रेणीची, त्या परिच्छेदातील अटींच्या अधीन राहून, आम्ही शिफारस केली आहे.

**(११) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग :-**

रू.५४००-६५०० या विद्यमान वेतनश्रेणीतील संचालक, हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था या पदास या अहवालाच्या परिच्छेद ४.७ मध्ये विशद केल्याप्रमाणे रू.१६४००-२०९०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

**(१२) सार्वजनिक बांधकाम विभाग :-**

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदास या अहवालाच्या परिच्छेद ३.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील आरेखक या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.४५००-७००० व ४ वर्षाच्या सेवेनंतर रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची, त्या परिच्छेदातील अटींच्या अधीन राहून, आम्ही शिफारस केली आहे.

रू.१२००-२०४० या विद्यमान वेतनश्रेणीतील सांख्यिकी सहाय्यक या पदास, या अहवालच्या परिच्छेद ४.२ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.४५००-७००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१२००-२०४० या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक आरेखक या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.४५००-७००० व ५ वर्षाच्या सेवेनंतर रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची, त्या परिच्छेदातील अटींच्या अधीन राहून, आम्ही शिफारस केली आहे.

रू.९७५-१५४०या विद्यमान वेतनश्रेणीतील अनुरेखक या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.४०००-६००० व ७ वर्षाच्या सेवेनंतर रू.४५००-७००० या सुधारित वेतनश्रेणीची, त्या परिच्छेदातील अटींच्या अधीन राहून, आम्ही शिफारस केली आहे.

**(१३) नियोजन विभाग:-**

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील वरिष्ठ लेखा अधिकारी (रोजगार हमी योजना-दक्षता) आणि वरिष्ठ लेखा अधिकारी (ग्रामीण भूमि रोजगार कार्यक्रम ) या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-१ मधील पदांना, या अहवालाच्या

परिच्छेद ४.१० मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

**(१४) महसूल व वन विभाग :-**

रू.५४००-६५०० या विद्यमान वेतनश्रेणीतील मुख्य अभियंता व सह सचिव (भूकंप पुनर्वसन कक्ष) या पदास या अहवालाच्या परिच्छेद ३.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे रू.१६४००-२०००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.३२००-४६२५ या विद्यमान वेतनश्रेणीतील कार्यकारी अभियंता व अवर सचिव आणि कार्यकारी अभियंता (भूकंप पुनर्वसन कक्ष )या पदांकरीतां या अहवालाच्या परिच्छेद ३.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे रू.१००००-१५२०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.२२००-४००० या विद्यमान वेतनश्रेणीतील उप अभियंता या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ३.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे, त्या संवर्गातील ५० टक्के पदांना रू.६५००-१०५०० या सुधारित वेतनश्रेणीची व उरलेल्या ५० टक्के पदांना रू. ७५००-१२००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील लेखा अधिकारी (वर्ग-१) या पदास या अहवालाच्या परिच्छेद ४.१० मध्ये विशद केल्याप्रमाणे रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक वन संरक्षक या पदास या अहवालाच्या परिच्छेद ३.१६ मध्ये विशद केल्याप्रमाणे रू.६५००-१०५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१६४०-२९०० या विद्यमान वेतनश्रेणीतील कनिष्ठ अभियंता (भूकंप पुनर्वसन कक्ष) या पदास या अहवालाच्या परिच्छेद ३.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

## (१५) ग्राम विकास विभाग :-

रू.१२००-२०४० या विद्यमान वेतनश्रेणीतील सांख्यिकी सहाय्यक या पदास, या अहवालच्या परिच्छेद ४.२ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.४५००-७००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

## कृषि व पदुम विभाग

### कृषि आयुक्तालय:-

या अहवालाच्या पुनःपरिक्षण प्रकरणामध्ये चर्चिल्याप्रमाणे रू.२०००-३२०० या वेतनश्रेणीमधील कृषि अधिकारी या पदास रू.१६४०-२९०० ही विद्यमान वेतनश्रेणी आधारभूत मानून रू.५५००-९००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

तसेच कृषि सहाय्यक संवर्गास ७ वर्षे अर्हताकारी सेवा पूर्ण केलेल्या पदविकाधारकांकरीता रू.१२००-१८०० ही विद्यमान वेतनश्रेणी आधारभूत मानून रू.४०००-६००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील मुलकी आवेक्षक व कनिष्ठ अभियंता या पदांस शालांत परीक्षा उत्तीर्ण अधिक अभियांत्रिकीमधील पदविका (३ वर्षे ) अशी अर्हता लागू असल्यामुळे रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची (पहा:- केंद्रीय पाचव्या वेतन आयोगाच्या अहवालाचा परिच्छेद क्रमांक ५२.१११) आम्ही शिफारस केली आहे.

### फलोत्पादन संचालनालय :-

रू.२०००-३२०० या विद्यमान वेतनश्रेणीतील फलोत्पादन अधिकारी व फलोत्पादन नियंत्रक या पदांस, या अहवालातील परिच्छेद ३.११ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.१६४०-२९०० ही विद्यमान वेतनश्रेणी आधारभूत मानून रू. ५५००-९००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

तसेच फलोत्पादन सहाय्यक या पदास ७ वर्षे अर्हताकारी सेवा पूर्ण केलेल्या पदविका/प्रमाणपत्र (२ वर्षे) धारकांकरीतां रू.१२००-१८०० ही विद्यमान वेतनश्रेणी आधारभूत मानून रू.४०००-६००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

**दुग्धव्यवसाय विकास विभाग:-**

अपर आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास आणि महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दुध योजना ही दोन पदें अनुक्रमे रू.४५००-५७०० आणि रू.४१००-५३०० या विद्यमान वेतनश्रेणीत आहेत. या दोन पदांना रू.१४३००-१८३०० ही एकच सुधारित वेतनश्रेणी अनुज्ञेय होते. विद्यमान वेतनश्रेणीमधील तफावत व अपर आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास या पदाची जबाबदारी व व्याप्ती विचारात घेऊन, प्रकरण क्र. ५ मध्ये विशद केल्याप्रमाणे, अपर आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास या पदास आम्ही रू.८००/- या विशेष वेतनाची शिफारस केली आहे.

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक आयुक्त (लेखा), सहाय्यक आयुक्त(अंतर्गत लेखापरीक्षा), लेखा अधिकारी, शासकीय दुध योजना, पुणे व उप निरिक्षक, दुग्ध लेखा या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-१ मधील पदांना परिच्छेद ४.१० मध्ये विशद केल्याप्रमाणे रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक पशुसंवर्धन संचालक, व्यवस्थापक, गोशाळा, व्यवस्थापक, वत्स्य क्षेत्र, दापचेरी आणि सहाय्यक पशु संवर्धन अधिकारी या पदांना, या अहवालाच्या परिच्छेद ४.१५ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१४००-२३०० या वेतनश्रेणीतील दुग्धशाळा पर्यवेक्षक, सहाय्यक पाळी व्यवस्थापक, सहाय्यक दुग्धशाळा रसायन शास्त्रज्ञ, सहाय्यक दुग्धशाळा रसायन शास्त्रज्ञ (अणूजीव), प्रयोगशाळा तंत्रज्ञ इत्यादी पदांना, या अहवालाच्या परिच्छेद ४.११ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.७७५-११५० या विद्यमान वेतनश्रेणीतील दुध नमुनाकार आणि नमुनाकार या पदांना या अहवालाच्या परिच्छेद ४.१२ मध्ये विशद केल्याप्रमाणे रू.३०५०-४५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

**पशुसंवर्धन आयुक्तालय :-**

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक संचालक वर्ग-१ (लेखा) या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.१० मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक संचालक, वर्ग-१ (लेखा) या पदास या अहवालच्या परिच्छेद ४.१० मध्ये विशद केल्याप्रमाणे रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक संचालक पशुसंवर्धन, सहाय्यक संचालक, पशुसंवर्धन,(सांख्यिकी पाहणी), संशोधन अधिकारी, पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे, अधिक्षक, पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे, अधिक्षक, पशुपैदास प्रक्षेपण क्षेत्र/कृत्रिम रेतन प्रशिक्षण केंद्र, व्यवस्थापक, मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषदा) व बृहन्मुंबई, सहाय्यक संचालक, पशुसंवर्धन (प्रसुतीशास्त्रज्ञ), प्रपाठक, सेवांतर्गत पदविका अभ्यासक्रम, प्रमुख पशुवैद्यकीय अधिकारी, सहाय्यक संचालक, पशुसंवर्धन (तांत्रिक) व सहाय्यक संचालक, पशुसंवर्धन (कृत्रिम रेतन), या पदांना, या अहवालाच्या परिच्छेद ४.१५ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) आणि संयंत्र अभियंता या पदांना, या अहवालाच्या परिच्छेद ३.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१२००-१८०० या विद्यमान वेतनश्रेणीतील प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदांस, या अहवालाच्या परिच्छेद ४.११ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.७७५-११५० या विद्यमान वेतनश्रेणीतील व्रणोपचारक या पदांस, या अहवालाच्या परिच्छेद ४.१९ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.२७५०-४४००या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

**मत्स्य व्यवसाय आयुक्तालय:-**

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील कनिष्ठ अभियंता (मत्स्य व्यवसाय यंत्रणा) या पदांस, या अहवालाच्या परिच्छेद ३.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक मत्स्य विकास अधिकारी या पदांस, या अहवालाच्या परिच्छेद ४.११ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१४००-२६०० या विद्यमान वेतनश्रेणीतील चित्रकला शिक्षक, रू.१२००-२०४० या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक शिक्षक, रू.९७५-१६६० या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक शिक्षक आणि रू.१२००-२०४० या वेतनश्रेणीतील चित्रकला शिक्षक या पदांना, या अहवालाच्या परिच्छेद ४.२० मध्ये विशद केल्याप्रमाणे, पुढीलप्रमाणे त्रिस्तरीय वेतनश्रेणी विहित करण्याबाबत आम्ही शिफारस केली आहे.

| अ.क्र. | पदनाम | सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १. | सहाय्यक शिक्षक (प्रशिक्षीत पदवीधर) | १) ५०००-८०००(मूळ वेतनश्रेणी)<br>२) ५५००-९०००(वरिष्ठश्रेणी)<br>३) ६५००-१०५००(निवडश्रेणी) |
| २ | सहाय्यक शिक्षक | १) ४०००-६०००(मूळ वेतनश्रेणी)<br>२)५०००-८००० (वरिष्ठश्रेणी)<br>३)५५००-९००० (निवडश्रेणी) |
| ३ | सहाय्यक शिक्षक | १) ३२००-४९००(मूळ वेतनश्रेणी)<br>२)४०००-६००० (वरिष्ठश्रेणी)<br>३)४५००-७००० (निवडश्रेणी) |
| ४ | चित्रकला शिक्षक | १) ४०००-६०००(मूळ वेतनश्रेणी)<br>२)५०००-८००० (वरिष्ठश्रेणी)<br>३)५५००-९००० (निवडश्रेणी) |

## सहकार व वस्त्रोद्योग विभाग

## सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था

रू.४५००-५७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील पणन संचालक आणि अपर आयुक्त व विशेष निबंधक (वित्त) या पदांना, या अहवालाच्या परिच्छेद ५.४(क) मध्ये विशद केल्याप्रमाणे, विशेष वेतनाची आम्ही शिफारस केली आहे.

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक संचालक (लेखा) या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.१० मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.२०००-३२०० या विद्यमान वेतनश्रेणीतील क्षेत्रिय वन अधिकारी या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ३.१६ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.५५००-९००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील कनिष्ठ अभियंता या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ३.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

## वित्त विभाग

## विक्रीकर विभाग:-

रू.३७००-५००० या विद्यमान वेतनश्रेणीतील विक्रीकर उप आयुक्त या पदांच्या एकूण पदसंख्येच्या २० टक्के पदांना रू.४५००-५७०० (रू.१४३००-१८३०० (एस-२४) ) या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे. अपर विक्रीकर आयुक्त हें विक्रीकर उप आयुक्त या पदांस असलेले पदोन्नतीचे पद रू.४५००-५७०० याच विद्यमान वेतनश्रेणीत असल्यामुळे या पदास सुधारित वेतनश्रेणी रू.१४३००-१८३०० आणि परिच्छेद ५.४(क) प्रमाणे विशेष वेतन विहित करण्याबाबत आम्ही शिफारस केली आहे.

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील विक्रीकर अधिकारी (वर्ग-१) या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.१० मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

**लेखा व कोषागारे संचालनालय:-**

रू.४५००-५७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील संचालक या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.३७ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.१६४००-२०००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.३०००-४५०० या विद्यमान वेतनश्रेणीतील उप संचालक आणि उप मुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ) या पदांना , या अहवालाच्या परिच्छेद ४.३७ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.१०६५०-१५८५० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक संचालक, उप मुख्य लेखापरीक्षक (कनिष्ठ), सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी, वरिष्ठ कोषागार अधिकारी, कोषागार अधिकारी आणि लेखा अधिकारी (गट विमा)या पदांना, या अहवालाच्या परिच्छेद ४.१० मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

## अन्न व नागरी पुरवठा विभाग

**संचालक, नागरी पुरवठा (गोदाम व वाहतूक) :-**

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील उप संचालक (लेखा) या पदास,या अहवालाच्या परिच्छेद ४.१०मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

**वित्तीय सल्लागार आणि शासनाचे उप सचिव :-**

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील वरिष्ठ लेखा अधिकारी व अर्थसंकल्प अधिकारी या पदांना, या अहवालाच्या परिच्छेद ४.१० मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

**नियंत्रक, वजने आणि मापे:-**

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील निरीक्षक(कनिष्ठ श्रेणी) या पदास,या अहवालाच्या परिच्छेद ४.११ मध्ये विशद केल्याप्रमाणे,रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

## सामान्य प्रशासन विभाग

### माहिती व जनसंपर्क महासंचालनालय :-

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील लेखा अधिकारी या पदास,या अहवालाच्या परिच्छेद ४.१० मध्ये विशद केल्याप्रमाणे,रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१६४०-२९०० या विद्यमान वेतनश्रेणीतील चलत् छायाचित्रकार, दूरचित्र संपादक आणि दूरदर्शन छायाचित्रकार या पदांना, या अहवालाच्या परिच्छेद ४.१९ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.६५००-१०५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१४००-२६०० या विद्यमान वेतनश्रेणीतील उप संपादक, माहिती अधिकारी, माहिती सहाय्यक आणि स्वागतकार-नि-माहिती सहाय्यक या पदांना,या अहवालाच्या परिच्छेद ४.१९ मध्ये विशद केल्याप्रमाणे,रू.५५००-९००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.७५०-९४० या विद्यमान वेतनश्रेणीतील अंधारकोठडी सहाय्यक, चित्रपट तपासणीस आणि चित्रपट वाहक या पदांना, या अहवालाच्या परिच्छेद ४.१९ मध्ये विशद केल्याप्रमाणे,रू.२६१०-४००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

### महाराष्ट्र लोकसेवा आयोग:-

रू.३७००-५००० या विद्यमान वेतनश्रेणीतील सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.३५ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.१४३००-१८३०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१२००-२०४० या विद्यमान वेतनश्रेणीतील सांख्यिकी सहाय्यक या पदास, या अहवालच्या परिच्छेद ४.२ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.४५००-७००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

### सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे :-

रू.१२००-२०४० या विद्यमान वेतनश्रेणीतील वसतीगृह अधिक्षक आणि कल्याण संघटक या पदांना या अहवालाच्या परिच्छेद ४.२० मध्ये विशद

केल्याप्रमाणे, रू.४०००-६००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे

**मंत्रालय चौरस आहारगृह व मंत्रालय उपहार गृहे:-**

रू.१४००-२६०० अधिक विशेष वेतन रू.१२०/- या विद्यमान वेतनश्रेणीतील व्यवस्थापक (कोकण भवन उपहारगृह) या पदास,या अहवालाच्या परिच्छेद ५.२ मध्ये विशद केल्याप्रमाणे,रू.५५००-९००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे. या पदास सध्या लागू असलेले विशेष वेतन मात्र त्यामुळे यापुढे अनुज्ञेय होणार नाही.

**विमान चालन संचालनालय:-**

रू.८२५-१२०० या विद्यमान वेतनश्रेणीतील चालक पोलिस शिपाई या पदास,या अहवालाच्या परिच्छेद ४.२ मध्ये विशद केल्याप्रमाणे,रू.३०५०-४५९० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

## उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग

**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण):-**

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील लेखा अधिकारी (उच्च शिक्षण) या पदास,या अहवालाच्या परिच्छेद ४.१० मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील प्राणी चर्मपूरक (उच्च शिक्षण) या पदास, पुरातत्व व वस्तु संग्रहालय संचालनालयामधील तत्सम पदाप्रमाणे, या अहवालाच्या परिच्छेद ४.११ मध्ये विशद केल्यानुसार, रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

**तंत्र शिक्षण संचालनालय:-**

रू.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील मुख्य लेखा व भांडार पडताळणी अधिकारी (म.वि.ले.से) या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.१० मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील आरेखक या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.४५००-७००० व ४ वर्षांच्या सेवेनंतर रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची, त्या परिच्छेदातील अटींच्या अधीन राहून, आम्ही शिफारस केली आहे.

रू.२२००-३७००, रू.३०००-४५००(वरिष्ठ वेतनश्रेणी) आणि रू.३७००-५३००(निवडश्रेणी) या विद्यमान त्रिस्तरीय वेतनश्रेणीतील ग्रंथपाल या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.२० मध्ये विशद केल्याप्रमाणे, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या समकक्ष सुधारित त्रिस्तरीय वेतनश्रेणी विहित करण्याबाबत आम्ही शिफारस केली आहे.

**<u>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय:-</u>**

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील आरेखक या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे,रू.४५००-७००० व ४ वर्षांच्या सेवेनंतर रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची, त्या परिच्छेदातील अटींच्या अधीन राहून, आम्ही शिफारस केली आहे.

रू.२२००-४००० (एम.बी.बी.एस.करीतां) व रू.२०००-३५०० (इतरांसाठीं) या विद्यमान वेतनश्रेणीतील सहाय्यक वैद्यकिय अधिकारी (उच्च शिक्षण) या पदांना,या अहवालाच्या परिच्छेद ४.१९ मध्ये विशद केल्याप्रमाणे,रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील तांत्रिक आरेखक या पदास,या अहवालाच्या परिच्छेद ४.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे,रू.४५००-७००० व ४ वर्षांच्या सेवेनंतर रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची, त्या परिच्छेदातील अटींच्या अधीन राहून, आम्ही शिफारस केली आहे.

रू.१४००-२६००, रू.१६४०-२९०० आणि रू.१२००-२०४० या विद्यमान वेतनश्रेणीतील निदेशक व गट निदेशक या पदांना आम्ही, या अहवालाच्या परिच्छेद ४.२० मध्ये विशद केल्यानुसार, पुढीलप्रमाणे द्वि/त्रिस्तरीय सुधारित वेतनश्रेणी विहित करण्याबाबत शिफारस केली आहे.

| अ.क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | निदेशक | रू.१४००-२६००<br>(मूळ वेतनश्रेणी)<br>रू.१६४०-२९००<br>(वरिष्ठ वेतनश्रेणी)<br>रू.२०००-३२००<br>(निवडश्रेणी)<br>(२० टक्के पदांसाठी) | ५०००-८०००<br>(मूळ वेतनश्रेणी)<br>रू.५५००-९०००<br>(वरिष्ठ वेतनश्रेणी)<br>रू.६५००-१०५०० |
| २ | गटनिदेशक | रू.१६४०-२९००<br>(मूळ वेतनश्रेणी)<br>रू.२०००-३२००<br>(वरिष्ठ वेतनश्रेणी) | रू.५५००-९०००<br>(मूळ वेतनश्रेणी)<br>रू.६५००-१०५००<br>(वरिष्ठ वेतनश्रेणी) |
| ३ | निदेशक | रू.१२००-२०४०<br>(मूळ वेतनश्रेणी)<br>रू.१४००-२६००<br>(वरिष्ठ वेतनश्रेणी)<br>रू.१६४०-२९००<br>(निवडश्रेणी)<br>(२० टक्के पदांसाठी) | रू.४०००-६०००<br>(मूळ वेतनश्रेणी)<br>रू.५०००-८०००<br>(वरिष्ठ वेतनश्रेणी)<br>रू.५५००-९००० |

**कला संचालनालय :-**

रू.४१००-५३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील कला संचालक या पदास,या अहवालाच्या परिच्छेद ४.२७ मध्ये विशद केल्याप्रमाणे,रू.१५१००-१८३०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.३२००-४६२५ अधिक विशेष वेतन रू.२००/- या विद्यमान वेतनश्रेणीतील प्राध्यापक या पदांस,विशेष वेतन या पुढे बंद करण्यात यावे या अटीच्या अधीन राहून, या अहवालाच्या परिच्छेद ४.२७ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.१२०००-१८००० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

रू.३२००-४६५० अधिक विशेष वेतन रू.२५०/- या विद्यमान वेतनश्रेणीतील अधिष्ठाता या पदांसाठीं देखील आम्ही रू.१२०००-१८००० या सुधारित वेतनश्रेणीचीच शिफारस केली असून या पदांना, या अहवालाच्या परिच्छेद ४.२७ मध्ये विशद केल्याप्रमाणे, विशेष वेतन अनुज्ञेय राहील.

रू.२२००-४००० या विद्यमान वेतनश्रेणीतील अधिव्याखाता या पदास रू.८०००-१३५०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे. तसेच रू.१००००-१५२०० या सुधारित वेतनश्रेणीत "वरिष्ठ अधिव्याखाता" असें नविन पद, अधिव्याखात्या या पदांच्या एकूण पदसंख्येच्या काहीं टक्के पदांच्या रूपांतरान्वये, या अहवालाच्या परिच्छेद ४.२७ मध्ये विशद केल्याप्रमाणे, निर्माण करण्याची देखील आम्ही शिफारस केली आहे.

## गृह विभाग

**पोलिस महासंचालक:-**

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील आरेखक या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ४.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.४५००-७००० व ४ वर्षांच्या सेवेनंतर रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची, त्या परिच्छेदातील अटींच्या अधीन राहून, आम्ही शिफारस केली आहे.

रू.१४००-२३०० या विद्यमान वेतनश्रेणीतील आरेखक (सहाय्यक उप निरीक्षकाच्या श्रेणीतील) या पदास, या अहवालाच्यां परिच्छेद ४.१४ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.४५००-७००० व ४ वर्षांच्या सेवेनंतर रू.५०००-८००० या सुधारित वेतनश्रेणीची, त्या परिच्छेदातील अटींच्या अधीन राहून, आम्ही शिफारस केली आहे.

रू.१२००-१८०० या विद्यमान वेतनश्रेणीतील पोलिस नाईक या पदास, या अहवालाच्या परिच्छेद ३.१२ मध्ये विशद केल्याप्रमाणे, रू.३२००-४९०० या सुधारित वेतनश्रेणीची आम्ही शिफारस केली आहे.

